म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बालवाङ्मय
दा. क्र. ६३०५

# शौर्याची पताका



IRBK-0106305
IRBK-0106305

# शौर्याची पताका

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ६३.०५ नों. दि. ..................
वि. ....का. वा.... क्र. ..................

☆

स्टीफन क्रेन

☆

एक रुपया पंचवीस नये पैसे

कैलास प्रकाशन ५.

★

प्रथमावृत्ति :
ऑक्टोबर १९५७

★

मूळ पुस्तक
THE RED BADGE OF COURAGE

★

मूळ लेखक
STEPHEN CRANE.

★

मराठींत संपादन
नारायण पुराणिक

★

मुद्रक :
अमृतलाल प्रभाशंकर साता
स्टेटस पीपल प्रेस, जन्मभूमि भवन,
घोघा स्ट्रीट, कोट, मुंबई.

★

वेष्टन :
स्टुडियो डी. जी. जी.

★

प्रकाशक :
कैलास प्रकाशन,
१२, त्रिभुवन रोड,
मुंबई ४.

प्रिय वाचक,

स्टीफन क्रेनच्या जगप्रसिद्ध कादंबरीचा हा अनुवाद आपल्या हातीं देतांना आम्हाला आनंद होत आहे. ही संपूर्ण कादंबरी एका तरुण सैनिकाच्या अनुभवावर आधारली आहे व आपण ती वाचल्यावर कथा-विषय आणि कथा—मांडणी ह्या दृष्टींनीं ती सर्वस्वी निराळी आणि वैशिष्ठ्यपूर्ण आहे हें आपल्या लक्षांत येईल.

महाराष्ट्रांतल्या कोणत्याहि वाचकाला हें पुस्तक विकत घेतां यावें आणि आपल्या घरीं अशा उत्तमोत्तम पुस्तकांचा संग्रह करतां यावा म्हणून ह्या पुस्तकाची किंमत अवघी सव्वा रुपया ठेवण्यांत आली आहे. ‘ कैलास ’ उत्तम साहित्य अल्प किंमतींत देऊं इच्छितें. त्या धोरणानेंच पुढील प्रकाशनें आम्ही प्रकाशित करीत आहोंत. ( शेवटचें मलपृष्ठ पहा. )

आमचे वाचक, जाहिरातदार आणि स्नेही ह्यांच्या सहाय्यामुळेंच अल्प किंमतींत चांगलें साहित्य देणें शक्य झालें, विशेषत: ह्या पुस्तकांत ज्या ज्या हितचिंतकांनीं जाहिराती दिल्या त्या केवळ आम्हीं वर उल्लेख केलेला आमचा हेतु सफल व्हावा म्हणूनच दिल्या. त्यांचे व चित्रकार गोडसे, प्रेस प्रोसेसचे श्री. धारगळकर, फेमस प्रिंटर्सचे श्री. भट आणि स्टेट्स पीपल प्रेसचे श्री. तावडे व कामगारबंधू ह्यांचे आम्ही ऋणी आहोंत. ‘ कैलास ’ ला जरूर तें सहाय्य आपण द्याल असा विश्वास आहे.

**आमच्या सर्व हितचिंतकांना ही दिवाळी व नवें वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो.**

—प्रकाशक

ही दीपावलि आमचे भागीदारांस व खातेदारांना
सुखसमृद्धीची जावो !

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेडयूल्ड बँक : स्थापना १९३५

## भांडवल

वसूल भांडवल ( भागापोटीं
भरलेल्या आगाऊ रकमांसह ).... रु. २०,५०,००० चे वर
रिझर्व व इतर फंड .... रु. १०,००,०००
एकूण खेळतें भांडवल .... रु. ८ कोटींचे वर

सेव्हिंग्ज, स्पेशल सेव्हिंग्ज व मुदत ठेवी यांवर वाढवलेल्या
व्याजाच्या दराचा फायदा घ्या.

स्पेशल सेव्हिंग्ज द. द. अडीच टक्के

## शाखा

अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बेळगांव, भिवंडी, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), चाळिसगांव, धुळें, हरिहर, हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नांदेड, नाशिक, पनवेल, पुणें ( भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी ), रत्नागिरी, सांगली, सोलापूर ( फलटण गल्ली व मुरारजी पेठ ), श्रीरामपूर व ठाणें.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर.

# १

रात्रभर पसरलेली थंडी नाराजीनें माघार घेऊं लागली नि तिच्याबरो-बरच जमिनीवर पसरलेलं धुक्याचं पांघरुण हलु हळू उचललं जाऊं लागलं. टेकडीच्या उतरणीवर त्या पांघरुणाखालीं विसांवा घेणारं सैन्य त्यामुळें उघडं पडून जागं झालं. भोंवतालच्या वनश्रीनें आपली तांबडी छटा टाकून हिरवी छटा धारण केली. सैनिकांत पसरलेल्या अनेक अफवांमुळें त्यांच्यांत चलबिचल निर्माण झाली होती.

टेकडीच्या पायथ्याशीं असणाऱ्या रस्त्यावर आतां सैनिकांचे डोळे वळले. काळोखांत चिखलाच्या लांबच लांब प्रवाहासारखे भासणारे ते रस्ते आतां खरोखरच्या रस्त्यासारखे दिसूं लागले होते. किनाऱ्याच्या छाया पडल्यामुळें तेलकट दिसणारा नदीचा प्रवाह त्या सैन्याच्या पायाला स्पर्श करून जात होता. रात्रीच्या वेळीं तें पाणी उदास काळेंकुट्ट दिसे. त्या प्रवाहाच्या पलीकडे नजर टाकली म्हणजे दूर अंतरावर डोंगरांच्या उतरणीवर शत्रूनें पेटविलेल्या शेकोट्यांच्या जळत्या दिवट्या दिसत.

एकदां एका उंच सैनिकाला सद्बुद्धि झाली व आपला सदरा धुवावयाचा पक्का निर्धार करून तो प्रवाहाकडे गेला. पण थोड्याच वेळांत झेंड्यासारखा आपला सदरा फडकावीत तो वाऱ्याच्या वेगानें धांवत आला. त्याच्या एका विश्वासू मित्रानें त्याला सांगितलेल्या बातमीनें तो फुलून जणूं हवेंत तरंगत होता. त्याच्या मित्राला ही बातमी एका घोडदळांतील सत्यवक्त्या मित्रानें सांगितली होती व त्या घोड-दळांतील मित्राला ही बातमी त्याच्या विश्वासू भावानें सांगितली होती. हा त्याचा भाऊ डिव्हिजन हेडकॉर्टर्समध्यें ऑर्डर्ली होता. आपण एक अतिशय महत्त्वाचे दूत आहोंत असा भाव आणूनच त्यानें ती बातमी सांगितली होती.

" उद्यां आपण इथून नक्की हलणार " तो मोठ्या आढ्यतेनें छावणीच्या रस्त्यांत उभ्या असलेल्या शिपायांच्या घोळक्याला म्हणाला, " आपण नदीच्या

किनाऱ्यानें वरच्या बाजूला जाऊन नदी ओलांडणार आणि मग शत्रूला पिछाडीच्या बाजूनें गांठणार."

त्याची बातमी ऐकायला उत्सुक असलेल्या त्या शिपायांच्या घोळक्याला त्यानें आगामी मोहिमेची महान् योजना अगदीं आराखडा काढून समजावून सांगितली. त्याचें सांगणें संपल्यावर निळ्या गणवेशांतले ते सैनिक लहान लहान गट करून तंबूच्या जवळपास उभे राहून आपसांत चर्चा करूं लागले.

पंधरा तीस सैनिकांनीं धरलेल्या तालावर एक निग्रो दारूगोळ्याच्या एका पेटीवर नाचत होता; पण त्याचे साथीदार मात्र ती बातमी ऐकायला, त्याला तसेंच सोडून गेले व त्यामुळें हिरमुसला चेहेरा करून तो खालीं बसला.

"हें सारं खोटं आहे. साफ खोटं आहे." एक शिपाई मोठ्यानें ओरडून म्हणाला. त्यानें आपले हात विजारीच्या खिशांत कोंबले होते व त्याचा चेहेरा रागानें लालबुंद झाला होता. हा आपला वैयक्तिक अपमान होत आहे असें त्याला वाटलें. "ही जुनाट भिकारडी पलटण इथून कधीं हालेलसं मला वाटत नाहीं. आपण इथेंच रुतून बसलों आहोंत. गेल्या पंधरा दिवसांत मीं आठ वेळां तरी निघायची तयारी केली असेल पण आपण अजून इथेंच आहोंत."

आपण स्वतः दिलेल्या बातमीचं समर्थन करणं ह्यामुळें आवश्यक आहे असं त्या बातमी सांगणाऱ्या उंच सैनिकाला वाटलं. नि नंतर त्या दोघांची इतकी बाचाबाची झाली कीं दोघे गुद्दागुद्दी करणार असा रंग दिसूं लागला.

सर्वांचेसमोर उभा राहून एक कॉर्पोरल मोठमोठ्यानें शिव्या देऊं लागला. बराच खर्च करून त्यानें आपल्या घराच्या जमिनीवर नुकत्याच नव्या फळ्या घातल्या होत्या. प्रथम वसंत ऋतूच्या सुरुवातीला आपल्याला लवकर हालावं लागेल असं समजून त्यानें आपली राहायची जागा सुधारायचा बेत रहित केला होता. पण आतां आपण इथें कायम राहूं असं त्याला वाटत होतं.

बरेच सैनिक जोराजोरानें चर्चा करूं लागले. एकानें तर सेनापतीच्या मनांत असलेल्या योजनांचें रसभरित वर्णन केलें. ह्या योजनेशिवाय इतरही योजना आहेत असं म्हणणारे सैनिक त्याच्याशीं भांडूं लागले. ते एकमेकांच्या

अंगावर ओरडूं लागले व जो तो दुसऱ्याचं लक्ष आपल्याकडे वेधून घ्यायचा प्रयत्न करूं लागला. त्यांचीं भांडणं चालू असतांनाच सुरुवातीला ज्या सैनिकानें बातमी आणली होती तो मोठ्या ऐटीनें आपण कोणीतरी महत्त्वाचे आहोंत असा आव आणून इकडून तिकडे फिरूं लागला. त्याला रस्त्यांत भेटणारे सैनिक अनेक प्रश्न विचारीत.

" काय झालं जिम् ? "

" आपली पलटण इथून हलणार."

" तूं काय बोलतोयेस ? तुला काय माहीत ? "

" तुला वाटलं तर विश्वास ठेव नाहीं तर ठेवूं नकोस. मला त्याची मुळींच पर्वा नाहीं. "

विचारांना चालना मिळेल असं त्याच्या उत्तरांत बरंच होतं. आपल्या म्हणण्याला पुरावा द्यायचं तो तुच्छतापूर्वक टाळीत असल्यानें त्याच्या म्हणण्यावर ऐकणारांचा विश्वास बसायला लागला होता. त्या बातमीमुळें त्यांची बरीच धांदल उडाली.

त्या उंच सैनिकाचं नि त्याच्या सहकाऱ्याचं म्हणणं कान टवकारून एक तरुण सैनिक ऐकत होता. आगे कूच करण्याचीं व हल्ल्यांचीं बरीच वर्णनें ऐकून झाल्यावर तो आपल्या झोंपडीकडे गेला व बिळासारख्या दरवाजांतून सरपटत आंत शिरला. त्याच्या मनांत कांहीं नवे विचार आले होते व ह्या नव्या विचारां-वर त्याला बराच विचार करायचा होता; म्हणून एकटेंच बसायची त्याची इच्छा होती.

झोपडींत एका बाजूला असलेल्या एका रुंद फळीवर तो आडवा झाला. दुसऱ्या टोकाला शेकोटीच्या भोंवतीं दारूगोळ्याच्या पेट्या टेबलखुर्च्यांसारख्या ठेवल्या होत्या. एका सचित्र नियतकालिकांतलं एक ढंगदार चित्र झोंपडीच्या लाकडी भिंतीवर लावलेलं होतं, आणि खुंट्यांवर एकावर एक अशा समांतर रेषेंत तीन बंदुका आडव्या ठेवलेल्या होत्या. ज्याच्यावर कांहीं टांगतां आलं असतं अशा प्रत्येक खुंटीवर कांहीं ना कांहीं टांगलेलं होतं नि जळाऊ लाकडांच्या पडलेल्या मोळीवर टिनच्या ताटल्या ठेवलेल्या होत्या.

झोंपडीवर छप्पर म्हणून एक घडी केलेला तंबू घालण्यांत आला होता. त्याच्यावर ऊन्ह पडलेलं नव्हतं तरी सूर्यप्रकाशामुळें तो सोनेरी दिसत होता. :एका छोट्याशा खिडकींतून आलेला उन्हाचा चौकोनी कवडसा जमिनीवर पसरला होता. पेटलेल्या विस्तवाचा धूर अनेकदां धुराड्यांतून निघून जाण्याचं साफ नाकारी व झोंपडीभर पसरे. तें धुराडंहि काड्याकाटक्या एकत्र लिंपून तयार केलेलं होतं व त्यामुळें त्याला आग लागून सबंध झोपडीच जळून खाक व्हायची सतत भीति वाटे.

त्या तरुणाची आश्चर्यानें जणूं समाधीच लागली होती. एकूण आतां ते लढणार होते तर! कदाचित् उद्यांच चकमकींना तोंड लागेल व त्या धुमश्चक्रींत आपण स्वतःहि असूं! त्याच्या मनश्चक्षूपुढें उभ्या राहिलेल्या त्या दृश्यावर मोठ्या प्रयासानेंच त्याचा विश्वास बसला. जगाच्या पाठीवर होणाऱ्या एका महान् घटनेंत आपण स्वतः सामील आहोंत ह्यावर त्याचा मोठ्या मुष्किलीनें विश्वास बसला.

आयुष्यभर त्याला लढाईचीं स्वप्नें पडत होतीं. आपल्या कल्पनेंतील त्या रक्तबंबाळ करणाऱ्या युद्धाचीं दृश्यें पाहून त्याला विलक्षण चेव चढे. अशा अनेक युद्धांत आपण लढत आहोंत अशी तो कल्पना करी. आपल्या केवळ एका करड्या दृष्टिक्षेपानेंहि लोक आपल्याला अंकित होत आहेत असं दृश्य तो मनाशीं रंगवी. पण ह्या स्वप्नांतून तो जागा झाला कीं ह्या सर्व लढाया म्हणजे इतिहासाच्या पानांवर पडलेले रक्ताचे निव्वळ डाग आहेत असं त्याला वाटे. आपल्या कल्पनेंतच त्यानें पाहिलेल्या अनेक राजमुकुटांच्या व प्रचंड किल्ल्यांच्या जुन्या स्मृतींत हीहि स्मृति तो जमा करून टाकी. जगाच्या इतिहासांत लढायांचा एक काळ होता पण तो आतां मावळून गेला आहे असं त्याला वाटे.

घरीं असल्यापासून आपल्या देशांत चालू असलेल्या युद्धाबद्दल त्याला अविश्वास वाटे. हा कांहीं तरी खेळ चालला आहे असं त्याला वाटत होतं. ग्रीकांच्या जुन्या जमान्यांतलीं युद्धं नजरेसमोर उभीं करून तीं पाहून पाहून तो आतां कंटाळून गेला होता. आतां अशीं युद्धं होणं शक्य नाहीं असं तो म्हणे. आतां माणसं सुधारलीं तरी होतीं किंवा भित्रीं तरी झालीं होतीं. सर्वधर्मीय तत्त्वामुळें व धार्मिक शिक्षणामुळें एकमेकांचे गळे दाबून प्राण घेण्याची प्रवृत्ति

नष्ट तरी झाली होती किंवा नव्या आर्थिक स्वास्थ्यामुळें माणसाच्या विकारांना आळा तरी बसला होता.

आपण सैन्यांत भरती व्हावं अशी अनिवार इच्छा त्याला कितीतरी वेळां झाली होती. सैन्याच्या प्रचंड हालचालींच्या बातम्यांनीं सारा देश हादरून गेला होता. होमरच्या महाकाव्यांत असलेल्या लढायांच्या महान् वर्णनासारखीं कांहीं हीं वर्णनें नसत पण त्यांतही खूप शौर्य आहे असं त्याला वाटे. सैन्यानें केलेल्या कूचाच्या, घातलेल्या वेढ्यांच्या, व लढलेल्या तुमुल युद्धांच्या रसभरित कथा त्यानें ऐकलेल्या होत्या व हें सारं आपण पहावं असं त्याला वाटत होतं. तो आपल्या नजरेसमोर शौर्याचीं मनाला थक्क करून सोडणारीं दृश्यं पाहूं लागला होता.

पण त्याच्या आईनें मोडता घातला होता. त्याच्या देशभक्तीकडे आणि युद्धप्रेमाकडे तिनें कांहींशा कुत्सित भावनेनेंच पाहिलं होतं. रणांगणापेक्षां शेतावर त्याची अधिक गरज कां आहे तें ती, शेंकडों कारणं शांतपणें व सहजतेनें सांगून, स्पष्ट करी. तिच्या बोलण्याच्या पद्धतीमुळें ती आपल्या मनांतील विश्वासानेंच बोलते असं वाटे व तिचा हेतु शुद्ध आहे असं त्यालाहि पटे.

पण अखेरीस आपल्या महत्त्वाकांक्षेला झांकळून टाकणाऱ्या त्या छायेविरुद्ध तो बंड करून उठला. वर्तमानपत्रं वाचून, लोकांत पसरलेल्या बातम्या ऐकून व आपल्या नजरेसमोर उभीं केलेलीं कल्पनेंतील भव्य चित्रं पाहून त्याचं मन अनावर झालं होतं. युद्ध आतां जोरांत चाललं होतं आणि लवकरच निर्णायक लढाईला तोंड लागणार असं वर्तमानपत्रं रोज म्हणत होतीं.

एकदां रात्रीं अंथरुणावर पडलेला असतांना चर्चच्या घंटेचा आवाज त्याच्या कानीं आला. कुणाला तरी एका मोठ्या लढाईची बातमी मिळाली होती व उत्साहाच्या भरांत त्यानें चर्चची घंटा वाजवायला सुरुवात केली. लोकांचे आवाजहि त्याच्या कानावर आले आणि त्यांच्या उत्साहाचा परिणाम म्हणून कीं काय त्याची जणुं एक दीर्घ समाधी लागली. त्या समाधींतून तो जागा झाला तेव्हां धावत आपल्या आईच्या खोलींत जाऊन म्हणाला, "आई, मी भरती व्हायचं ठरवलंय."

" हेन्री, मूर्खासारखं वागूं नकोस. " त्याची आई म्हणाली नि तिनें डोक्यावरून पांघरूण घेतलं. निदान त्या रात्रीपुरता तरी त्याला तो विषय सोडून द्यावा लागला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो शेजारच्या गांवीं गेला. त्याच्या आईची शेती तिथेंच होती. त्या गांवीं तो गेला नि नव्यानेंच तयार होत असलेल्या पलटणींत भरती झाला.

तो घरीं परत आला तेव्हां त्याची आई गाईची धार काढीत होती. आणखी चार गाईंची धार काढायची राहिली होती. "मी भरती झालों आई." तो म्हणाला होता. कांहीं क्षण दोघंही कांहींच बोलले नाहींत व नंतर आई म्हणाली होती, "देवाची मर्जी हेन्री." आणि एवढं म्हणून ती पुन्हां गाईचं दूध काढूं लागली.

आपला गणवेश घालून उत्सुक नजरेनें तिचा निरोप घेण्यासाठीं जेव्हां तो दारांत उभा राहिला तेव्हां तिच्या गालांवरून दोन अश्रु ओघळले.

तरी तिनें ' वार छातीवर लागूं दे, पाठीवर नको ' असा कांहीं उपदेश केला नाहीं व त्यामुळें तो निराश झाला. ती कांहींच बोलली नाहीं. आपल्या मनाशीं त्यानें एक चित्र रंगविलं होतं. त्यानें बोलण्याकरितां कांहीं परिणामकारक वाक्यें तयार करून ठेवलीं होतीं. पण ती जें बोलली त्यामुळें त्याचा तो बेत ढांसळला. ती बटाटे सोलीत होती. आपलं काम न थांबवतां बटाटे सोलतां सोलतां ती म्हणाली, "हेन्री, स्वतःची नीट काळजी घे. बंडखोरांचा आपण एक-दम निःपात करूं असं समजुन चालूं नकोस, कारण तें तुला जमणार नाहीं. इतर खूप माणसांपैकीं तूं एक आहेस आणि स्वस्थ राहून इतर लोक सांगतील तें तूं केलं पाहिजे. मी तुला चांगली ओळखतें हेन्री.

" मी तुझ्या पायमोजांच्या आठ जोड्या तुझ्या सामानांत बांधल्या आहेत. अन् तुझे सगळे चांगले सदरेपण बांधले आहेत. इतरांच्या प्रमाणें माझ्या मुलाजवळही भरपूर ऊबदार कपडे असायला हवेत. पायमोज्यांना भोंकं पडतील तेव्हां ताबडतोब ते माझ्याकडे पाठवून दे म्हणजे मी रफू करून ते तुला परत पाठवून देईन."

अनुक्रमांक २२७३३ विभाग आ.आ क्रमांक १२०४ २-४-५१

" आणि कुणाशींहि मैत्री करतांना काळजी घे. सैन्यांत बरींच वाईट माणसं असतात हेन्री. सैन्यांत माणसं बिघडतात. आणि तुझ्यासारख्या घरापासून नि आईपासून दूर न गेलेल्या तरुणाला बिघडवायला त्यांना अतिशय आवडतं. त्याला ते प्यायला आणि शिव्या द्यायला शिकवतात. अशा लोकांपासून दूर रहा हेन्री. मला सांगायची लाज वाटेल असं कांहीं करूं नकोस. माझं तुझ्यावर लक्ष आहे असं मनाशीं नेहमीं समजून चल. तेवढं केलंस म्हणजे मग तुझं कांहीं वाईट होणार नाहीं.

" आणि आपल्या वडिलांची आठवण ठेव. ते कधीं दारूच्या थेंबालासुद्धां शिवले नाहींत कीं त्यांनीं कधीं एक शिवी दिली नाहीं हें लक्षांत असूं दे.

" आणखी तुला काय सांगावं मला सुचत नाहीं. पण कधीं कामचुकारपणा करूं नकोस. जर एकादं वाईट कृत्य करायचं कीं मरायचं असा प्रश्न तुझ्यासमोर उभा राहिला तर योग्य तेंच कर. ह्या कालांत बऱ्याच स्त्रियांना अशा प्रसंगांना तोंड द्यावं लागतं. आम्हा स्त्रियांची काळजी देव घेईल. पायमोजे आणि सदरे ह्यांच्याबद्दल मीं तुला काय सांगितलं तें विसरूं नकोस. मीं मुरंब्याची एक बाटली तुझ्या सामानांत टाकली आहे. तुला मुरंबा फार आवडतो हें मला ठाऊक आहे. जा हेन्री, आणि स्वतःची नीट काळजी घे."

आईचं हें लांबलचक भाषण चालू असतांना आपला उतावीळपणा त्यानें मोठ्या कष्टानें आवरून धरला होता. त्यानें आपल्या मनाशीं ज्या कल्पना बाळगल्या होत्या तसं हें नव्हतं नि अस्वस्थपणें त्यानें सारं सहन केलं. तो जायला निघाला तेव्हां त्याला किंचित् मोकळं वाटलं.

तरीहि बाहेरच्या फाटकांतून त्यानें जेव्हां वळून पाहिलं तेव्हां त्याची आई बटाट्यांच्या सालींत गुडघे टेकून बसलेली त्याला दिसली. तिच्या लालबुंद चेहेऱ्यावर वाळलेल्या अश्रूंचे ओघळ होते नि तिचं सडसडीत शरीर दुःखावेगानें थरथरत होतं. आपलं शीर किंचित् झुकवून तो चालूं लागला. आपल्या मनांतील हेतूची त्याला लाजच वाटली.

तो घरून निघाला तो आपल्या मित्रांचा निरोप घेण्यासाठीं शाळेंत गेला. आश्चर्यानें नि कौतुकानें ते त्याच्या भोंवतीं गोळा झाले. त्यांच्यापेक्षां आपण

कितीतरी वेगळे आहों हें लक्षांत येऊन अभिमानानें त्याची छाती फुगून गेली. त्यानें व त्याच्या कांहीं मित्रांनीं निळा गणवेश घातल्यामुळें त्यांना मिळालेलं महत्त्व त्यांना फार आवडलं होतं. ते मोठ्या दिमाखानें छाती काढून चालूं लागले.

त्याच्या उत्साहाची एका पिंगट केसांच्या मुलीनें टिंगल केली होती. पण दुसऱ्या एका मुलीवर त्याची नजर खिळली. त्याच्या निळ्या गणवेशाकडे पाहून तिचा चेहेरा दुःखी झाला असं त्याला वाटलं. ओक झाडांच्या रांगांमधून रस्त्यानें चालूं लागल्यावर त्यानें जेव्हां मागें वळून पाहिलें तेव्हां ती आपल्या घराच्या खिडकींतून त्याच्याकडे पहात असलेली त्याला दिसली. त्यांच्या नजरा एकमेकाला भिडतांच ती झाडांच्या फांद्यांतून आकाशाकडे पाहूं लागली. तिची धांदल त्याच्या लक्षांत आली होती. कित्येक दिवस त्याला तीची आठवण येत असे.

वॉशिंग्टनला जातांना त्याला स्वतःचा खूप अभिमान वाटला होता. प्रत्येक स्टेशनावर त्यांच्या पलटणीचा सत्कार झाला व लोकांनीं त्याना खाद्यपेयं दिलीं. आपण शूर वीर आहोंत असं त्याला वाटूं लागलं. तरुण पोरींच्या मोहक हास्यांत जेव्हां तो न्हाऊन निघाला नि वृद्धांनीं कौतुकानें जेव्हां त्याची पाठ थोपटली तेव्हां आपण खूप शौर्य गाजवणार आहोंत असं त्याला वाटूं लागलं.

निरनिराळ्या प्रकारच्या हालचालींनंतर त्यांना कित्येक महिने छावणींत राहून काढावे लागले. त्याला असं वाटत होतं कीं लढाईत माणसं सारखीं एकमेकांना मारीत असतात व फक्त जेवणापुरता नि झोपेपुरता थोडा वेळ सोडून ही मारामारी सतत चालू असते. पण त्याची पलटण युद्धक्षेत्रांत आल्या-वरही स्वस्थ बसून होती.

त्यामुळें त्याच्या जुन्या कल्पना पुन्हा वर डोकं काढूं लागल्या. ग्रीकांच्या सारखीं युद्धं पुन्हा होणारच नाहींत. माणसं सुधारलीं तरी होतीं किंवा भित्रीं तरी झालीं होतीं.

त्या निळ्या गणवेशांतल्या प्रचंड घोळक्यापैकींच आपण एक आहोंत ही कल्पना आतां त्याच्या पचनीं पडली होती. आपलं स्वतःचं व्यवस्थित कसं होईल एवढंच तो बघे. कांहीं करमत नसलं कीं, आंगठा चोखीत तो सेनापतीच्या मनांत

आतां कसले विचार घोळत असतील त्याची कल्पना करी. त्याला सारखी कवायत करावी लागे. त्या कवायतीला व तालमींना कधीं अंतच नव्हता.

नदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावरील शत्रूचे कांहीं संत्री त्याला दिसले होते एवढंच त्याला घडलेलं शत्रूचं दर्शन. ते तांबूस रंगाचे सैनिक मोठ्या तत्त्वज्ञासारखे दिसत आणि अधूनमधून समोरच्या निळ्या गणवेशांतल्या सैनिकांवर गोळ्या झाडीत. त्याबद्दल त्यांना कधीं कुणीं दोष दिला तर ते दुःख प्रदर्शित करीत, आपल्या देवतांच्या नांवानें शपथ घेऊन बंदुका आपोआप उडाल्याचं सांगत. एका रात्रीं पहाऱ्यावर असतांना ह्या तरुण सैनिकानें पलीकडील किनाऱ्यावर असलेल्या शत्रूशीं गप्पा मारल्या होत्या. तो एक फाटक्या अंगाचा सैनिक होता नि आपल्या दोन पायांच्या मधल्या जागीं जमिनीवर अचूक थुंकण्याचं कसब त्यानें कमावलं होतं. साध्या पोरकट गप्पा मारण्यांत तो पटाईत होता. तरुण सैनिकाला तो फार आवडला.

"तूं फार चांगला आहेस." तो सैनिक त्या तरुणाला म्हणाला होता व ते शब्द ऐकल्यावर युद्ध सुरू झाल्याचं त्या तरुणाला वाईट वाटलं होतं.

अनेक जुन्या सैनिकांनीं त्याला निरनिराळ्या गोष्टी सांगितल्या होत्या. कांहींनीं मोठमोठे कल्ले असलेले शत्रू शिव्यांचा वर्षाव करीत व मोठ्या शौर्यानें तमाखु चघळीत चालून येत असणारांचें दृश्य त्याच्यासमोर उभं केलं होतं तर कांहींनीं शत्रु सारखा भुकेला व फुसक्या गोळ्यांनीं गोळीबार करणारा असल्याचें सांगितलं होतं. कांहींनीं कशाचीहि पर्वा न करतां चाल करून येणाऱ्या शत्रूचं दृश्य रंगविलं होतं व त्या तरुणाच्या डोळ्यांपुढें मोडलेलीं हाडं शरीराबाहेर डोकावीत असलेलीं रक्ताळ शरीरं उभीं राहिलीं होतीं.

तरी त्या जुन्या सैनिकांच्या सर्वच गप्पांवर त्याचा विश्वास बसेना. कारण नव्या रंगरूटांना घाबरवून सोडणें हें त्यांचें नेहमींचंच होतं. ते सांगत होते त्यांत किती थापा होत्या कोणास ठाऊक ! 'नवा मासा' म्हणून ते सारखे त्याच्या अंगावर ओरडत.

मग त्याच्या मनांत आलं कीं एकदां लढायला मिळालं म्हणजे आपण कुणाशीं लढतों ह्याचं महत्त्व नाहीं. आणखी एक अधिक गंभीर प्रश्न होता.

आपल्या फळीवर पडून तो त्या प्रश्नाचा विचार करीत होता. आपण लढाईतून पळून जाणार नाहीं हें तो गणित मांडून स्वतःला पटवून देण्याचा प्रयत्न करीत होता.

ह्यापूर्वी इतक्या गंभीरपणें ह्या प्रश्नावर विचार करायची त्याला वेळ आली नव्हती. आयुष्यांत कांहीं गोष्टी होणारच आहेत, असं जमेला धरून तो वागत आला होता. अंतिम यशावर त्याचा अढळ विश्वास असल्यानें यश कोणत्या साधनांनीं आणि मार्गानें मिळणार आहे ह्याचा विचार त्यानें कधींच केला नव्हता. पण आतां प्रत्यक्ष घडूं पाहणारी गोष्ट त्याच्या समोर होती. आपण लढाई सुरू होतांच एकादे वेळीं पळून जाऊं असं त्याला वाटूं लागलं. लढाईत आपण कसे वागूं ह्याची स्वतःलाच कल्पना नसल्याचं त्यानें स्वतःशीं कबूल केलं. एरवीं 'वेळ आली म्हणजे पाहूं' असं म्हणून त्यानें हा प्रश्न मनांतून दूर केला असता पण आतां त्यावर गंभीरपणें विचार करायची वेळ आली होती.

त्याला भीति वाटूं लागली. जेव्हां त्यानें कल्पनेनें प्रत्यक्ष लढाईचं दृश्य नजरेसमोर उभं केलं तेव्हां कांहींतरी भयंकर होण्याची शक्यता त्याला दिसूं लागली. भावी भयंकर प्रसंगांची चाहूल त्याला लागली व त्या सर्वांना आपण खात्रीनें तोंड देऊं असं त्याला वाटेना. आपण लढाईत खूप शौर्य गाजविलं आहे व आपली तलवार मोडली असतांहि आपण लढत आहोंत अशीं दृश्यं पूर्वी त्याच्या नजरेसमोर दिसत. पण आतां असं कहीं घडणं अशक्य आहे अशी शंका त्याला आली.

तो त्या फळीवरून उठला व येरझारा घालूं लागला. "देवा, मला झालं आहे तरी काय?" त्यानें मोठ्यानें स्वतःला विचारलं.

ह्या कठीण प्रसंगीं जीवनाचे सर्व नियम निरुपयोगी आहेत असं त्याला वाटलं. त्याला स्वतःबद्दलचं जें कांहीं कळलं होतं तें इथें निरुपयोगी होतं. तो अगदीं परका होता. आपली स्वतःचीच आपल्याला नीट ओळख व्हावी म्हणून लहानपणीं स्वतःचा अंदाज आपण घेत होतों तसा पुन्हा अंदाज घ्यावा लागेल असं त्याला वाटूं लागलं. निराशेनें तो ओरडला, 'देवा!'

कांहीं वेळानें त्या बिळासारख्या दरवाजांतून तो उंच सैनिक झोंपडींत आला. मोठमोठ्यानें बोलणारा त्याचा प्रतिस्पर्धीही त्याच्या मागोमगच होता. ते अजूनहि वाद घालीत होते.

तो उंच सैनिक आंत येतां येतां ओरडला, "ठीक ठीक. तुला हवा तर माझ्यावर विश्वास ठेव नाहींतर ठेवूं नकोस. तूं फक्त स्वस्थ बसून राहा म्हणजे लवकरच माझं म्हणणं खरं असल्याचं तुला पटेल."

त्याच्या सहकाऱ्यानें डुकरासारखा विचित्र आवाज काढला व त्याला चांगलं खरमरीत उत्तर काय देतां येईल त्याचा विचार करूं लागला. शेवटीं तो म्हणाला, "तुला साऱ्या जगाचं ज्ञान आहे, नाहीं का ?"

"मी असं म्हणालोंच नाहीं." चटकन् दुसऱ्यानें उत्तर दिलं व तो अनेक वस्तू आपल्या थैलींत भरूं लागला.

येरझारा घालतां घालतां तो तरुण थांबला व थैली भरीत असलेल्या सैनिकाकडे पहात म्हणाला, "लढाई नक्कीच होणार जिम ?"

"अर्थातच" तो उंच सैनिक म्हणाला, "तूं उद्यांपर्यंत थांब नि तुला इतिहासांतली सर्वांत मोठी लढाई पहायला मिळेल. तूं थांबच !"

"बापरे !" तरुण म्हणाला.

"तुला चांगली घनघोर लढाई पहायला मिळेल." तो उंच सैनिक आपण खरोखरीच युद्ध करून दाखवीत आहोंत अशा आविर्भावानें म्हणाला.

"ओऽऽऽ होऽऽ" कोपऱ्यांतून मोठ्यानें ओरडणाऱ्या सैनिकानें सुर काढला.

"पण इतर बातम्यांसारखीच ही बातमी निघाली तर–" तो तरुण म्हणाला.

"तसं होणार नाहीं." तो उंच सैनिक म्हणाला, "तसं होणार नाहीं. घोडदळ आज जायला निघालंच कीं नाहीं ?" हा प्रश्न विचारून विजयी मुद्रेनें तो सभोंवतीं पाहूं लागला. त्याचं म्हणणं कोणींच नाकारलं नाहीं. "घोडदळ आज निघालं." तो पुढें बोलूं लागला, "आतां छावणींत अगदींच थोडं घोडदळ

शिल्लक असेल. ते रिचमंडला का कुठेंतरी जाणार आहेत. आगण शत्रूशीं लढत असतांना त्यांचा असाच कांहींतरी डाव आहे. आपल्या पलटणीला पण हलायची आज्ञा मिळाली आहे. ती आज्ञा पाहिलेल्या एका शिपायानेंच मला सांगितलं. सारी छावणी अधिकाऱ्यांनीं डोक्यावर घेतली आहे. कुणाच्याहि हें सहज लक्षांत येईल."

"च्च् च्" त्या ओरडणाऱ्या सैनिकानें आवाज केला. तरुण सैनिक कांहीं वेळ निःशब्द बसला व शेवटीं त्या उंच सैनिकाला म्हणाला, "जिम्!"

"काय?"

"आपली पलटण कशी लढेल असं तुला वाटतं?"

"ओऽह्, आपले शिपाई एकदां लढायला लागले कीं, चांगले लढतील की!" तो शांतपणें आपलें मत सांगू लागला.

"ते नवे आहेत म्हणून त्यांची टिंगल होते पण मला वाटतं एकदां लढायला लागले कीं, ते चांगले लढतील."

"कुणी पळून जातील असं वाटतं तुला?"

"कांहीं पळून जातीलहि. पण तसे सैनिक प्रत्येक पलटणींत असतातच अन् विशेषतः पहिल्यानेंच लढायला जातांना!" तो समजुतदारपणाचा आविर्भाव आणून म्हणाला, "अर्थात् एकदम धुमश्चक्री सुरू झाली तर प्रथम पुष्कळ जण बाडबिस्तरा घेऊन पळून जातील किंवा जणूं काय आगण खेळतों आहोंत अशा सहजतेनें लढतील. पण नक्की कांहीं सांगतां येत नाहीं. आतांपर्यंत ते कधीं लढाईंत गेलेले नाहींत व पहिल्याच दमांत ते बंडखोरांना कापून काढतील असंहि नाहीं. पण मला वाटतं, इतरांच्या मानानें ते अधिक चांगले लढतील अन् कांहींच्या मानानें ते तितके चांगले लढायचे नाहींत. आपल्या पलटणीला ते 'नवा मासा' म्हणून चिडवीत असतात. पण बहुतेक पोरं चांगल्या घराण्यांतलीं आहेत नि एकदां त्यांनीं बंदुकीचा चाप ओढला कीं ते चांगले लढतील"— शेवटचे शब्द विशेष जोरानें उच्चारीत तो म्हणाला.

"ओ हो ऽ ऽ तुला सगळंच कळतं, नाहीं?" त्या ओरडणाऱ्या सैनिकानें कुत्सित स्वरांत विचारलं.

पण इतर सैनिक त्याच्यावर तुटून पडले व मग एकमेकांवर त्यांनीं शेलक्या शिव्यांचा मारा केला.

तरुण सैनिक अखेरीस मध्यें पडला. "तूं स्वतः पळून जाशील असं नाहीं वाटलं तुला जिम्?" त्यानें विचारलं. प्रश्न विचारून झाल्यावर आपण त्याची थट्टा करीत आहोंत असं भासविण्यासाठीं तो हंसला. तो मोठ्यानें ओरडणारा सैनिकहि "चक् चक्" करूं लागला.

त्या उंच सैनिकानें आपला हात वर उचलला व तो मोठ्या गंभीरतेनें म्हणाला, "मला वाटतं, मला, जिम् कॉकलिनला कांहीं लढाया परवडायच्या नाहींत आणि सर्वच पळून जायला लागले तर मला वाटतं मीसुद्धां पळून जाईन. पण जर एकदा पळायला सुरुवात केली तर मी अगदीं पिसाटासारखा पळत राहीन ह्याबद्दल शंका नाहीं. पण इतर लोक लढत असतील तर मीहि उभा राहून लढेन. हें मात्र नक्की."

"ओ ऽ ऽ ऽ ह्" तो ओरडणारा सैनिक उद्गारला.

आपल्या सहकाऱ्याच्या त्या शब्दांनीं तरुण सैनिकाला बरं वाटलं. अनुभव नसलेल्या सर्व सैनिकांना स्वतःबद्दल फार विश्वास वाटतो असं त्याला वाटत होतं. त्याच्या शब्दांनीं त्याला बराच धीर आला.

## २

त्या उंच सैनिकानें एवढी धावत पळत आणलेली बातमी चुकीची होती हें दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या तरुण सैनिकांच्या लक्षांत आलं. ज्यांनीं त्याच्या बातमीवर काल विश्वास ठेवला होता ते आतां त्याची टींगल करूं लागले व ज्यांनीं अजिबात विश्वास ठेवला नव्हता ते त्यांची निंदा करूं लागले. एकाची व त्या उंच सैनिकाची मारामारी झाली व त्या उंच सैनिकानें दुसऱ्याला चांगलेंच बदडून काढलें.

त्यामुळें आपल्यापुढील प्रश्न सोडवला गेला आहे असं तरुण सैनिकाला वाटलं नाहीं. उलट, होणाऱ्या दिरंगाईमुळें तो अस्वस्थ झाला होता. तें बोलणं झाल्यापासून त्याला स्वतःबद्दल फार काळजी वाटूं लागली होती. आतां त्याच्या डोक्यांत घोळत असलेल्या प्रश्नामुळें तो पुन्हा आपण ह्या निळ्या गणवेषांतल्या घोळक्यापैकींच एक आहोंत असं समजूं लागला.

कित्येक दिवस त्यानें काढलेले सर्व अंदाज चुकले. आपल्याला कांहींच कळत नाहीं असं त्याला वाटलं अन् मग त्यानं असं ठरवलं कीं लढाईच्या हाणा-मारींत एकदां पाऊल टाकल्यावर आपले पाय काय ठरवतील तेंच खरं. स्वस्थ बसून विचार करून त्याच्या प्रश्नाचं उत्तर मिळण्यासारखं नव्हतं हें त्याच्या लक्षांत आलं. जसं एकाद्या शास्त्रज्ञाला एकदां शोध घ्यायला निरनिराळीं रसायनं लागतात तसं आपल्या प्रश्नाचं उत्तर मिळण्याला गोळीबार, लढाई, रक्त आणि धोका ह्यांची गरज आहे असं त्याला वाटलं आणि म्हणून तो संधी मिळायची वाट पाहूं लागला.

पण अशी संधी मिळेपर्यंत त्यानें आपल्या सहकाऱ्यांशीं आपली तुलना करायला सुरुवात केली. त्या उंच सैनिकांच्या शब्दांनीं त्याला बराच धीर आला होता. कारण त्याला तो अगदीं अज्ञानपणापासून ओळखीत होता नि त्याची पुरेपूर माहिती असल्यानें जें आपल्याला करतां येणार नाहीं असं तो कांहीं करूं शकेल असं त्याला वाटत नव्हतं. त्याला स्वतःबद्दल विनाकारण एवढा विश्वास वाटतो असं तरुण सैनिकाला वाटलं. पण मग त्याला अशीहि शंका आली कीं, एरवीं अगदीं शांत वाटणारीं माणसं कांहीं वेळां लढाईत विलक्षण शौर्य गाजवतात तसाच तो उंच सैनिकही असायचा.

आपल्या सारखीच स्वतःबद्दल आणखी कोणाला शंका वाटते कीं काय तें समजून घ्यायची इच्छा त्या तरुण सैनिकाला झाली. अशी तुलना करतां आली असती तर त्याला आनंद झाला असता.

कांहीं सूचक वाक्यं बोलून आपल्या सहकाऱ्यांची मनःस्थिति समजावून घेण्याचा प्रयत्न तरुण सैनिक करी. अशा माणसांचा तो शोध घेऊं लागला. आपल्याला वाटणारी काळजी इतर कुणाला वाटते असं नक्की 'म्हणण्यासारखं

कांहीं त्याच्या कानावर आलं नाहीं. त्याला वाटणारी काळजी स्पष्ट बोलून दाखवितां येईना.

आपल्या स्वतःच्या मनःस्थितीप्रमाणें तो आपल्या सहकाऱ्यांचेकडे पाही. आपले सर्व सहकारी मोठे शूर वीर आहेत असं कांहीं वेळां त्याला वाटे. खरं म्हणजे मनांतल्या मनांत तो इतरांच्यांतले श्रेष्ठ गुण मान्य करी. अदृश्य धैर्यानें निर्भय होऊन जगांत वावरणाऱ्या पुरुषांचें चित्र तो आपल्या मनश्चक्षूंपुढें उभें करी. खरं म्हणजे त्याच्या पुष्कळ सहकाऱ्यांना तो लहानपणापासुन ओळखीत होता तरी त्यांचे गुण आपल्या लक्षांतच आले नाहींत असं त्याला वाटे. ह्या उलट कांहीं वेळां तो त्या सर्व कल्पना झुगारून देई व आपले सर्व सहकारी मनांतल्या मनांत खूप घाबरून गेले आहेत असं समजे.

आपण एकादं नाटक बघणार आहोंत अशा उत्साहानें नि बेपर्वाईनें आगामी लढाईचीं वर्णनं करीत असलेल्या सहकाऱ्यांच्या सहवासांत त्याला पुष्कळदां चमत्कारिक वाटे. ते पक्के थापाडे आहेत अशी शंकाहि त्याला येत असे. पण असे विचार मनांत आले कीं, त्याचा त्यालाच राग येई व आपण मोठा गुन्हा करतों आहोंत असं त्याला वाटे.

त्याच्या ह्या काळजीमुळें तो मनांतून सेनापतींच्या आळसावर चिडे. ते फार ढिले आहेत असं त्याला वाटे. ते त्या नदीच्या वर आरामांत पडले होते नि त्याला वाटणाऱ्या भयंकर काळजीखालीं त्याचं हृदय चिरडूं देत होते. ह्याचा ताबडतोब निकाल लागला पाहिजे असं त्याला वाटे. त्याच्या हृदयावर पडलेलं ओझं तो फार दिवस सहन करूं शकला नसता. पुष्कळदां सेनाधिकाऱ्यांच्यावरचा त्याचा राग इतका अनावर होई कीं, एकाद्या जुन्या सराईत शिपायासारखा तो सबंध छावणीभर त्यांच्यावर टीका करीत हिंडे.

एका पहांटे मात्र सगळी पलटण तयारींत असलेली त्याला दिसली. सैनिक एकमेकांच्या कानांत आपले अंदाज आणि जुन्या आठवणी बोलून दाखवीत होते. उजाडण्यापूर्वीच्या त्या धूसर प्रकाशांत त्यांचे गणवेश जांभळे दिसत होते. नदीच्या लीकडे अजूनहि पेटलेल्या शेकोट्या खदिरांसारख्या लाल झालेल्या डोळ्यांचा

आभास निर्माण करीत होत्या. पूर्वेच्या आकाशांत रविराजाच्या स्वागतार्थ पिवळ्या रंगाचा गालिचा पसरून ठेवल्यासारखा दिसत होता. आणि ह्या सर्व पार्श्वभूमीवर एका प्रचंड घोड्यावर विराजमान झालेली त्यांच्या कर्नलची प्रचंड आकृति उठून दिसत होती.

काळोखांत कुणाच्या तरी पावलांचा आवाज झाला. राक्षसासारख्या दिसणाऱ्या कांहीं हलणाऱ्या आकृति तरुण सैनिकाच्या दृष्टीस पडल्या. पलटण बराच वेळ विश्रांति घेत उभी आहे असं त्याला वाटलं. तो उतावीळ झाला. हें सारं ज्या पद्धतीनें चाललं आहे त्याचा त्याला कंटाळा आला होता. किती वेळ ते आपल्याला वाट पहात उभे करून ठेवणार आहेत ह्याचा त्याला अंदाज येईना

आपल्या भोवतीं पसरलेल्या त्या गूढ शांततेंत त्यांनीं अस्वस्थपणें वळून पाहिलं अन् त्याला वाटलं कीं ह्या शांततेंतच एकदम लढाईचा स्फोट होणार व त्या ज्वाला प्रचंड वेगानें सर्वांना ग्रासून टाकणार. नदीपलीकडील त्या लाल लाल डोळ्यांकडे पाहतांच ते मोठे मोठे होत आहेत असं त्याला वाटूं लागलं. त्याचं लक्ष कर्नलकडे गेलं. तो आपला प्रचंड हात वर उचलून मिशीला पीळ देत होता.

अखेरीस टेकडीच्या तळापासून येणाऱ्या रस्त्यावर घोड्याच्या टापांचा आवाज ऐकायला आला. निघायच्या आज्ञा कोणीतरी घेऊन येत असावें. तो पुढें वाकला. त्याचा श्वास जणूं कोंडला होता. घोड्यांच्या टापांचा आवाज अधिकाधिक स्पष्ट ऐकूं येत होता. त्या टापांचे आघात जणूं काय आपल्या हृदयावरच होत आहेत असं त्याला वाटलं. शेवटीं तो घोडेस्वार कर्नलसमोर आला व लगाम खेंचून त्यानें घोडा थांबविला. दोघे आपसांत कांहींतरी बोलले. तें ऐकण्यासाठीं समोरच्या रांगेंतील सैनिकांनीं आपल्या माना उंचावल्या.

तो घोडेस्वार जाण्यासाठीं वळला. पण जातां जातां थांबून ओरडून कर्नलला म्हणाला, “ माझ्या चिरुटांच्या पेटीची आठवण ठेव हं.”

उत्तरादाखल कर्नल कांहींतरी पुटपुटला. चिरुटाच्या पेटीचं लढाईंत काय काम आहे तें तरुण सैनिकाला कळेना.

पुढच्याच क्षणीं ती पलटण काळोखांत चालूं लागली. जणूं कांहीं हजारों

पावलांचा एकादा अजस्र प्राणी काळोखांत सरपटत चालला होता. हवा थंड व दंवामुळें दमट झालेली होती. सैनिकांचीं पाऊलें ओल्या गवतावर पडलीं कीं तें रेशमासारखें वाटे. मधूनच एकाद्याच्या शस्त्राचा आवाज ऐकूं येई व रस्त्यावरून फरपटत ओढीत नेत असलेल्या तोफा नाराजीनें कुरकुर करीत.

चालतां चालतां माणसें आपला अंदाज दुसऱ्याला सांगत होती. दबलेल्या आवाजांत ते एकमेकांशीं चर्चा करीत. एकदां एक मनुष्य खालीं पडला व आपली पडलेली बंदूक उचलण्यासाठीं जेव्हां त्यानें आपला हात पुढें केला तेव्हां मागून येणाऱ्या त्याच्या सहकाऱ्याचा पाय त्याच्या हातावर पडला. त्याचा हात चेंगरतांच त्यानें शिव्या देण्यास सुरुवात केली. त्याचे सहकारी दबल्या आवाजानें हंसले.

त्यांच्या पाठीमागून उगवत्या दिवसाचा सोनेरी प्रकाश पसरत होता. जेव्हां सूर्यकिरण जमिनीवर पसरले तेव्हां दोन काळ्या सरपटणाऱ्या रांगा वळसे घेत घेत एकमेकांपासून टेकडीआड नाहींशा होत चाललेल्या तरुण सैनिकाच्या नजरेस पडल्या.

आपला अंदाज बरोबर असल्याचें उंच सैनिकानें जाहीर करतांच इतर अनेकांनीं आपले अंदाजही बरोबर ठरल्याचें सांगून टाकलं. उंच सैनिकाचा अंदाज मुळींच खरा नाहीं असं सांगणारे कांहींजण होते. त्यांनीं आपलं म्हणणं पुढें मांडलं व मग त्यांची आपसांत चर्चा चालू झाली.

तरुण सैनिकानें त्यांत भाग घेतला नाहीं. सहजपणें त्या रांगेंत चालत असतांना तो आपल्या प्रश्नावरच विचार करीत होता. तो खिन्न झाला होता व आजूबाजूला बघत होता. समोरून लवकरच गोळीबाराचा आवाज ऐकायला येईल ह्या अपेक्षेनें तो समोर बघत होता.

ते प्रचंड सर्प सरपटत एका टेकडीमागून दुसरीकडे चालले होते. उजव्या बाजूला काळसर रंगाचा धुळीचा लोट उठला होता. वर स्वच्छ निळं आकाश होतं.

आपल्यासारख्याच भावना दुसऱ्या कुणाच्या चेहेऱ्यावर दिसतात कीं काय तें तो तरुण सैनिक निरखून पहात होता. त्याची निराशा झाली. जुने अनुभवी

सैनिक मोठ्या आनंदानें चालले होते व त्याचा परिणाम म्हणून कीं काय नवेहि त्यांच्या आनंदांत सहभागी झाले होते. आपल्याला निश्चित् विजय मिळालेला आहे अशा विश्वासानेंच ते बोलत होते. उंच सैनिकाचाहि जय झाला. ते शत्रूच्या पिछाडीला जाणार होते. शत्रूचा धुव्वा उडवायला आपण जात आहोंत असं समजून मागें नदीकिनाऱ्यावर राहिलेल्या सैन्याबद्दल कींव व्यक्त करीत होते.

सैनिक आपसांत आनंदानें गप्पा मारीत असतां आपण त्यांच्यापेक्षां निराळे आहोंत असं तरुण सैनिक समजत होता. पलटणींतले विनोदी सैनिक बोलून इतरांना हंसवीत होते. हास्याच्या लहरींवर ताल धरून त्यांचीं पाऊलें पडत होतीं.

उंच सैनिकाची टिंगल करण्यासाठीं विनोदी बोलून त्या ओरडणाऱ्या सैनिकानें इतरांना इतकें हंसवलें कीं पोट धरधरून रांगाच्या रांगा हंसत सुटल्या.

थोड्या वेळांतच आपण कशाकरितां चाललों आहोंत तें विसरून पलटणीच्या पलटणी एकमेकांकडे पाहून हंसू लागल्या.

रस्त्यांत एका घराच्या अंगणांत बांधलेला एक घोडा चोरून न्यायचा प्रयत्न एका लठ्ठ सैनिकानें केला. आपली सामानाची थैली त्याच्यावर लादायचं त्यानें ठरविलं. तो घोडा घेऊन बाहेर पडत असतांनाच एक तरुण मुलगी घरांतून धांवत आली व तिनें घोड्याची आयाळ घट्ट पकडून ठेवली. त्या दोघांची थोडी झटापट झाली. पण ती गुलाबी गालांची नि मोठाल्या चमकदार डोळ्यांची पोरगी धीरानें घोडा धरून उभी राहिली.

रस्त्याच्या कडेला विश्रांति घेत असलेल्या पलटणींतले लोक सारा प्रकार पहात होते. त्या सर्वांनीं एकदम त्या पोरीची बाजू घेतली. त्या भांडणांत ते इतके रंगून गेले कीं लढाई विसरून त्यांनीं त्या लठ्ठ सैनिकाची टिंगल करायला सुरुवात केली व मोठ्या उत्साहानें त्या तरुण मुलीला पाठिंबा दिला.

"त्याला काठीनें बडवून काढ." कुणीतरी दूर अंतरावरून तिला सूचना केली.

जेव्हां घोडा सोडून त्याला माघार घ्यावी लागली तेव्हां सर्वांनीं ओरडून त्या मुलीचं अभिनंदन केलं आणि त्या लठ्ठ सैनिकाची टिंगल केली.

रात्र पडली तेव्हां रांगांतील पलटणींनीं निरनिराळ्या जागीं छावण्या टाकल्या. तंबू उभे राहिले, लाल शेकोट्या फुललेल्या फुलासारख्या सर्वत्र दिसूं लागल्या.

शक्य होईल तेवढा तरुण सैनिक इतरांना टाळून एकटा राहूं लागला. रात्रीं काळोखांत तो एकटाच थोडा दूर गेला. रात्रीच्या काळोखांत पेटलेल्या शेकोट्यांच्या समोरून चालणाऱ्या माणसांच्या काळ्या आकृती बघून त्याला अधिकच उदास वाटूं लागलं.

तो गवतांत लोळला. गवताचीं कोंवळीं लुसलुशीत पानें त्याच्या गालांना गुदगुल्या करीत होतीं. चंद्र उगवून एका झाडाच्या शेंड्यावर आला होता. रात्रीच्या त्या काळोखांत गुरफटला जाऊन तो अधिकच उदास झाला. वाऱ्याची झुळूक त्याला हळूवार स्पर्श करून जाई. पण इतरत्र पसरलेला काळोख त्याच्या दुःखाबद्दल त्याला सहानुभूति दाखवण्यासाठींच पसरला आहे असें त्याला वाटलं.

आपल्या घरीं आपण असतों तर कितीतरी बरं झालं असतं असं त्याच्या मनांत आलं. घरांतून बखळींत आणि बखळींतून शेतावर व शेतावरून पुन्हा घरीं अशा आपण कितीतरी फेऱ्या मारल्या असत्या. कित्येकदां तो गाईवर विलक्षण चिडला होता व दूध काढण्यासाठीं ठेवलेल्या लाकडी घडवंच्या त्यानें भिरकावून दिल्या होत्या. पण आतां त्या गाईंचे चेहेरे त्याला आठवले व त्या चेहेऱ्यांची सुखद आठवण होतांच काय वाटेल ती किंमत देऊन घरीं जावं असं त्याला वाटूं लागलं. आपला जन्म सैनिक होण्यासाठीं नाहीं असं त्यानें स्वतःला बजावून सांगितलं. त्या शेकोट्यांच्या भोंवतीं उड्या मारणाऱ्या सैनिकांत व आपल्यांत किती फरक आहे हें लक्षांत येतांच त्याला बरं वाटलं.

त्याच्या डोक्यांत हे विचार चालू असतांच गवतांत आवाज झाला म्हणून त्यानें वळून पाहिलं. मोठ्यानें ओरडणारा सैनिक आला होता. "ओह्ऽऽऽविल्सन" तो ओरडला.

त्यानें वळून पाहिलं व विचारलं, 'कोण? हेन्री तूं? इथें काय करतोस?'

"विचार करतोंय्." तरुण सैनिक म्हणाला.

ओरडणारा सैनिक खालीं बसला व काळजीपूर्वक त्यानें आपला पाइप पेटवला. " तूं अगदीं थकून गेलेला दिसतोस. काय झालं तुला ? "

" कांहीं नाहीं. " तरुण सैनिक म्हणाला.

ह्यावर ओरडणाऱ्या सैनिकानें आगामी लढाईचं वर्णन करायला सुरुवात केली. " आपण त्यांना आतां चागलं पेचांत धरलंय्ं " तो म्हणाला. त्याच्या चेहेऱ्यावर आनंद दिसत होता. त्याचा आवाज़हि आनंदानें खणखणीत वाटत होता. " आतां आपण त्यांना चांगलं पेचांत धरलंय् आणि देवाशपथ आपण त्यांचा पराभव करूं. "

" खरं असं आहे, " तो पुढें म्हणाला, " आतांपर्यंत प्रत्येक वेळीं शत्रूनं आम्हांला मार दिला. पण आतां मात्र खात्रीनं सांगतों, आपण त्यांना चांगलं पिटून काढूं "

" ह्या मोहिमेला तुझा विरोध होता असं मला वाटतं. " शांतपणें तरुण सैनिकानें विचारलं.

" तसं नाहीं " ओरडणारा सैनिक म्हणाला., " माझी चालून जायला हरकत नाहीं. पण चालून गेल्यावर शेवटीं लढाई झाली पाहिजे. उगीचच इथून तिथें नि तिथून आणखी कुठेंतरी भटकत रहायला माझी हरकत आहे. त्यानें फार झालं तर पाय दुखतात नि खायला कमी मिळतं; पण ह्यापेक्षां दुसरं कांहींच चांगलं होत नाहीं. "

" गिम कॉंकलिन् म्हणतो ह्यावेळीं आपल्याला खूप लढायला मिळेल. "

" त्याचं म्हणणं एकदा तरी खरं ठरलं असं दिसतंय्. ह्यावेळीं आपण चांगली झुंज देणार आहोंत. आतां परिस्थिति आपल्याला अनुकूल आहे. आपण नक्की त्यांना मारूं. "

तो उठून अस्वस्थपणें इकडे तिकडे येरझारा घालूं लागला. त्याच्या उत्साहा-मुळें त्याला विलक्षण स्फूर्ति आली होती. त्यामुळें तो भराभर चालत होता. तो सडसडीत अंगाचा, कणखर होता. आणि आपल्याला जय मिळणार ह्यावर त्याचा

पक्का विश्वास होता. येणाऱ्या काळाकडे तो विश्वासानें नि अभिमानानें बघत होता. बोलतांना तो एकाद्या कसलेल्या सैनिकासारखा शिव्या देई.

तरुण सैनिकानें त्याचेकडे कांहींक्षण निरखून पाहिलें. अखेरीस अतिशय कडू आवाजानें तो म्हणाला, "तूं मोठी बहादुरी गाजवणार आहेस नाहीं?"

ओरडणाऱ्या सैनिकानें आपल्या पाइपाचा एक छान झुरका घेऊन धुराचा लोट सोडला.

"मला माहींत नाहीं." तो म्हणाला, "पण निदान इतरांच्यासारखा तरी मी नक्की लढेन. मी वाटेल तें करून तसा प्रयत्न करीन." आपण फार नम्रतेनें बोलत आहोंत अशी त्यानें स्वतःची समजूत करून घेतली व त्याला अतिशय समाधान वाटलें.

"वेळ आली म्हणजे तूं पळणार नाहींस हें कशावरून?" तरुण सैनिकानें विचारलें.

"पळणार?" ओरडणाऱ्या सैनिकानें जोरानें ओरडून विचारलें, "मुळींच नाहीं, अशक्य."

"पुष्कळांना लढाईपूर्वी आपण खूप मोठें शौर्य गाजवणार आहोंत असं वाटत असतं. पण-जेव्हां प्रत्यक्ष लढाईची वेळ येते तेव्हां ते पळून जातात." तरुण सैनिक म्हणाला.

"तुझं म्हणणं खरं आहे." ओरडणारा सैनिक म्हणाला., "पण मी पळून जाईन अशी जर कुणीं पैज मारली तर त्याला आपले पैसे हरावे लागतील."

"ओ ऽ ऽ ऽ जाऊं दे" तरुण सैनिक म्हणाला., "तूं कांहीं जगांतला सर्वांत शूर सैनिक नाहींस."

"नाहीं." ओरडणारा सैनिक रागानें म्हणाला "अन् मी तसं कधी म्हणालोंच नाहीं. मी लढणार आहें एवढंच मी म्हणालों. अन् मी लढणार आहें. पण तूं कोण आहेस? आपण नेपोलियन बोनापार्ट आहोंत असं समजून तूं बोलतोस!" त्यानें रागानें त्या तरुण सैनिकाकडे कांहीं काळ रोखून पाहिलं आणि मग लांब लांब टांगा टाकीत तो तिथून निघून गेला.

तरुण सैनिक त्याच्याकडे वळून जोरानें ओरडला, " तुला इतकं रागवायला काय झालं ? " पण त्या ओरडणाऱ्या सैनिकानें मागें वळूनसुद्धां पाहिलं नाहीं. तो जोरजोरानें चालत निघून गेला.

तरुण सैनिकाला पुन्हा एकटं एकटं वाटूं लागलं. आपल्या व त्याच्या भावनांत मुळींच साम्य नाहीं हें पाहून त्याला अधिकच वाईट वाटूं लागलं. आपल्याला पडलेल्या प्रश्नाएवढा भयंकर प्रश्न कुणालाच पडलेला नाहीं असं मनांत येऊन आपण मनानें इतरांपेक्षां कमी प्रतीचे आहोंत असं त्याला वाटलं.

तो तंबूंत गेला व मोठमोठ्यानें घोरत असलेल्या उंच सैनिकाच्या जवळ जाऊन झोंपला. काळोखांत त्याला अनेक दृश्यें दिसूं लागलीं. सहस्र जिव्हांनीं भीति आपल्याला ग्रासून टाकीत आहे नि इतर सैनिक मात्र शांतपणें लढत आहेत असें त्याला दिसलें. ह्या भीतीच्या अजस्र प्राण्याशीं आपण सामना देऊं शकणार नाहीं असं त्यानें स्वतःशीं कबूल केलं. आपल्या शरीरांतील नसन् नस लढाईच्या आवाजानें हलून निवेल व इतर सैनिक मात्र बेदिक्कतपणें लढत राहतील असं त्याला वाटलं.

ह्या विचारांनीं त्याला घाम फुटला. त्याच्या कानावर कुणाचेतरी शब्द येऊं लागले. "तो पळून जाणार. मी पांच रुपयांची पैज मारतों." " सहा रुपये " " सात रुपये. "

तंबूच्या कापडी भिंतीवर बाहेरच्या शेकोटीच्या ज्वालेच्या पडलेल्या प्रकाशाकडे तो डोळे ताणून पाहूं लागला. अखेरीस त्या विचारांनीं थकून तो झोंपीं गेला.

# ३

रात्रीं तरंगत्या पुलावरून त्या पलटणीनें नदी ओलांडली. पेटलेल्या शेकोट्यांमुळें नदीचें पाणी तांबूस दिसत होतें. रातकिड्यांच्या आवाजाचं संगीत चालू होतं. पलीकडच्या किनाऱ्यावर आकाशाला टेकून डोंगरांच्या रांगा उभ्या होत्या.

नदी ओलांडल्याबरोबर समोरील डोंगरावरून किंवा झाडींतून शत्रु आपल्यावर अचानक हल्ला करणार असं तरुण शिपायाला वाटूं लागलं. तो डोळे फाडून त्या काळोखांत पाहूं लागला.

पण त्याची पलटण सुरक्षितपणें आपल्या छावणीच्या जागीं पोंचली व शांतपणें झोंपली. सकाळीं लवकर उठून त्यांना झाडीच्या दिशेनें पुन्हा चालायला लागलं. रस्ता अगदीं लहान होता. ह्या हालचालींत त्या पलटणीचा नवखेपणा नाहींसा होऊं लागला. आपण किती मैल चाललों ह्याचं शिपाई हाताचीं बोटं मोजून गणित करूं लागले. " थोडं खाणं नि पायाला घट्टे—आमच्या वाट्याला एवढंच. " ओरडणारा सैनिक पुटपुटला.

सगळ्यांचीं शरीरं घामाळलेलीं होतीं. प्रत्येकजण पुटपुट करूं लागला. हळु हळू आपल्या सामानाच्या पिशव्यांतील सामान ते कमी करूं लागले. कांहींनीं रागारागानें सामानाच्या पिशव्या फेंकून दिल्या तर कांहींनीं पुन्हा परत जातांना आपण त्या उचलून नेऊं अशा समजुतीनें काळजीपूर्वक लपवून ठेवल्या. अंगांतले जाडे ऊबदार सदरे ते काढूं लागले. शेवटीं त्यांच्याजवळ फक्त जरूरीपुरते कपडे, दारूगोळा, शस्त्रें व प्यायच्या पाण्याच्या बाटल्या एवढंच राहिलं. " आतां खायचं नि लढायचं " तो उंच सैनिक म्हणाला.

आतां ती पलटण खऱ्या अर्थानें हलकी झाली होती. पुष्कळ चांगलं सामान त्यांना रस्त्यांत टाकावं लागलं.

पण ती पलटण जुन्या पलटणीसारखी दिसत नव्हती. जुन्या पलटणींतलीं माणसं छोट्या छोट्या टोळ्या करून राहतात. जेव्हां कांहीं जुन्या सैनिकांनीं ह्या पलटणीची लांबच लांब रांग पाहिली होती तेव्हां त्यांनीं त्यांना चिडविण्यासाठीं "कुठलं सैन्य चाललंय हें?" म्हणून विचारलं होतं. मग एकानें उत्तर दिलं, "ही पलटण आहे, सैन्य नाहीं." अन् त्यावर तो जुना सैनिक हंसून म्हणाला, "देवा, देवा!"

शिवाय ह्या पलटणींतल्या सर्व सैनिकांच्या टोप्या सारख्या दिसत होत्या. जुन्या पलटणींतल्या सैनिकांच्या टोप्या पाहिल्या कीं त्यांचा इतिहास कळावा इतक्या त्या निरनिराळ्या असत. तसंच झेंड्याचं. झेंड्याचा रंग विटून गेला कीं ती पलटण जुनी समजावी. ह्या पलटणीचा झेंडा तर कोरा करकरीत होता!

त्या पलटणीनें पुन्हा छावणी टाकली. पुन्हा तेंच तें आयुष्य सुरू झालं. तरुण सैनिक आपल्या कल्पनांत दंग झाला.

पण एके दिवशीं सकाळीं उंच सैनिकानें त्याला लाथ मारून उठवलं नि पुरी जाग येण्यापूर्वींच तो पळत सुटला. त्याच्या भोंवतीं धापा टाकीत माणसं पळत होतीं. त्याचं पाणी प्यायचं भांडं सारखं त्याच्या ढुंगणावर आदळून लयबद्ध आवाज करीत होतं. त्याच्या पाठीवरची पिशवी सारखी हलत होती. त्याची बंदुक प्रत्येक पावलाबरोबर हलायची नि त्याच्या टोपीला ढकलून द्यायची.

माणसं आपसांत कुजबूजत होतीं.

"काय झालं?" "आपण असे पळत कां सुटलों?"

"त्यांना एवढं घाई करायला काय झालं?"—अन् मग मध्येंच एक एक सैनिक ओरडला, "बिली, माझ्या पायावर पाय देऊं नकोस. एकाद्या बैलासारखा पळतोयस तू."

दूर अंतरावरून बंदुकांचे आवाज ऐकूं येऊं लागले.

तरुण सैनिक गोंधळून गेला. आपल्या सहकाऱ्यांबरोबर पळतां पळतां तो विचार करायचा प्रयत्न करूं लागला पण त्याच्या मनांत सध्यां पळण्याचाच विचार होता. आपण पळतांना पडलों तर इतरांच्या पायांखालीं तुडवले जाऊं हें

त्याला माहीत होतं नि म्हणून समोर येणारे अडथळे ओलांडून जोरानें पळण्यांत त्याचं सारं लक्ष गुंतलं होतं. तो जमाव आपल्याला उचलून घेऊन जात आहे असं त्याला वाटलं.

ऊन्ह पडलं तेंव्हां जमिनींतून उगवल्यासारखे सगळीकडे सैनिकच सैनिक दिसूं लागले. 'आतां वेळ आली' असं तरुण सैनिकाला वाटलं. आतां आपली परीक्षा होणार. ती परीक्षा समोर दिसूं लागतांच आपण एक अगदीं लहान मूल आहोंत असं त्याला वाटूं लागलं. त्यानें आजूबाजूला पाहिलं.

पळून जाणं अशक्य आहे हें त्याच्या ताबडतोब लक्षांत आलं. तो त्या पलटणींत अडकला होता. कायदे, नियम आणि परंपरा ह्यांनीं आपल्याला अगदीं जखडून टाकलं आहे नि त्या अवस्थेंत आपण एका हलत्या पेटींत अडकलों आहोंत असं त्याला वाटूं लागलं.

हें सत्य कळतांच त्याला वाटलं, आपल्याला कधींच लढाईवर यायला नको होतं. आपण स्वतः होऊन भरती झालों नाहीं असं त्याला वाटूं लागलं. क्रूर सरकारनें त्याला खेंचून आणलं होतं अशी त्याची समजूत झाली. आणि आतां ते त्याची कत्तल करायला त्याला घेऊन जात होते!

पलटण एका ओढ्याच्या किनाऱ्यावरून उतरली व ओढा ओलांडून पुढें गेली. ओढ्याचा संथ प्रवाह सुतकी वाटत होता व त्या प्रवाहावरील बुडबुडे डोळ्यासारखे त्या सैनिकांचेकडे पहात होते.

ओढ्याच्या पलीकडे जाऊन ते टेकडी चढूं लागले. तरुण सैनिक उत्सुकतेच्या भरांत आपले सारे विचार विसरला. मोठ्या वेगानें तो टेकडी चढला.

आपल्याला लढाई पहायला मिळेल असं त्याला वाटलं होतं.

झाडीच्या अधूनमधून कांहीं शेतं होतीं. झाडींतून पळत जाणारे व अधून मधून गोळीबार करणारे कांहीं सैनिक त्याच्या नजरेस पडले. एका शेताच्या टोकाशीं युद्धरेषा होती. तिथं एक झेंडा फडफडत होता.

किनाऱ्याची दरड चढून दुसऱ्या पलटणी आल्या. सर्वांची मिळून एक

ब्रिगेड तयार झाली व लढाईसाठीं सिद्ध होऊन त्या झाडींत दिसणाऱ्या सैनिकांच्या पिछाडीचे दिशेनें हलूं लागले. त्या झाडींतले सैनिक सतत हलत होते.

तें सर्व पाहून घ्यायचा प्रयत्न तरुण सैनिक करीत होता. नि त्या भरांत त्याला लागणाऱ्या झाडांच्या फांद्या त्याला दिसेनात. लक्ष नसल्यानें त्याचे पाय सतत कशाला तरी अडखळत होते.

तो त्या झाडींतल्या सैनिकांचा विचार करूं लागला. त्या झाडींत असलेल्या गोळ्यांच्या आवाजांत त्याला कुठें तरी लपलेलं दुःख ऐकायला येऊं लागलं.

एका सैनिकाचं प्रेत त्यांना दिसलं आपल्या पाठीवर पडून आकाशाकडे तो बघत होता. किंचित् पिंवळसर् भासणारा तांबूस रंगाचा गणवेश त्याच्या अंगावर होता. त्याचे बूट झिजून झिजून त्यांचे तळवे कागदासारखे पातळ झाले आहेत हें तरुण सैनिकाच्या नजरेंतून सुटलें नाहीं. एका ठिकाणीं ते फाटले होते व त्यांतून त्याचा पाय बाहेर आला होता. जणूं नशिबानें त्याला दगा दिला होता. जन्मभर इतरांपासून लपवलेलं दारिद्र्य आतां मरणानंतर उघडं पडलं होतं.

तें प्रेत टाळून बाजूनें ते चालूं लागले. तरुण सैनिकानें त्या प्रेताच्या चेहऱ्याकडे पाहिलं. वाऱ्यामुळें त्या प्रेताची दाढी हलत होती. जणूं काय हातानें तो आपली दाढी कुरवाळीत होता. त्या प्रेताच्या भोंवतीं भोंवतीं फिरावं असं त्या तरुण सैनिकाला वाटूं लागलं. आपल्याला पडलेल्या प्रश्नांचं उत्तर त्या मृत डोळ्यांत शोधायची त्याला इच्छा झाली.

पलटणीबरोबर चालत असतांना तरुण सैनिकाला सुरुवातीला वाटत असलेला उत्साह हळुहळू नाहींसा झाला. त्याची उत्सुकता शांत झाली होती. तो टेकडीवर चढून आला तेव्हां जर घनघोर युद्ध चालू असतें तर तो कदाचित् त्या धुमश्चक्रींत मोठ्या आवेशानें मिसळला असता. पण हें रान तुडवीत जाणं फारच थंड होतं. विचार करायला त्याला खूप वेळ मिळत होता.

चमत्कारिक कल्पनांनीं त्याच्या डोक्यांत गर्दी केली. आपल्याला हा देखावा आवडत नाहीं असं त्याला वाटूं लागलं. तो सर्व देखावा आपल्याला धमकावीत आहे असं त्याला वाटूं लागलं. त्याला भीति वाटूं लागली.

दूरच्या एका शेतांत दिसणाऱ्या एका घराची त्याला भीति वाटू लागली. झाडांच्या दाट छाया पडलेल्या दिसत होत्या. त्यांत आपले शत्रु लपून बसले आहेत अशी त्याला खात्री होती. आपले सेनापति काय करताहेत तें त्यांचं त्यांनाच कळत नाहीं असं त्याला एकदम वाटूं लागलं. तो सांपळा होता. त्या जंगलांतून एकदम गोळीबार सुरू होणार होता. शत्रु सैनिकांच्या लाटांच्या लाटा एकदम त्यांच्या पिछाडीवर तुटून पडणार होत्या. सर्वांची *कत्तल होणार होती. सगळे सेनापति मूर्ख होते. आ वासून शत्रु त्या सर्व सैन्याला गिळून टाकणार होता. लपून छपून आपल्या मागोमाग येणारा मृत्यु दिसतो कीं काय तें पहाण्या-साठीं त्यानें भोंवतीं पाहिलं.

रांगेबाहेर पडावं आणि आपल्या सहकाऱ्यांना ओरडून सांगावं असं त्याला वाटूं लागलं. ते असेच चालले तर मेंढरासारखे मारले जातील नि त्याला तें टाळायचं होतं. त्या कत्तलखान्यांत आपले सैनिक पाठवणारे सेनापति नक्कीच महामूर्ख होते. फक्त त्याच्या दोन डोळ्यांनाच तें संकट स्पष्ट दिसत होतं. रांगेबाहेर येऊन हें सारं सगळ्या सैनिकांना सांगावसं त्याला वाटूं लागलं. एक व्याख्यान द्यावंसं त्याला वाटूं लागलं नि आवेशपूर्ण शब्द त्यांच्या जिभेवर येऊं लागले.

पलटणीची रांग चढउतारावरून चालत होती. तरुण सैनिकानें आपल्या जवळच्या सैनिकांचे चेहेरे निरखून पाहिले. आपण कांहीं नवें पहात आहोंत असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर होता. एकदोघे तर लढतच आहोंत अशा अविर्भावानें चालत होते. बाकीचे आपण एखाद्या गोठलेल्या नदीच्या बर्फाच्या पापुद्र्यावरून चालतों आहोंत अशा आविर्भावानें चालत होते. नवीं माणसं शांत दिसत होतीं. ते लढाई प्रत्यक्ष पाहणार होते. त्या विचारांत ते दंग झाले होते.

त्यांचेकडे पाहतांच आपला आवेश तरुण सैनिकानें गिळून टाकला. त्या सर्वांना भीति वाटत असली तरी तो कांहीं बोलला असता तर ते त्याला हंसले असते. त्याच्या अंगावर त्यांनीं हातांत येईल तें फेंकून मारलं असतं.

हें त्यांच्या लक्षांत आलं. शांतपणें, न बोलतां, आपल्यावरील जबाबदारी पार पाडणाऱ्या माणसासारखं त्याला वाटूं लागलं. तो खिन्नपणें आकाशाकडे पाहूं

लागला व इतरांच्या मागें पडला. त्यांच्या तुकडीचा लेफ्टनंट त्याला तरवारीनें ढुसणी देत जेव्हां ' पुढं हो, असं मागं पडून इथं चालणार नाहीं ' असं ओरडूं लागला तेव्हां त्याला आश्चर्य वाटलं. घाईघाईनें तो रांगेंत आला. आपल्या तरल भावनांची त्या लेफ्टनंटला किंमत नाहीं ह्यांचा त्याला राग आला. निव्वळ राक्षस होता तो.

कांहीं वेळानें त्यांच्या ब्रिगेडला विश्रांति देण्यांत आली. झाडींतले सैनिक अजूनहि एकमेकांवर गोळ्या झाडीत होते. त्यांच्या बंदुकांतून निघणारा धूर झाडींत स्पष्ट दिसत होता.

ह्या विश्रान्तीच्या वेळांत बऱ्याच सैनिकांनीं आपल्या समोर दगडमाती एकत्र करून मोठाले ढीग उभे करावयास सुरुवात केली. कांहींचे ढीग मोठे होते कांहींचे लहान होते.

ह्यामुळें सैनिकांत पुन्हा चर्चा सुरू झाली. कांहींना वाटत होतं कीं लढायचं म्हणजे ताठ उभं राहून, द्वंद्व युद्ध करतात तसं लढलं पाहिजे. असे संरक्षक मार्ग स्वीकारणें त्यांना नापसंत होतं. इतरांनीं त्यांना सणसणीत उत्तर दिलं व बाजुला जुने अनुभवी सैनिक खोदीत असलेल्या खड्डयांकडे बोट दाखविलं. थोड्याच वेळांत त्या सैनिकांच्या भोंवतीं एक छोटी तटबंदीच उभी राहिली पण लगेच त्यांना तिथून हलण्याची आज्ञा मिळाली.

ह्याचं तरुण सैनिकाला फार आश्चर्य वाटलं. "मग त्यांनीं आम्हाला इथें आणलंच कशाला" ? त्यानें उंच सैनिकाला विचारलं. उंच सैनिकानें मोठ्या कौशल्यानें आपली तटबंदी उभी केली होती तरी आपल्याला इथून का निघालं पाहिजे ह्याचा लांबलचक खुलासा तो देऊं लागला.

दुसऱ्या जागीं ते थांबले तेव्हां सैनिकांनीं तशीच तटबंदी उभारायला सुरुवात केली. दुपारची जेवणाच्या वेळेपर्यंत ते तिसऱ्या तटबंदीमागें पोंचले होते पण जेवण संपल्यावर ती जागाहि त्यांना सोडावी लागली. त्यांना अनिश्चित-पणें जागोजाग हलविण्यांत आलं.

लढाईंत माणूस संपूर्ण बदलतो असं तरुण सैनिकाला सांगण्यांत आलं

होतं. असा बदल झाला तर आपलं बरं होईल असं त्याला वाटलं. त्यामुळें लढण्यासाठीं वाट पहात बसणें त्याला असह्य झालं होतं. तो उतावीळ झाला होता. सेनापतींना कांहींच कळत नाहीं असें त्याला वाटूं लागलं. तो उंच सैनिकाला म्हणाला, “ हें असं जास्त वेळ सहन करणं मला शक्य नाहीं. विनाकारण पाय दुखवण्यांत आपला काय फायदा होतो कुणास ठाऊक.” त्याला छावणींत परत तरी जायचं होतं किंवा लढून आपण शूर आहोंत हें सिद्ध तरी करायचं होतं.

“ हं ! ” उंच सैनिक म्हणाला.

“ असं भटकत विनाकारण पाय दुखविण्यापेक्षां दुसरं कांहींहि करणं मला आवडेल. ”

“ मलासुद्धां. ” ओरडणारा सैनिक म्हणाला, “ह्या सैन्याच्या अधिकाऱ्यांना कांही अक्कल असती......”

“ चूप बस. ” उंच सैनिक ओरडला, “ शिपाई होऊन तुला सहा महिने झाले नाहींत अन्......

“ कांहीं झालं तरी मला लढायचंय. मी कांहीं नुसता चालायला इथं आलों नाहीं. मला नुसतं चालायचंच असतं तर घरीं मी शेतांभोंवतीं चालत सुटलों असतों.

रागारागानें विष गिळल्यासारखं उंच सैनिकानें एक सँडविच गिळून टाकलं.

पण खातां खातां त्याचा राग शांत झाला. इतकी चांगली सँडविच असतांना कोण रागावणार ? जेवतांना तो नेहमीं शांत असे.

परिस्थिति बदलली तरी तो शांतपणें सारं स्वीकारी. संधी मिळेल तेव्हां पिशवींतून कांहीं तरी काढून तो खात असे. चालतांना वेग किंवा अंतर ह्याबद्दल तो तक्रार करीत नसे. आपण कौशल्यानें बांधलेल्या तटबंदी त्याला तीनदां सोडाव्या लागल्या तरी त्यानें तक्रार केली नव्हती.

अनुक्रमांक २९६३३
विभाग आ.वा.
क्रमांक ९९०४
नों. दि. ३-४-६१

दुपारनंतर पुन्हा ते सकाळच्या जागीं परत आले. | आतां ह्या देखाव्याची तरुण सैनिकाला भीति वाटेनाशी झाली. तो त्याच्या परिचयाचा झाला होता.

ते पुन्हा नव्या भागांत जातांच त्याला पुन्हा पहिल्यासारखी भीति वाटूं लागली, पण ह्यावेळीं त्यानें तिच्याकडे लक्ष दिलें नाहीं.

मरावं आणि सगळ्या यातनांतून सुटावं असं त्याला :एकदा वाटलं. त्यानें त्या प्रेतांकडे पाहिल्यापासुन त्याला मरण म्हणजे कायमची विश्रांति असं वाटूं लागलं व मरणाबद्दल आपण एवढें अस्वस्थ कां झालों होतों ह्यांचा आश्चर्य वाटलं. मेलों तर आपल्या भावनांची ओळख पटेल अशा जागीं आपण जाऊं. आपल्या नाजुक भावना त्या लेफ्टनंटसारख्या राक्षसाला कळणं शक्य नाहीं.

झाडींत लढणाऱ्या सैनिकांनी बराच वेळ गोळीबार केला. त्या आवाजांत सैनिकांच्या ओरडण्याचा आवाज मिसळला होता. तोफखान्यानें गोळीबार सुरू केला.

झाडींतले सैनिक पडूं लागल्याचं त्याला दिसलं. नि मागोमाग बंदुकांचे आवाज ऐकू आले. थोड्या वेळानें बंदुकांच्या नळींतून निघणाऱ्या ज्वाला दिसू लागल्या. गोळीबाराचा धूर शेतावर हळुहळू एकाद्या निरीक्षकासारखा पसरूं लागला. आतां आवाज वाढूं लागले.

त्याच्या समोरची आणि उजव्या बाजूची ब्रिगेडस् मोठ्यानें रणघोषणा करीत लढूं लागल्या. जणू काय प्रचंड स्फोटच झाला होता. नंतर मात्र त्या धुराआड पांगल्या.

आपला मरायचा बेत विसरून तरुण सैनिक त्या दृश्याकडे डोळे फाडून पाहूं लागला. आपलं तोंड मिटायलासुद्धां तो विसरला.

त्याच्या खांद्यावर कोणींतरी हात ठेवला. आपल्या स्वप्नांतून अचानक जागा होऊन तो ओरडणाऱ्या सैनिकाकडे पाहूं लागला.

"ही माझी पहिली अन् शेवटची लढाई बरं का दोस्त!" ओरडणारा सैनिक दुःखी चेहेऱ्यानें म्हणाला. तो भीतीनें पांढरा फटफटीत पडला होता आणि त्याचे ओठ थरथरत होते.

" अं ? " तरुण सैनिकानें आश्चर्यानें विचारलं.

"ही माझी पहिली आणि शेवटचीच लढाई" तो पुन्हा म्हणाला, " मला असं वाटतंय ...... "

" काय ? "

" मी मरणार असं मला वाटतंय...आणि माझ्या ह्या वस्तू माझ्या घरीं नेऊन दे ......" बोलतां बोलतां त्याला रडं कोसळलं. रडतां रडतां त्यानें पिवळ्या कागदांत गुंडाळलेलं एक पुडकं त्याच्या हातांत दिलं.

" पण कां ? " तरुण सैनिकानें पुन्हा विचारलं.

कांहीं बोलायच्या आधीं थडग्यांतून नजर लावल्यासारखे डोळे करून त्या ओरडणाऱ्या सैनिकानें त्याच्याकडे पाहिलं नि तो निघून गेला.

# ४

एका राईच्या कडेला ब्रिगेड थांबली होती. झाडांच्या मागें लपून सैनिक शेतावर आपल्या बंदुका रोखीत होते. धुरापलीकडचं पाहायचा ते प्रयत्न करीत होते.

ह्या सर्व गोंधळांतून पळणारीं माणसें दिसत होतीं. कांहींजण ओरडून कांहीं माहिती देत होते. कांहीं हातवारे करीत होते.

नव्या पलटणीचे सैनिक त्या सर्वांचेकडे पहात गप्पा मारीत होते. निरनिराळ्या अफवा पसरल्या होत्या.

" पेरीचीं खूप माणसं मेलीं व त्याला माघार घ्यावी लागली. "

" हो. कॅरट हॉस्पिटलमध्यें गेला. तो आपण आजारी आहोंत असं म्हणाला. तो हुशार लेफ्टनंट आतां 'जी' कंपनीचा अधिकारी झाला. पळून जाऊं पण पुन्हा कॅरटच्या तुकडींत येणार नाहीं असं त्याचे लोक म्हणत होते......"

" ह्ॅर्नांचा तोफखाना पडला."

" मुळींच नाहीं. पंधरा मिनिटांपूर्वीं मीं त्यांना पाहिलं.

" अंऽऽऽ"

" जनरल म्हणाले कीं ३०४ चे सर्वाधिकार आपण स्वतः हातीं घेणार आहोंत. आपण असें लढूं कीं त्यांनीं पूर्वीं कधीं अशीं माणसं पाहिलींच नव्हतीं.

" आपल्या डाव्या बगलेवर शत्रु हल्ला करतोय्." असं कुणीं तरी म्हणालं, ".शत्रु आपल्याला दलदलींत लोटणार. ह्ॅर्नांचा तोफखाना पण पडला."

" तसं कांहींच झालं नाहीं. एक मिनिटापूर्वीं हेर्नांचा तोफखाना तिथें होता."

" तरुण हॅस्ब्रुक चांगला अधिकारी आहे. तो कशालाहि भीत नाहीं."

" मला १४८ व्या पलटणींतला माणूस भेटला. तो म्हणाला कीं, चार तास त्याच्या पलटणीनें शत्रूशीं सामना दिला अन् पांच हजार शत्रू मारले. आणखी एकादी अशी लढाई झाली कीं युद्धच संपेल."

" ब्रिल मुळींच घाबरला नाहीं. कुणींतरी त्याच्या हातावर पाय दिला तेव्हां तो म्हणाला कीं, देशाकरितां तो हात द्यायला तयार आहे पण म्हणून प्रत्येकानें त्याच्या हातावर पाय द्यायचं कांहीं कारण नाहीं. म्हणून तो हॉस्पिटलमध्यें गेला. त्याचीं तीनं बोटं चिरडलीं होतीं. डॉक्टर तीं बोटेंच कापून टाकणार होते तेव्हां ब्रिलनें असा आरडा ओरडा केला म्हणतां!"

" कर्नल काय म्हणाला तें ऐकलंत ? कुणीं पळून जायचा प्रयत्न केला तर तो त्याला गोळी घालणार आहे."

" त्यानें मला गोळी घालूनच पहावं."

" ए कंपनीतला एड वुइल्यम्स म्हणाला कीं बंडखोरांना एकदा चांगला मार दिला कीं ते शस्त्रं टाकून पळत सुटतात."

" त्याला काय कळतं ? एकदा कुणीं त्याच्यावर गोळी झाडली व तेव्हां-पासून आपणच सेनापति आहोंत असं त्याला वाटतं."

" ऐकलंत ? कॉर्कराइटनें शत्रूच्या दोन तुकड्या काबीज केल्या. आपण लढाई संपवून हिंवाळ्यांत नक्की परत जाऊं. "

" मुळींच नाहीं. कॉर्कराइटनें त्याचं कांहींच वाकडं केलं नाहीं. मी पैज मारतों हवी तर. "

त्यांच्या समोरील लढाईचे भयंकर आवाज ऐकून ते जागच्या जागीं थिजून गेले. धुराच्या लोटांत एक झेंडा हेलकावे खात होता. त्या झेंड्या शेजारीं सैनिकांच्या अस्पष्ट आकृति दिसत होत्या. शेतावर माणसांचा लोंढा आला. तेवढ्यांत तोफखान्याच्या कांहीं तोफा त्या बाजूनें ओढण्यांत आल्या व त्या ओढणाऱ्या घोड्यांना चुकविण्यासाठीं सैनिक पांगले.

वाट पहात असलेल्या राखीव सैनिकांच्या डोक्यावरून तोफेचा एक गोळा मोठ्यानें आवाज करीत गेला व जमिनीवर आदळून फुटला. त्या स्फोटानें पानें व माती हवेंत उडालीं. झाडींतून गोळ्या शिरून झाडांत घुसत होत्या. फांद्या मोडून पडूं लागल्या. जणूं हजारों कुऱ्हाडींचे घाव झाडावर पडत होते. त्या पडणाऱ्या फांद्यांपासून बचाव करण्यासाठीं माणसं आपलीं डोकीं सांभाळून वाकून चालत होतीं.

तरुण सैनिकाच्या पलटणीच्या लेफ्टनंटला हातावर गोळी लागली. तो इतक्या जोरजोरानें शिव्या देऊं लागला कीं त्यामुळें आजूबाजूचे सैनिक हंसूं लागले. त्याच्या शिव्यांमुळें नव्या माणसांच्या मनावरचें दडपण नाहींसें झालें.

आपली पाटलोण रक्तानें भरूं नये म्हणून लेफ्टनंटनें आपला रक्ताळलेला हात दूर धरला. कंपनीचा कॅप्टन पुढें आला व त्यानें आपला हात रुमाल काढून लेफ्टनंटच्या हाताची जखम बांधायला सुरुवात केली. पण जखम कशी बांधायची ह्यावर लेफ्टनंटशीं त्याचे मतभेद झाले आणि ते दोघे वाद घालूं लागले.

तो हलणारा झेंडा आतां जोरजोरानें हलत होता. जणूं एकाद्या संकटांतून तो मोकळा व्हायला बघत होता. सगळीकडे दाटलेल्या धुरांत अधून मधून स्फोटाच्या ज्वाला दिसत.

त्या धुरांतून माणसं धावत आलीं. त्यांची संख्या सारखी वाढत होती. सर्व तुकडीच पळूं लागली होती. नाचणारा झेंडा दुःखानें जमिनीवर पडला.

धुराच्या पडद्याआडून प्रचंड आरोळ्या ऐकूं आल्या. माणसं एकमेकांत मिसळलीं.

उजव्या बाजूचे अनुभवी सैनिक पळणारांना चिडवून कुठें लपायचं तें सांगूं लागले.

पण नव्या पलटणीचा भीतीनें श्वास कोंडला. तरुण सैनिकाच्या जवळ उभा असलेला सैनिक ओरडला, "बापरे, सॉंडर्सचा निकाल लागला." आपल्या अंगावर पुराचा लोंढा येतोय् असं समजून ते भीतीनें ते बसले.

पलटणींतल्या निळ्या कपड्यांतील आकृतीकडे तरुण सैनिकानें पाहिलं. सारीं माणसं स्थिर होतीं. झेंडा धरणारा सार्जंट दोन पाय फांकून स्थिर उभा होता. जणूं काय त्याला कोणी ढकलून देणार होते.

धावणाऱ्या माणसांचा लोंढा एका बाजूनें निघाला व त्यांत कांहीं अधिकारीहि ओढले गेले. त्यांतून निसटण्यासाठीं अधिकारी आपल्या हातांनी गुद्दे मारीत होते, तलवारींनीं ढुसण्या देत होते आणि शेलक्या शिव्या देत होते. घोड्यावर बसलेला एक अधिकारी तर हात पाय नि डोकं जोरजोरानें हलवून ओरडत होता.

ब्रिगेडचा एक अधिकारी मोठमोठ्यानें ओरडत घोड्यावरून फिरत होता. त्याची टोपी नाहींशी झाली होती. अंधरुणांतून उठलेल्या माणसासारखा तो दिसत होता. पळून जाणाऱ्या माणसांना त्याच्या घोड्याच्या टापा आपल्या डोक्याला लागतील अशी भीति वाटे पण तरीहि ते पळत होते. पळण्याच्या भरांत ते मुके आणि बहिरे झाले होते. कितीही लांबलचक किंवा इरसाल शिवी त्यांना हांसडली तरी ते दाद देत नसत. मधूनच जुने सैनिक टिंगल करून कांहीं विनोद करीत परंतु त्यांचीहि दखल पळून जाणारांना नव्हती.

जर आपल्या पायावर तरुण सैनिकाचा ताबा असता तर प्रत्यक्ष परमेश्वरहि त्याला तिथें थांबवून ठेवूं शकला नसता असा त्या दृश्याचा परिणाम त्याच्या मनावर झाला.

त्या पुराच्या प्रवाहांत सारे वाहून जात होते पण राखीव सैनिकांना मात्र आपल्या जागेवरून हलतां येत नव्हतं.

ह्या गोंधळांत तरुण सैनिकाच्या मनांत एक नवा विचार आला. ज्या राक्षसाला पळणारे भ्यायले होते तो राक्षस त्यानें पाहिलाच नव्हता. त्याला तो पहायची इच्छा झाली. तो राक्षस तो पहाणार होता अन् मग तो सर्वांत अधिक वेगानें पळणार होता.

## ५

तरुण सैनिकाला आपलं घर दिसूं लागलं. आपल्या लहानपणीं आपण गांवांत येणाऱ्या सर्कशीमागें जाण्यासाठीं कसे आतुरतेनें उभे राहत असूं तें आठवलं. त्याला गांवचे रस्ते आठवले, रस्त्याच्या कडेवर असलेलीं घरें दिसूं लागलीं.

"ते आले." कोणीतरी ओरडले.

माणसें आपसांत पुटपुटलीं. आपल्या हाताशीं दारूगोळ्यांतली प्रत्येक गोळी असावी असं त्यांना वाटूं लागलं. त्यांनीं दारूच्या पेट्या ओढल्या व जवळ ठेवल्या.

उंच शिपायानें आपली बंदुक तयार केली आणि खिशांतून एक तांबडा हातरुमाल काढला. मोठ्या काळजीनें तो हातरुमाल आपल्या गळ्याभोंवतीं बांधीत असतांनाच आवाज उठला, "ते आले, ते आले." बंदुकांचे चाप मोकळे केले गेले. त्यांचा 'क्लिक' असा आवाज झाला.

त्या शेतावरून तपकिरी रंगाचे सैनिक मोठमोठ्यानें ओरडत आले. वाकून, आपल्या बंदुकी रोखून ते सारखे पुढें येत होते. एक झेंडा पुढच्या बाजूला कललेला होता नि आघाडीवर वेगानें पुढें सरकत येत होता.

त्यांना पाहतांच आपली बंदुक ठासलेली नसेल अशा शंकेनें तरुण सैनिकाला भीति वाटली. आपण बंदुक ठासली कीं नाहीं तें आठवायचा त्यानें प्रयत्न केला पण तें त्याला जमलं नाहीं.

एक बोडका जनरल भिजून चिंब झालेल्या घोड्यावरून आला आणि ३०४ नंबरच्या पलटणीच्या कर्नलसमोर उभा राहून त्याच्या डोळ्यापुढें आपली मूठ नाचवीत ओरडला, " त्यांना रोखून धरा ", " त्यांना रोखून धरा. "

कर्नल तत–पप करून म्हणाला, " बरंय जनरल, आम्ही ऽऽऽ आम्ही ऽऽऽ जास्तीत जास्त प्रयत्न करूं. " जनरल निघून गेला. तो गेल्याबरोबर कर्नल मोठमोठ्यानें ओरडूं लागला. आपली पिछाडी अजून सुरक्षित आहे, कीं नाहीं तें पाहण्यासाठीं तरुण सैनिकानें मागें मान वळविली व त्याचें लक्ष अधिकाऱ्यावर गेलं. ह्या सैनिकांचा व आपला संबंध उगीचच आला असा भाव त्या अधिकाऱ्याच्या चेहेऱ्यावर होता.

तरुण सैनिकाच्या जवळ उभा असलेला सैनिक पुटपटत होता, " आतां आपले दिवस भरले, आपले दिवस भरले. "

पिछाडीच्या बाजूला कॅप्टन अधीरतेनें पुढेंमागें येरझारा घालीत होता. एकाद्या मास्तरणीसारखा तो सैनिकांना सांगत होता, " आपल्या गोळ्या राखून ठेवा. मी सांगेपर्यंत गोळी झाडूं नका. ते जवळ येईपर्यंत थांबा. मूर्खपणा करूं नका. "

तरुण शिपयाच्या तोंडावरून घामाचे ओघळ वाहूं लागले. एकाद्या रडणाऱ्या लहान मुलासारखा त्याचा चेहेरा दिसूं लागला. कोटाच्या बाहीनें तो वारंवार आपले डोळे पुसूं लागला. त्याचं तोंड उघडं होतं.

शत्रूनें भरून गेलेल्या शेतावर त्यानें नजर टाकली नि मग कसलाहि विचार न करतां आपली बंदूक झाडली. यंत्रासारखा, तो आपलें हत्यार वापरूं लागला.

त्याला स्वतःची काळजी वाटेनाशी झाली. स्वतःला तो विसरला. त्या पलटणींतला तो एक शिपाई होता. आपण ज्यापैकीं एक आहोत तो जमाव, सैन्य,

धोक्यांत आहे असं त्याला वाटूं लागलं. एकाच भावनेंत एकत्र आलेल्यांच्या व्यक्तिमत्वांत तो विलीन झाला. हातापासून बोट जसं पळून जात नाहीं तसाच तो त्यांच्यापासून पळून जाऊं शकत नव्हता.

आपली पलटण खलास होणार असं त्याला वाटलं असतं तर तो त्यांच्यांतून बाजूला होऊन पळून गेला असता. पण पलटणींत होणाऱ्या आवाजानें त्याला विश्वास वाटूं लागला होता. एकामागें स्फोट होत जाणाऱ्या स्फोटक द्रव्यांच्या सांखळीसारखी त्याला आपली पलटण वाटे. एकदा स्फोट व्हायला लागले कीं स्फोट होत असे तों त्यांत अनियंत्रीत शक्ति असते.

आपल्या भोंवतीं असलेल्या सहकाऱ्यांच्या अस्तित्वाची त्याला सतत जाणीव असे. ते ज्या तत्त्वासाठीं लढत होते त्या तत्त्वापेक्षां लढाईंतला बंधुभाव त्याला अधिक जाणवत होता. दारूगोळ्याचा धूर आणि मृत्यूचें सान्निध्य ह्यांत तयार झालेला तो बंधुभाव विलक्षण होता.

तो काम करीत होता. एकामागें एक पेट्या तयार करणाऱ्या सुतारासारखा तो होता. त्याला आणखी पेट्या तयार करायच्या होत्या. फक्त तो अधिक घाईंत होता. सुतार जसा काम करतां करतां अनेक गोष्टींचा विचार करीत असतो तसा लढतांना तो विचार करीत असे.

हळुहळू लढाईच्या वातावरणाचा त्याच्या मनावर परिणाम होऊं लागला. त्याला उष्ण घाम फुटला. आपलीं बुबुळें तप्त होऊन तीं डोळे फोडून बाहेर पडणार असं त्याला वाटूं लागलं.

ह्या भावनेमागोमाग त्याला विलक्षण संताप आला. कोंडलेल्या जनावरासारखा, कुत्रीं अंगावर भुंकत असल्यानें त्रासलेल्या गाईसारखा, तो संतापला. एका वेळीं फक्त एकच गोळी झाडूं शकणाऱ्या आपल्या बंदुकीवर तो चिडला. धावत पुढें जाऊन शत्रूचे गळे दाबून त्यांचा प्राण घ्यावा असं त्याला वाटूं लागलं. एका सपाट्यासरशीं सर्वांना ह्या पृथ्वीतलावरून नाहींसें करण्याची ताकद आपल्यांत असावी अशी त्याला अतिशय तीव्र इच्छा झाली. आपल्याजवळ हें सामर्थ्य नसल्याचें त्याच्या लक्षांत आलं नि त्याला भयंकर राग आला.

बंदुकांच्या धुरांत झाकलेला त्याचा राग समोरून चालून येणाऱ्या शत्रूपेक्षां त्याच्या मनांत असलेल्या नि त्याचा गळा दाबणाऱ्या कल्पनेंतील भुताविरुद्ध अधिक होता. तो त्यांच्या तडाख्यांतून सुटण्यासाठीं धडपडूं लागला.

बरेच सैनिक आपसांत कुजबुजत होते. कुणी गप्पा मारीत होते, कुणी चिडवीत होते, प्रार्थना म्हणत होते. ते सर्व आवाज एकत्र होऊन त्याचं रणगीत तयार झाल्यासारखा भयंकर आवाज निघत होता. तरुण सैनिकाच्या शेजारीं असलेला सैनिक अजून पुटपुटत होता. लहान मुलाच्या बोलण्यासारखा त्यांत नाजुक ध्वनि होता. उंच सैनिक मोठमोठ्यानें शिव्या देत होता. इतक्यांत आणखी एक सैनिक पुढें येऊन ओरडला, "ते आम्हांला कुमक का देत नाहींत ? त्यांना काय वाटतं ?." झोपेंत असल्यासारखे तरुण सैनिकानें हे शब्द ऐकले.

वीरोचित वागण्याचा, हालचालीचा त्यांच्यांत पूर्ण अभाव होता. गरम बंदुकांच्या नळ्यांत दारू ठांसणारे लोखंडी गज खडखड आवाज करीत होते. दारू-गोळ्याच्या पेट्यांचीं झाकणें सर्व उघडून टाकलीं होतीं व पेट्या हलवल्या कीं तीं फडफड आवाज करीत. बंदूक ठासून झाली कीं सैनिक ती खांद्याला लावून विशेष नेम न धरतां समोर दिसेल त्यावर झाडीत. समोर दिसणारे आकार जादु-गाराच्या छायानाट्यांतील बाहुल्यांसारखे मोठे मोठे होत होते.

चित्रांत असतात त्याप्रमाणें ते अधिकारीहि उभे राहिलेले नव्हते. ते उत्तेजन देत पुढें मागें सारखे धावत होते. त्यांचे आवाज खूप मोठे होते. आपल्या फुफ्फुसांत ते भरपूर हवा भरीत असावेत. आणि धुरांतून शत्रूकडे पाहण्यासाठीं ते इतके वाकून पहात कीं ते शीर्षासन करून डोक्यावर उभे राहिले आहेत असं वाटे.

गोळीबाराच्या पहिल्या आवाजाबरोबर पळून जात असलेल्या एका सैनि-काला तरुण सैनिकाच्या लेफ्टनंटनें पकडलं होतं. तो लेफ्टनंटकडे भेदरलेल्या डोळ्यांनीं पहात होता. त्याला भरपूर ठोसे मारून लेफ्टनंटनें पुन्हा लढणाऱ्या सैनिकांच्या रांगेंत ढकललं. यांत्रिक बाहुल्यासारखा तो सैनिक रांगेत गेला. त्याचे भरलेले डोळे लेफ्टनंटकडे पहात होते. भीतीचा लवलेशही नसलेल्या लेफ्ट-

नंटच्या आवाजामुळें त्याला धीर आला असावा. तो बंदुक ठासण्याचा प्रयत्न करूं लागला पण त्याचे हात थरथरत होते नि म्हणून लेफ्टनंट त्याला मदत करूं लागला. माणसं पटापट मरूं लागलीं.

लढाईला तोंड लागलं तेव्हांच तरुण सैनिकाच्या पलटणीचा कॅप्टन मारला गेला. थकून विश्रांति घेत असलेल्या माणसासारखं त्याचं प्रेत पडलं होतं. पण एकाद्या मित्रानें विश्वासघात केला असल्यासारखे भाव त्याच्या चेहेऱ्यावर होते. पुटपुटणाऱ्या सैनिकाला एक गोळी लागली व त्याच्या तोंडावरून रक्ताचे ओघळ वाहूं लागले. त्यानें दोन्ही हातांनीं आपलं डोकं घट्ट दाबून धरलं व 'ओ ऽऽ ऽ ह' असा आवाज करून तो पळाला. पोटांत लाठीचा प्रहार बसल्यासारखा दुसरा ओरडला व खालीं बसला. तिसरा एक मागच्या बाजूला झाडामागें उभा होता. गोळीनें त्याच्या गुडघ्याचं हाड फोडून टाकलं. त्यानें बंदूक फेकून दिली व आधारासाठीं दोन्ही हातांनीं झाड आवळून धरलं. कुणीतरी मदतीला यावं म्हणून तो ओरडूं लागला.

अखेरीस विजयाचे प्रचंड आवाज उठले. गोळीबार बंद झाला. धूर कमी कमी होऊं लागला. हल्ला परतल्याचें तरुण सैनिकाला दिसलें. शत्रूचे सैनिक छोट्या टोळ्या करून पांगले होते. एक सैनिक एका कुंपणावर चढला व त्यानें अखेरची गोळी झाडली.

तरुण सैनिकाची धुंदी उतरतांच आपला श्वास कोंडणार आहे असं त्याला वाटूं लागलं. आपल्या भोंवतालच्या घाणेरड्या वातावरणाची त्याला जाणीव झाली. त्याचं शरीर घामट झालं होतं नि घामाच्या धारा त्याच्या शरीरावरून निथळत होत्या. त्यानें आपली प्यायच्या पाण्याची बाटली उचलली आणि त्यांतलं कोमट झालेलं पाणी तो घटाघट प्यायलीं.

'आम्हीं त्यांना थांबवलं,' 'आम्हीं त्यांना थांबवलं' सर्वत्र एकच आवाज उठला. माणसं एकमेकाकडे पाहूं लागली.

तरुण सैनिक पुढेंमागें पाहूं लागला. त्याला समाधान वाटत होतं.

मेलेलीं माणसं जमिनीवर सर्वत्र पडलीं होतीं. कुणाचे हातपाय वाकडे झाले

होते. कुणाचं डोकं वाकडं झालं होतं. जणूं आकाशांतून उंचावरून तें खालीं पडल्यामुळें असें वाकडें तिकडें झालें होतें.

झाडीच्या मागून तोफा अजूनहि भडिमार करीत होत्या. त्यांच्या ज्वालांनीं तो गोंधळला. त्या आपल्यावर रोखल्या आहेत असं त्याला वाटलं. झाडींतून तोफखान्याचे शिपाई त्याला दिसत होते. एवढ्या गडबडींत ते आपलं कौशल्य कसं विसरत नाहींत ह्याचं त्याला आश्चर्य वाटलं.

एकामागून एक जखमी सैनिक मागच्या बाजूस जात होते. ब्रिगेडला झालेल्या त्या जखमा होत्या.

दूरवर चाललेल्या लढाईचा आवाज त्याला ऐकूं आला नि मग त्याच्या लक्षांत आलं कीं तिकडे अन् पलीकडे अन् सगळीकडे अजून लढाई चालू आहे.

त्यानें वर पाहिलं. आकाश निळं निरभ्र झालं होतं. झाडांवर व शेतांवर स्वच्छ सूर्यप्रकाश पसरला होता. लढाईच्या त्या धुमश्चक्रींत निसर्ग निर्धास्तपणें आपल्या मार्गानें जात होता.

# ६

तरुण सैनिक शुद्धीवर आला. तो आपल्याबद्दल विचार करूं लागला. आतांपर्यंत जणुं तो स्वतःला नीट ओळखुं शकत नव्हता. जमिनीवरली टोपी त्यानें उचलली. आपलं जाकीट सारखं केलं आणि बुटाचे बंद लावले.

एकूण सारं संपलं होतं! सत्त्वपरीक्षा संपली होती!

तो आत्मसमाधानांत गुंग झाला. आयुष्यांतलं सर्वांत मोठं समाधान त्याला वाटत होतं. स्वतःला तिऱ्हाईत समजून तो स्वतःच्याच वागण्याचा विचार करूं लागला. आपल्यासारखा लढणारा इसम खरोखरच खूप मोठा शूर योद्धा असला पाहिजे असं त्यानें ठरवलं.

आपण खूप चांगले आहोंत असें त्याला वाटूं लागलं. कांहीं वेळांपूर्वी आपल्याला जें आयुष्यांत कधींहि साधणार नाहीं असं वाटलं होतं तें आपण आतां सहज साध्य करूं असं त्याला वाटायला लागलं. समाधानानें त्याच्या तोंडावर स्मित फुललं.

आपलेपणाच्या आवाजानें तो आपल्या सहकाऱ्यांशीं बोलूं लागला, " फार उकडतंय नाहीं ? " त्यानें एकाला विचारलं.

" उकडतंय् ? " तो सैनिक म्हणाला " आयुष्यांत इतकं कधीं उकडलं नव्हतं. " नि मग तो गवतावर आडवा झाला. "सोमवारपासून निदान आठवडाभर तरी आपल्याला लढावं लागूं नये असं मला वाटतं. "

खूपशीं हस्तांदोलनं झालीं, व्याख्यानं झालीं. त्या सर्वांबद्दल तरुण सैनिकाला आतां आत्मीयता वाटूं लागली होती. एका सहकाऱ्याला आपली जखम बांधायला त्यानें आपली मदत केली.

पण पुन्हा आवाज उठला, " ते आले " " ते पुन्हा आले. "

गवतावर लोळलेला सैनिक ताडकन् उठून बसला. " देवा ! " तो उद्गारला.

तरुण सैनिकानें शेताकडे पाहिलं. झाडींतून भराभर सैनिक येत होते. तो झेंडा पुन्हा पुढें पुढें येऊं लागला. तोफांचा थांबलेला भडिमार पुन्हा सुरू झाला. त्यांच्या गोळ्यांचे झाडींत स्फोट झाले म्हणजे ते एखाद्या फुललेल्या फुलासारखे दिसत.

माणसं कण्हूं लागलीं. त्याच्या डोळ्यांतलं चैतन्य लोपलं. त्याची जागा निराशेनें घेतली. आंबलेलीं शरीरं कशींबशीं उचलून ते हलूं लागले आणि येणाऱ्या शत्रूकडे पाहूं लागले.

कुणी तरी पुन्हां ओरडलं, " आम्हाला कुमुक कां नाहीं पाठवत कुणी ? "

" आतां ह्या दुसऱ्या हल्ल्यापुढें आपला टिकाव लागणं शक्य नाहीं. मी कांहीं सगळ्या बंडखोरांशीं लढायला इथें नाहीं आलों. "

एक सैनिक रडूं लागला, " मी बिलच्या हातावर पाय दिला. त्यानें माझ्या हातावर पाय दिला असतां तर बरं झालं असतं. "

त्या पलटणीचे थकलेले सांधे आतां करकरूं लागले होते.

तरुण सैनिक बघूं लागला. हें अशक्य वाटणारं घडणार नाहीं असं त्याला वाटलं. शत्रु आपल्यासमोर येऊन थबकला आहे नि माफी मागून माघारीं गेला आहे असं कल्पनाचित्र तो बघूं लागला. होतंय् हें सारं चुकीचं होतं.

पलटणीवर गोळीबार सुरू झाला. त्यांच्यासमोर गोळ्या फुटत नि धूर त्यांच्या रांगांतून शिरून जाई. धुरांत तो झेन्डा अधून मधून नाहींसा होई नि मग उन्हांत चमकूं लागे.

तरुण सैनिकाचे डोळे भीतीनें थिजले. भीतीनें त्याची मान हलूं लागली. त्याच्या हातांचे स्नायु जागच्या जागीं थंड झाल्यासारखे झोपीं गेले. त्याचे गुडघे त्याच्या शरीराचा भार सहन करण्यास कुरकुरूं लागले.

त्याच्या डोळ्यांत त्याच्या सहकाऱ्यांचे शब्द पुन्हा पुन्हा डोकावूं लागले, " ते आपल्याला कुमक कां पाठवीत नाहींत ? मीं कांहीं सगळ्या बंडखोरांशीं एकट्यानें लढायला इथें नाहीं आलों."

शत्रु फार काटक आणि शूर आहे असं त्याला वाटूं लागलं. तो स्वतः थकला होता. म्हणून पुन्हा हल्ला करून येणाऱ्या शत्रूच्या काटकपणाची त्याला खात्री वाटली. पोलादाच्या यंत्रासारखे ते त्याला वाटले. अशा लोकांशीं संध्याकाळपर्यंत लढत रहायचा प्रसंग त्याला फार भयंकर वाटला.

त्यानें आपली बंदुक उचलली व चालून येणाऱ्या शत्रूंच्या घोळक्यावर ती झाडली. तकर सर्वत्र ओरडत पळत असलेल्या माणसांकडे तो सगळीकडे पसरलेल्या धुराच्या पडद्यांतून पाहूं लागला.

त्याला वाटलं एक प्रचंड राक्षस आपल्यावर चालून येत आहे. नि तो आतां आपल्याला गट्ट करणार अशा कल्पनेनें त्यानें आपले डोळे मिटून घेतले.

त्याच्या शेजारचा सैनिक आतांपर्यंत सारखी बंदुक झाडीत होता, पण अकस्मात तो मोठ्यानें ओरडला आणि पळूं लागला. मोठ्या योद्ध्याच्या आविर्भावानें लढणारा एक तरुण एकदम लढायचा थांबला आणि पळाला. त्याच्या तोंडावर लाजेची छटाहि नव्हती. तो धूम पळत सुटला.

इतर माणसं पळूं लागलीं. तरुण सैनिकानें तें पाह्यलं अन् त्याला वाटलं, कीं सारी पलटण आपल्याला सोडून पळत जाणार.

तो भीतीनें ओरडला व मागें वळला. आपण कुठें सुरक्षित असूं तें त्याला कळेना. सर्व बाजूंनीं सर्वनाशाचीं पाऊलें झपाट्यानें त्याच्या बाजूला येत आहेत.

लांब लांब टांगा टाकीत तो पलटणीच्या पिछाडीच्या दिशेनें पळत सुटला. त्याची बंदुक आणि टोपी केव्हांच नाहींशीं झालीं होतीं. त्याच्या कोटाचीं बटणं सुटलीं होतीं व त्यांत हवा भरून तो फुगला होता. त्याची बंदुकीच्या गोळ्यांची पेटी उघडली होती व तिचं झांकण फटफट वाजत होतं. त्याचं पाणी प्यायचं भांडं त्याला अडकवलेल्या दोरीनें मागें लोंबत होतं. त्याला वाटणारी भयंकर भीति त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

मोठ्यानें ओरडत लेफ्टनंट पुढें झाला आणि त्याचा हात त्याच्या तलवारीकडे गेलेला तरुणाला दिसला. अशा भयंकर प्रसंगांतहि मन रमणारा तो लेफ्टनंट मोठा चमत्कारिक असला पाहिजे असं त्याला वाटलं.

आंधळ्यासारखा कुठेंहि न पाहतां तो पळत सुटला. दोन तीन वेळां तो पडला पण लगेच उठून पळत सुटला. एकदा तर त्याचा खांदा एका झाडावर चांगलाच आदळला आणि तो कोसळला.

लढाईतून पळाल्यापासून त्याची भीति फार वाढली होती. त्याला लढाईंत येणाऱ्या मृत्यूपेक्षां कल्पनेंत आतां दिसणाऱ्या मृत्यूची भीति अधिक वाटत होती.

पळतांना तो इतर माणसांत मिसळला. त्याच्या पुढें, बाजूला, सर्वत्र माणसें होतीं नि त्याच्यामागें पावलांचा आवाज ऐकूं येत होता. सारी पलटणच पळत सुटली असल्यासारखं त्याला वाटलं.

आपल्यामागें आणखी कुणाचीं तरी पाऊलं वाजताहेत ह्याचं त्याला बरं वाटलं. रणांगणावरून मृत्यु चालत आलाच तर त्याच्या तडाख्यांत आपल्या आधीं कुणीतरी सांपडायला आहे ह्या भावनेनें त्याला बरं वाटलं. मृत्यूपासून पळतां येईल तितक्या दूर पळावं म्हणून तो पळायची चढाओढ लागल्यासारखा पळत सुटला.

त्या चढाओढींत तो सर्वांच्या पुढें होता. तो जिथें पोंचला तिथें तोफांचे गोळे येत होते. सूं ऽ ऽ असा आवाज करीत ते त्याच्या डोक्यावरून जात. त्याच्या मनांत त्या गोळ्यांचं चित्रं उभं राहिलं. मृत्यूचे ते हस्तक आपल्या डोक्यावरून जातां जातां दांत विचकून आपल्याकडे पाहून हंसत आहेत असं त्याला वाटूं लागलं. एक गोळा नेमका त्याच्या समोर फुटला. त्या स्फोटामुळें त्याचा रस्ता बंद झाला. तो चटकन् जमिनीवर आडवा पडला नि मग उठून दुसऱ्या झाडीच्या दिशेनें पळाला.

गोळे फेंकीत असलेल्या तोफा त्याच्या नजरेला पडतांच तो आश्चर्यानें थबकून उभा राहिला. तोफा उडवणारीं माणसं अगदीं शांतपणानें काम करीत होतीं. त्यांना येणाऱ्या आपत्तीची कांहींच कल्पना नव्हती. शत्रूच्या दूरच्या तोफखान्यावर ते गोळे फेंकीत होते व आपल्या नेमबाजीचा त्यांना भारी अभिमान वाटत होता. ते आपल्या तोफांच्या पाठीवर हात फिरवून त्यांना उत्तेजन देत होते व जणुं उत्तेजित होऊन त्या जोरजोरानें भुंकत होत्या.

त्यांचे गोळे शत्रूच्या तोफाखान्यावर जिथें पडत होते तिथें डोळे रोखून ते पहात होते. पडत असलेल्या तरुण सैनिकाला त्यांची कींव आली. पद्धतशीर असले तरी ते तोफावाले सैनिक महामूर्ख होते ! यंत्रासारखे निर्बुद्ध होते !

एकदा शत्रूचे सैनिक त्यांच्यावर चाल करून आले कीं मग शत्रूवर नेमबाजी करण्याचा आनंद कळेल त्यांना !

त्याच्या समोरून एक तरुण घोड्यावर बसून वेगानें गेला. त्याचा वेग पाहून तरुणाला वाटलं एक मिनिटांत तो घोडेस्वार मरून पडणार ! एका रांगेत उभ्या असलेल्या तोफांचीसुद्धां त्याला कीव आली.

कुमक म्हणून जात असलेल्या ब्रिगेडकडे त्यानें एका टेकडीवर चढून पाहिलं. माणसं अगदीं एका रांगेत चालत होतीं. नवे झेंडे दिमाखानें फडफडत होते. अधिकारी जोराजोरानें ओरडत होते.

नरभक्षक राक्षसाच्या उघड्या जबड्यांत ती ब्रिगेड चालत जात आहे. असं त्याला वाटलं. हीं माणसं आहेत तरी कशीं ! कुणातरी निराळ्या वंशाचीं

तीं असलीं पाहिजेत. नाहींतर आपल्यावरील संकटाचीसुद्धां त्यांना कल्पना नसावी ? मूर्ख !

तोफखान्याच्या एक अधिकाऱ्यानें ओरडून कांहींतरी सांगितलं व तोंडं वळवून तोफा तिथून काढून घेण्यांत आल्या. पळतां पळतां तोफासुद्धां कुरकुरत होत्या.

तरुण सैनिक पुढें चालूं लागला. आतां त्या सर्व भयंकर आवाजापासून तो दूर आला होता. त्यानें पळायचा आपला वेग कमी केला.

त्याला घोड्यावर बसलेला एक जनरल दिसला. लढाईच्या आवाजाकडे जनरलच्या घोड्यानें आपले कान टवकारले होते. त्या घोड्यावरचं जिन चमकत होतं.

जनरलचे साहाय्यक इकडून तिकडे धांवपळ करीत होते. कांहीं वेळां जनरल भोंवतीं कांहीं माणसं असत तर कांहीं वेळां तो एकटा असे. त्याच्या चेहेऱ्यावर, भावांत चढउतार फार होत असल्यानें चिंताग्रस्त झालेल्या व्यापाऱ्याचे भाव होते.

तरुण सैनिक त्याच्याजवळ गेला. त्याचं बोलणं ऐकायचा तो प्रयत्न करीत होता. त्याला वाटलं, जनरलला आलेल्या आपत्तीची पुरी कल्पना नसणार व म्हणून तो आपल्याला विचारील. आपण नक्की सांगूं. आपल्याला सगळं माहीत आहे. आपलं सारं सैन्य भयंकर आपत्तींत सांपडलं आहे नि जर आपण माघार घेतली नाहीं तर......

त्याला वाटलं जनरलला चांगलं बडवून काढावं. निदान त्याच्या समोर जाऊन त्याच्याबद्दल आपल्याला काय वाटतं तें त्याला सरळ सरळ ऐकवावं. एका जागीं उभं राहून होत असलेला नाश पहाणं हा स्पष्टपणें गुन्हा होता. जनरल आपला सल्ला विचारील ह्या इच्छेनें तो तिथें घोटाळला.

तो तिथें असतांना त्याच्या कानावर जनरलचे शब्द आले, "टॉम्पकिन्स, टेलरला सांग, घाई करूं नकोस. झाडीजवळ त्याला आपली ब्रिगेड थांबवायला सांग. त्याला माझा निरोप सांग, कीं मधले लोक एखादे वेळी कच खातील. त्यांना मदत करायला हवी. त्याला लवकर जायला सांग."

एका तरुण घोडेस्वारानें हे शब्द ऐकून आपला घोडा पिटाळला.

"त्यांनीं त्यांना थोपवून धरलं." थोड्या वेळांत जनरल म्हणत होता, "त्यांना आतां आपण चांगलं पिटून काढूं." नंतर पुन्हा एका तरुण घोडेस्वाराकडे वळून जनरल म्हणाला, "जोन्स, टॉम्पकिन्सला ताबडतोब जायला सांग ऽ ऽ लवकर ऽ ऽ त्याला कांहींही सांग."

टॉम्पकिन्सच्या दिशेनें दुसरा घोडेस्वार गेला. खुष होऊन जनरल बघूं लागला. एखादं गाणं गायल्यासारखं तो म्हणत होता, "आम्ही त्यांना हरवलं," "आम्ही त्यांना हरवलं."

आनंदानें त्यानें घोड्याला टांच मारली व तो घोडा चौखुर उधळला.

# ७

एखाद्या गुन्हेगारासारखं तरुण सैनिकाला वाटलं. अखेर त्यांनीं जय मिळविला होता तर! ते विजयी झाले होते. त्यांच्या विजय घोषणा त्याला ऐकायला येत होत्या.

टांचा वर करून तो लढाईच्या दिशेनें बघूं लागला. झाडांवर सर्वत्र पसरलेल्या धुराखालून बंदुकांचे आवाज ऐकूं येत होते. त्या आवाजावरून ते आघाडी मारीत असल्याचं स्पष्ट होतं.

त्याला राग आला. आपला कुणीतरी गुन्हा केल्यासारखं त्याला वाटलं.

तो स्वतःची समजूत काढूं लागला. सर्वनाशाची वेळ आली म्हणून तो पळाला होता. स्वतःला वांचविण्यांत त्यानें सैन्याचाच भाग वांचविला होता; कारण तो स्वतः सैन्याचा एक भाग होता. प्रत्येक भागानं स्वतःचा बचाव करावा अशीच वेळ आली होती. असे वांचलेले भाग पुढें एकत्र जमवून अधिकारी सैन्य उभं करूं शकले असते. जर प्रत्येक भागानें आपला बचावच केला नाहीं

६३८५
ता. नं.

तर अधिकारी सैन्य एकत्र जमविणार कसं ? मग सैन्य कसं उभं राहील ? आपण अगदीं बरोबर व योग्य मार्गानें वागलों हें स्पष्ट होतं. त्याचं वागणं चतुरपणाचं होतं. त्यांत मुत्सद्देगिरी होती व त्याचं पळणं हें पलायनपटूचंच काम होतं.

त्याच्या सहकाऱ्यांच्याबद्दल तो विचार करू लागला. त्यांची निळी रांग शत्रुचा मारा सहन करूनहि शाबूत राहिली होती. ह्याचा त्याला भारी राग आला. सैन्याच्या त्या अज्ञान व मूर्ख भागांनीं त्याचा विश्वासघात केला होता. शत्रूचा मारा त्यांनीं सहन केल्यामुळें तो उघडा पडला होता. खरं म्हणजे विचार केला असता तर टिकाव धरणं अशक्य आहे हें कुणाहि बुद्धिमान माणसाला पटलं असतं. तो हुशार असल्यानें भविष्यकाळांत बघूं शकत होता. त्याला आपल्या सहकाऱ्यांचा भारी राग आला. ते मूर्ख आहेत हें सहज सिद्ध करण्या-सारखं आहे ह्याची त्याला खात्री आहे.

छावणींत परत आल्यावर ते काय म्हणतील ह्याचा विचार तो करूं लागला. ते त्याची टींगल करतील, त्याच्या कानावर त्यांचीं कुत्सित बोलणीं ऐकूं येऊं लागलीं. त्यांच्या मठ्ठ डोक्यांत त्याचे चतुर विचार कळण्याइतकी अक्कल असणार कुटें !

त्याला स्वतःबद्दल सहानुभूति वाटूं लागली. त्यांनीं त्याचा गैरफायदा घेतला होता. त्याच्यावर भयंकर अन्याय झाला होता. तो फार शहाणपणानें वागला होता व त्याच्या सद्हेतूचा परिस्थितीनें विपर्यास केला होता.

त्याचं मन त्याच्या सहकाऱ्याविरुद्ध त्या युद्धाविरुद्ध आणि नशिबाविरुद्ध-बंड करून उठलं. त्याला विलक्षण दुःख होत होतं. त्यानें खालीं मान घातली. जेव्हां त्यानें वर बघितलं तेव्हां त्याच्या डोळ्यांत गुन्हा करीत असतांना सांपड-लेल्या गुन्हेगाराचे भाव होते. आपण खूप मोठा गुन्हा केला आहे व तो सांगा-यला आपल्याला पुरेसे शब्दहि सांपडत नाहींत असे भाव त्याच्या चेहेऱ्यावर होते.

तो शेतांतून झाडींत गेला. जणूं त्याला स्वतःला पुरून घ्यायचं होतं. बंदुकांचे आवाज त्याला मानवी आवाजासारखे वाटूं लागले होते व ते आवाज ऐकूं येणार नाहींत अशा जागीं दूर त्याला जायचं होतं.

त्या झाडींत सर्वत्र वेली पसरल्या होत्या व त्यांतून वाट काढतांना मोठा आवाज होत होता. त्याच्या पायाला अडकून वेली जेव्हां झाडापासून तुटत तेव्हां त्या मोठा आवाज करीत. त्याला स्पर्श करणाऱ्या फांद्या जगाला त्याचें अस्तित्व जाहीर करून सांगत. त्या जंगलांत त्याला मोकळं वाटेना. तें त्याच्या विरुद्ध ओरडत होतं. त्याच्या त्या आवाजानें माणसं येतील व आपल्याला बघतील अशी भीति त्याला वाटली. म्हणून तो आंत निबिड जंगलांत गेला.

कांहीं वेळानें बंदुकांचे आवाज बंद झाले अन् तोफांचे आवाज दूरवर ऐकूं येऊं लागले. सूर्य प्रखर होता. किडे तालावर ओरडत होते. जणूं ते कराकरा ऊन्ह खात होते. एका सुतारपक्ष्यानें एका झाडाच्या बाजूनें आपलं डोकं वर केलं. एक पक्षी सावकाश उडत गेला.

मृत्यूचा आवाज आतां दूर गेला होता.

त्या सृष्टिसौंदर्यानें त्याला धीर आला. त्यांत जिवंतपणा होता. तो शांतता धर्म होता. रक्तांचा थेंबहि ह्या दृश्यांत दिसला असतां तर तें दृश्य खाक झालं असतं. त्याला तें एकाद्या दुःखाबद्दल घृणा असणाऱ्या स्त्रीसारखं वाटलं.

एका खारीला त्यानें दगड मारला व ती पळत गेली अन् झाडावर चढून एका फांदीआड लपून त्याच्याकडे पाहूं लागली.

ह्या कृत्यामुळें आपण विजयी झालों असं त्याला वाटलं. धोका दिसतांच पळून जाऊन प्राण वाचवणं हा निसर्गनियमच होता. धोका दिसताच खार पळून गेली होती. शौर्य गाजवायला अन् आकाशाकडे डोळे लावून मरायला तिथं थांबली नव्हती. तोहि असाच पळाला होता. म्हणजे त्यानें निसर्गाचा नियम पाळला होता. निसर्ग आपला मित्र आहे, असं त्यामुळें त्याला वाटूं लागलं.

तो एका दलदलीच्या जागीं पोंचला नि तिथून पुन्हा दाट जंगलांत शिरला. त्याच्या अंगाला झाडांच्या फांद्या घासून होणाऱ्या आवाजांत तोफांचे आवाज बुडून गेले. तो धांवत होता. जगापासून तो दूर जात होता.

झाडांच्या फांद्यांच्या झालेल्या एका कमानीखालीं तो पोंचला. हिरव्यागार पालवीनें तयार केलेला दरवाजा ढकलून तो कमानींत शिरला. सुयासारख्या पर्णांचा गालिचा जमिनीवर पसरलेला होता.

पण कमानीच्या उंबरठ्यांतच तो उभा राहिला अन् डोळे विस्फारून पाहूं लागला.

एका मोठ्या वृक्षाला टेकून बसलेलें एका माणसाचं प्रेत त्याच्याकडे पाहत होतं. एकेकाळीं निळ्या रंगाचा पण विटल्यानें हिरवा भासणारा गणवेश त्या प्रेताच्या अंगावर होता. त्याच्याकडे पाहात असलेले डोळे मेलेल्या माशाच्या डोळ्यासारखे थिजले होते. तोंड उघडं होतं. त्याचा मूळ लालबुन्द रंग आतां पांढरा फटफटीत झाला होता. त्याच्या निळसर पडलेल्या तोंडावर मुंग्या फिरत होत्या. एक मुंगी तोंडांत कांहींतरी धरून त्याच्या वरच्या ओठावरून चालत होती.

तरुण सैनिक भीतीनें ओरडला. तो त्या प्रेतासमोर दगडासारखा स्थिर उभा राहिला व त्या प्रेताच्या डोळ्यांत पाहूं लागला. तें प्रेत व तो एकमेकाकडे पाहूं लागले. तरुण सैनिकानें आपला एक हात पाठीमागें घेतला व तो झाडावर टेकून त्याच्या आधारानें तो उभा राहिला. मग एक एक पाऊल तो मागं हटूं लागला पण त्या प्रेतावरची नजर त्यानें काढली नाहीं. आपण पाठ फिरविली तर तें प्रेत आपल्या मानगुटीवर बसेल असं त्याला वाटूं लागलं.

झाडांच्या फांद्यांचा स्पर्श झाला कीं त्या आपल्याला प्रेतावर ढकलून देतील असं त्याला वाटूं लागलं. त्याचे पाय अडखळूं लागले. आपला हात त्या प्रेतावर पडेल असं त्याला वाटलं. नीतिकल्पना मनांत येतांच त्याच्या अंगावर शहारे आले.

त्या जागेंतून तो कसाबसा बाहेर पडला नि पळत सुटला. मुंग्या लागलेला चेहेरा सारखा त्याच्या डोळ्यासमोर येई.

थोड्या वेळांत धापा टाकीत तो उभा राहिला. त्याला वाटलं त्या प्रेताला अचानक वाचा फुटेल व तें प्रेत आपल्या अंगावर ओरडेल.

वाऱ्याच्या झुळुकीनें त्या कमानीचीं झाडें हललीं. दुःखाची भयाण शांतता सर्वत्र पसरली होती.

# ८

ती शांतता दूर अंरातावरून येणाऱ्या प्रचंड आवाजानें भंग पावली.

तरुण सैनिक थबकला. त्या भयंकर आवाजांनीं तो जागच्या जागीं उभा राहिला. जणूं जगाचा नाश होत होता. बंदुकांचे नि तोफांचे आवाज पुन्हा ऐकूं येऊं लागले.

त्याची कल्पनाशक्ति मोकाट सुटली. दोन्ही शत्रुसैन्यें चित्त्यासारखीं एकमेकांवर तुटून पडलीं असल्याचं दृश्य त्याच्या मनासमोर उभं राहिलं. कांहीं वेळ तो ऐकत उभा राहिला नि नंतर लढाईच्या दिशेनें धांवत सुटला. जें टाळण्यासाठीं तो पळून आला होता त्याच्याचकडे पुन्हा आपण पळत जात आहोंत ह्याचं त्याला आश्चर्य वाटलं. तो मनाशीं म्हणाला, 'जर पृथ्वीची अन् सूर्याची टक्कर व्हायची असली तर पुष्कळ लोक हें दृश्य पाहण्यासाठीं गच्चीवर उभे राहतील.

तो पळायला लागला तेव्हां जंगलांतले सारे आवाज बंद झाले असल्याचं त्याच्या लक्षांत आलं. जणूं तें जंगल बाहेरील आवाज ऐकत होतं. झाडं शांत निःस्तब्ध उभीं होतीं. सारे बाहेरचे आवाज ऐकत होते.


आतांपर्यंत आपण पाहिलेली लढाई ही खरी मोठी लढाईच नव्हती असं ते आवाज ऐकून तरुण सैनिकाला वाटूं लागलं.


मग आपल्या व आपल्या सहकाऱ्यांच्या विचारांतली गम्मत त्याच्या लक्षांत आली. त्या छोट्या लढाईला ते निर्णायक युद्ध समजत होते. इतिहासांत आपण आपलीं नांवं सुवर्णाक्षरानीं लिहून ठेवीत आहों असं त्यांना वाटत होतं. पण प्रत्यक्ष मात्र त्यांची नांवं सरकारी दप्तरांत कुठेंतरी बारीक अक्षरांत लिहिलीं जाणार होतीं.

बाहेर डोकावून पाहण्याच्या इराद्यानं तो जंगलाच्या टोकाशीं आला.


STUSA

दिवाळी शुभचिंतन








शेतीचीं आधुनिक अवजारें




भारताच्या शेतीसुधारणेला व औद्योगिक विकासाला मोठा हातभार लावून सर्वांच्या विश्वासाला व अभिमानाला पात्र ठरलेला

**अग्रेसर कारखाना**







**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**

किर्लोस्करवाडी ( द. सातारा )

२९६३३
१९०८

घाईघाईनें चालत असतां त्याच्या मनांत अनेक विचार चालू होते. आपले विचार एकत्र आले कीं आपल्या मनांतलं प्रत्यक्ष घडतंय् असं समजुन तो त्यांचीं चित्रं आपल्या मनासमोर उभीं करी. ऐकूं येणारे आवाज हे प्रत्यक्ष कुणीतरी बोलत असल्यानें त्या बोलणाऱ्याचा आवाजच आपल्याला ऐकूं येतो असं तो समजे.

त्याला वाटलं वेलींच्या शृंखला मुद्दाम आपल्याला जखडून टाकीत आहेत. झाडं मुद्दाम फांद्या पसरवून आपला रस्ता रोखीत आहेत. निसर्गाचा त्यामुळें त्याला राग आला. त्याला लवकर मरूं द्यायला जणूं निसर्ग अजून तयार नव्हता.

तो मोठ्या निश्चयानें चालूं लागला. जिथून लढाई दिसेल अशा जागीं येऊन तो उभा राहिला. तोफांचा आवाज ऐकतांच त्याच्या अंगाचा थरकांप उडाला. बंदुकांच्या आवाजानें त्याच्या छातींत धडकी भरली. विचार करीत तो कांहीं वेळ उभा राहिला.

तो पुन्हा लढाईच्या दिशेनें चालूं लागला. एखाद्या प्रचंड यंत्राच्या भयंकर आवाजासारखी त्याला लढाई वाटली. त्या यंत्राची रचना, त्याचं काम आणि त्याची ताकद ह्यांमुळें तो गोंधळून गेला. त्या यंत्रांतून बाहेर येणारीं प्रेतं पाहण्या-साठीं तो अधिक जवळ गेला.

एक कुंपण ओलांडून तो पुढें गेला. कुंपणापलीकडे सर्वत्र कपडे आणि तोफा पडल्या होत्या. घडी केलेलं एक वर्तमानपत्र धुळींत पडलं होतं. आपल्या हातांत तोंड लपवून एका सैनिकाचं प्रेत पडलेलं होतं. त्याच्या सोबतीला थोड्या अंतरावरच आणखी चार पांच प्रेतं पडलीं होती. ऊन्ह प्रखर पडलं होतं.

हा भाग मृत सैनिकांचा आहे नि तिथें आपण चोरासारखे शिरलों असं तरुण सैनिकाला वाटलं. एखादं प्रेत उठून आपल्याला तिथून निघून जायला सांगेल अशा भीतीनें तो तिथून घाईघाईनें निघून गेला.

तो एका रस्त्यावर आला. तिथून त्याला धुराआड दूर अंतरावर अललेले सैनिक दिसूं लागले. एका बाजूला रक्ताळलेले जखमी सैनिक पिछाडीला जात होते. ते जखमी सैनिक शिव्या देत होते. कण्हत होते. ओरडत होते. पृथ्वी हादरून

जाईल एवढा आवाज सर्वत्र उठत होता. तोफा बंदुकांच्या आवाजाच्या साक्षींत जयघोष ऐकायला येत होते व ज्या भागांतून हे आवाज ऐकायला येत होते त्या भागांतून जखमी सैनिकांची रांग येत होती.

एका जखमी सैनिकाचा बूट रक्तानें भरून गेला होता व वात झाल्यानें मोठमोठ्यानें तो हंसत होता. जनरलच्या मूर्खपणामुळें आपल्याला गोळी लागली अशी तक्रार दुसरा करीत होता. एक आपण बँडमेजर आहोंत अशा दिमाखानें चालत होता. आनंद व दुःख ह्यांचं भयानक मिश्रण त्याच्या चेहेऱ्यावर दिसत होतं. चालतां चालतां तो एक गाणं म्हणत होता.

आणखी एकाच्या चेहेऱ्यावर मृत्यु दिसत होता. त्याचे ओठ आंत दुमडले गेले होते व त्यानें दांत दाबून धरले होते. आपल्या जखमेवर दाबून धरलेले त्याचे हात रक्ताळलेले होते. आपण केव्हां पडू ह्याची जणू तो वाटच पहात होता. त्याचे डोळे जणुं अनंतांत शोध घेत होते.

कांहीं भयंकर रागावलेले होते व समोर दिसेल त्याच्यावर चिडत होते.

दोन सैनिक एका अधिकाऱ्याला घेऊन चालले होते. तो त्यांना सारखा ओरडून हळू चालायला सांगत होता.

त्याचा रस्ता अडवणाऱ्या दुसऱ्या जखमी सैनिकांच्या अंगावर ओरडून त्यानें त्यांना रस्ता सोडायला सांगितलं. ते सैनिक बाजूला झाले पण त्या अधिकाऱ्याची पाठ दिसतांच त्याला शिव्या देऊं लागले.

मधूनच एकादा दूत त्या घोळक्यांत धक्के देत आपला मार्ग काढी. कधीं तोफांना रस्ता देण्यासाठीं त्यांना बाजूला व्हावं लागे.

केंसांपासून पायापर्यंत रक्त, धूळ व बंदुकीची दारू ह्यांनीं माखलेला एक सैनिक तरुण सैनिकाच्या बरोबरीनें चालला होता. दाढीवाला एक सार्जंट त्याला कांहींतरी सांगत होता व तें ऐकण्यांत तो गुंग झाला होता. त्याच्या चेहेऱ्यावर कौतुक दिसत होतं.

थोड्या वेळानें तो तरुण सैनिकाच्या बरोबरीनें चालूं लागला. त्याला

डोळ्याला आणि हाताला अशा दोन जखमा झाला होत्या. डोक्याची जखम बांधली होती. हाताला झालेल्या जखमेनें त्याचा हात झाडाच्या फांदीसारखा लोंबत होता.

थोडा वेळ एकत्र चालल्यावर तो जखमी सैनिक धीर करून बोलला, " छान लढाई झाली. नाहीं ?"

तरुण सैनिक विचारांत गढून गेला होता. दुसरा काय बोलला तें त्याच्या लक्षांत आलं नाहीं. त्यानें विचारलं, " काय ? "

" छान लढाई झाली, नाहीं ? "

" हो. " असं म्हणून तरुण सैनिक भराभर चालूं लागला.

पण त्या जखमी माणसानें त्याचा पिच्छा सोडला नाहीं. तोहि त्याच्या मागोमाग गेला.

" छान लढाई झाली. " तो पुन्हा म्हणाला, " काय लढले म्हणतोस सगळे. आपण अशी लढाई पूर्वीं कधीं पाहिली नव्हती. आतांपर्यंत आपल्या शिपायांना संधीच मिळाली नव्हती. आतां संधी मिळाली. ते शत्रूला चांगले बडवून काढतील बघ. "

बोलतां बोलतां आपल्याला उत्तेजन मिळेल अशा हेतूनें तो तरुण सैनिकाकडे पहात होता. त्याला उत्तेजन मिळालं नाहीं पण तोच आपल्या विचारांशीं इतका एकरूप झाला होता कीं तो पुन्हा बोलूं लागला, " जॉर्जियांतला एक माणूस मला भेटला. तो म्हणतो कसा ? तोफांचे आवाज झाले रे झाले कीं तुमचीं माणसं पळून जातील. मीं म्हटलं 'चल रे, तुझींच माणसं पळतील. अन् आपलीं माणसं काय लढलींत म्हणतोस ! कुणीसुद्धां पळालं नाहीं."

सैन्यावरच्या त्याच्या प्रेमानें त्याचा चेहेरा प्रफुल्लित झाला होता.

थोड्या वेळानें त्यानें तरुण सैनिकाला विचारलं, " तुला कुठें लागलं ? "

त्या प्रश्नाचा अर्थ जरी तरुण सैनिकाच्या लक्षांत चटकन् आला नाहीं तरी तो प्रश्न ऐकतांच त्याच्या छातींत धस्स झालं.

" काय ? " त्यानें विचारलं

"तुला कुठें लागलंय ?"

"मी ऽऽ मी ऽऽ" तरुण सैनिक बोलायचा प्रयत्न करूं लागला. मग तो एकदम वळला व त्या गर्दींत मिसळला, त्याला घाम फुटला होता व त्यानें अस्वस्थतेंत तो आपल्या कोटाचं एक बटन पिळत त्यानें मान खालीं घातली व त्याचीं बोटं पिळींत असलेल्या बटनावर त्यानें आपली नजर लावली. जणूं तें बटन ही त्याच्या समोरील एक महान् समस्या होती ! तो जखमी सैनिक आश्चर्यानें त्याच्याकडे पहातच राहिला.

# ९

तो जखमी सैनिक नजरेआड होईपर्यंत तरुण सैनिक आस्ते पाऊल टाकीत होता. तो दिसेनासा होतांच तो इतर सैनिकांत मिसळला.

त्या जखमी सैनिकांत तो मिसळला होता पण एकादां सैनिक आपल्याकडे पाहून आपला गुन्हा ओळखतो कीं काय अशी त्याला सतत भीति वाटे. कांहीं वेळां त्याला जखमी सैनिकांचा हेवा वाटला. जखमी माणस सुखी असतात. असं त्याला वाटूं लागलं. आपल्यालाहि एकादी छोटीशी जखम, आपल्या शौर्याचं लाल पदक असावं असं त्याला वाटूं लागलं

तो मृत्युपंथाला लागलेला सैनिक आतां त्याच्या जवळून चालत होता. त्या माणसाचे डोळे अजूनहि अनंतांत डोकावून पहात होते. त्याच्या मृतवत् चेहेऱ्याकडे साऱ्यांचं लक्ष गेलं व ते त्याच्या बरोबर हळुहळू चालूं लागले. ते त्याच्या वेदनांबद्दल आपसांत बोलत होते व त्याला अधूनमधून सल्ला देत होते. तो कंटाळला व आपल्याला त्रास न देतां निघून जा असं त्यानें त्यांना खुणेनें सांगितलं. आपल्याला होत असलेल्या वेदना दाबून धरण्यासाठीं त्यानें ओठ घट्ट मिटून घेतले होते. वेदना कमी व्हाव्या म्हणून तो अगदीं हळू चालत होता. आपल्या थडग्याकडे चालल्यासारखा तो चालूं लागला.

त्यानें इतरांना दूर होण्यासाठीं केलेले हातवारे पहातांच तरुण सैनिक आपल्याला कांहीं चावल्यासारखा जागा झाला. भीतीनें तो ओरडला. पळत जाऊन आपला थरथरता हात त्यानें त्या जखमी माणसाच्या दंडावर ठेवला. थिजत चाललेले आपले डोळे जेव्हां जखमी सैनिकानें त्याच्याकडे वळविले तेव्हां तो ओरडून म्हणाला,

"देवा! जिम कॉंकलिन."

उंच सैनिकानें स्मित करायचा प्रयत्न केला. "हॅलो हेन्री!" तो म्हणाला.

तरुण सैनिक थरथर कांपत होता. तो कसाबसा म्हणाला, "ओऽ ऽ ऽ ह जिम्ऽ ऽ ऽ ऽ जिम्......"

रक्तानें माखलेला हात उंच सैनिकानें पुढें केला. "तूं कुठं होतास हेन्री?" त्यानें विचारलं, "मला वाटलं तूं मारला गेलास. आज चांगलीच लढाई झाली."

"जिम्—जिम्—जिम्' तरुण सैनिक अजूनहि अडखळत बोलत होता.

"तुला माहीत आहे मी तिथं होतों." उंच सैनिक म्हणाला, "अन् मला गोळी लागली. मला गोळी लागली." तो सारखं म्हणूं लागला. आपल्याला गोळी कशी लागली हें जणूं त्याला कळलंच नव्हतं.

त्याला मदत करण्यासाठीं तरुण सैनिकानें आपले हात पुढें पण उंच केले. सैनिक स्वतःच चालूं लागला. त्याला मदत करायला एक धडधाकट सैनिक आहे असं पाहून इतर सैनिक त्याच्याकडे लक्ष न देतां आपल्या जखमी दोस्तांना मदत करूं लागले.

ते दोघे चालत असतांना उंच सैनिक एकदम थांबला नि म्हणाला, "मला कसली भीति वाटते तें मी सांगतों हेन्री. मला वाटतं मी खालीं पडेन नि मग तोफांचे गाडे मला चिरडून माझ्यावरून जातील. मला त्याचीच भीति वाटते हेन्री........"

"तुझी काळजी मी घेईन जिम्. देवाशपथ मी तुझी काळजी घेईन." तरुण सैनिक ओरडला. "खरंच हेन्री?

आर्जवी स्वरानें उंच सैनिकानें विचारलं.

" हो, हो, खरंच. मी तुझी काळजी घेईन. " तरुण सैनिक म्हणाला नि मग त्याला

पुढे बोलतां येईना. त्याचा गळा दाटून आला व त्यानें एक आवंढा गिळला.

आपल्याला मदत करायला सांगत तो उंच सैनिक त्याच्या हातावर भार देऊन चालूं लागला. " आपण चांगले मित्र होतों, नाहीं हेन्री? मी नेहमींच चांगला वागलों. नाहीं का? फक्त मला चालायला मदत कर. मीं तुला मदत केली असती, नाहीं का हेन्री? "

आपल्या मित्राचं उत्तर ऐकण्यासाठीं तो बोलायचा थांबला.

आलेला हुंदका तरुण सैनिकानें गिळून टाकला. आपली मैत्री असल्याचं त्याला सांगायचं होतं पण त्याच्यानें तें जमेना.

पण एकदम उंच सैनिक आपली सर्व भीति नाहींशी झाल्यासारखा दिसूं लागला. तो पुन्हा ताठ झाला नि थिजल्यासारखा चालूं लागला. आपल्या खांद्यावर भार टाकून त्यानें चालावं म्हणून तरुण सैनिक पुढें झाला पण त्यानें मान हलविली. " नको, नको......मला......एकटं......राहूं......दे......" तरुण सैनिक त्याच्या मागें चालूं लागला.

" त्याला रस्त्याच्या कडेला घे " कुणीतरी हळूच तरुण सैनिकाला म्हणालं. त्यानें मागें वळून पाहिलं तो जखमी सैनिक सांगत होता, "तोफांचे गाडे ह्या रस्त्यानें जातील आत्ता. त्याच्या अंगावरून जायचे एकादेवेळीं. पांच मिनिटांच्या वर तो जगत नाहीं. दिसतं च आहे स्पष्ट. पण त्याला इतकी शक्ति कुठून आली?"

" देवाला ठाऊक! " तरुण सैनिक ओरडला.

तो धांवत धांवत गेला व उंच सैनिकाचा हात धरून म्हणाला, " जिम, जिम्, माझ्याबरोबर चल "

उंच सैनिकानें त्याच्या हातांतून सुटण्याचा प्रयत्न केला अन् मग क्षीण आवाजांत विचारलं, " कुठें? लढाईच्या जागीं? "

तो गवतांतून पाऊलं टाकूं लागला.

तरुण सैनिक तोफखान्याकडे पाहूं लागला. तेवढ्यांत तो जखमी सैनिक ओरडला, “अरे बापरे! तो पळतोय बघ.”

तरुण सैनिकानें चटकन् डोळे वळवून पाहिलं. त्याचा मित्र अडखळत, धडपडत, कांहीं झुडपांच्या दिशेनें पळत होता. त्याचं हृदय जणुं एकदम बंद पडलं. दुःखानें तो ओरडला. नंतर ते दोघे उंच सैनिकाला पकडण्यासाठीं त्याच्या मागोमाग पळाले.

त्याला गांठल्यावर तो म्हणाला, “जिम, जिम, असं काय करतोस! अशानं तुलाच त्रास होईल.”

तशाच आवाजांत उंच सैनिकही बोलूं लागला. “नको, नको, मला नेऊं नको. मला एकट्याला राहूं दे. मला सोड.”

त्याच्या बोलण्यानें आश्चर्यचकित होऊन तरुण सैनिक म्हणाला, “तूं काय म्हणतोयस जिम? तू कुठं चाललास? मला सांग. काय आहे तुझ्या मनांत जिम?”

उंच सैनिकानें आपला पाठलाग होत आहे अशा कल्पनेनें आर्जवी आवाजानें सांगितलं, “मला सोड. मला सोड.”

“कां? तुला काय झालं जिम्?”

उंच सैनिक वळला अन् पुन्हा चालायला लागला. ते दोघे त्याच्या मागोमाग चालायला लागले. तो पुन्हा वळून पाहील अशी त्या दोघांना भीति वाटत होती. एकाद्या धार्मिक विधींत अंगांत आलेल्या माणसासारखा उंच सैनिक चालत होता.

अखेरीस तो थांबला. त्यांना वाटलं त्याला हवी ती जागा त्याला सांपडली असावी. तो ताठ उभा राहिला. त्याचे रक्ताळलेले हात त्याच्या बाजूला होते. कुणाला तरी भेटायला आल्यासारखा तो उभा राहिला.

सारं शांत होतं.

शेवटीं त्याची छाती श्वास लागल्यानें वरखालीं होऊं लागली. ती इतक्या जोरानें हलत होती कीं जणु काय तिच्यांत एकादं जनावर अडकून पडलंय्. नि सुटण्यासाठीं धडपड करीत आहे.

त्याच्या ह्या वेदना तरुणाला सहन झाल्या नाहींत. तो ओरडला, " जिम् जिम्–जिम्–"

आपलं तोंड उघडून उंच सैनिक बोलला, " मला सोड. मला नेऊंनकोस. मला सोड. "

कांहीं वेळ सारं शांत, स्तब्ध होतं.

मग उंच सैनिकाचं शरीर ताठरलं. त्याचे डोळे पुन्हा अनंतांत पाहूं लागले. त्याच्या तोंडावर एक प्रकारचं तेज असल्यासारखं त्या दोघांना वाटलं. कांहींतरी त्याला गिळीत होतं. त्याचे थरथर कांपणारे पाय फार जोरानें हलले. तो नाचत असल्यासारखा दिसला. तो आपले हात आपल्या डोक्यावर मारीत होता. मग त्याचं उंच शरीर ताठ झालं. तो पुढें झुकला अन् तोडलेल्या झाडा-सारखा पडला.

"देवा !" जखमी सैनिक ओरडला.

जागच्या जागीं थिजून तरुण सैनिकानें हें सारं पाहिलं. मग धावत धावत तो पुढें गेला व त्याच्या तोंडाकडे पाहूं लागला. त्याचं तोंड उघडं होतं. हंसल्या-सारखे त्याचे दांत दिसत होते.

त्याच्या जाकिटाची एक बाजू उघडून बाजूला झाली व लांडग्यांनीं लचके तोडल्यासारखं त्याचं शरीर तरुण सैनिकाला दिसलं.

रणांगणाच्या दिशेनें वळून सैनिकानें आपली मूठ उगारली नि तो ओरडला, " सैतान...... "

आकाशांत तांबड्या लाल सूर्याचा गोल चिकटवल्यासारखा दिसत होता.

# १०

"त्याच्यांत खूप ताकद होती." जखमी सैनिक म्हणाला. त्यानें त्याच्या एका हाताला पायानें दवचलं नि तो पुन्हा म्हणूं लागला, त्याला एवढी शक्ति कुठून मिळाली कुणास ठाऊक. पूर्वी असं कोणीं कधीं केल्याचं मला आठवत नाहीं."

दुःखावेगानें ओरडावं असं तरुण सैनिकाला वाटत होतं, पण त्याची जीभ त्याच्या टाळूला चिकटून बसली. त्याच्या तोंडांतून शब्द बाहेर फुटेना. तो खालीं बसला अन् विचार करूं लागला.

तो जखमी सैनिक बडबडत होता.

"हें बघ दोस्त." तो म्हणाला, "तो गेलाच आहे. आतां इथें त्याला कुणी त्रास देणं शक्य नाहीं. अन् माझी प्रकृतिसुद्धां धड नाहीं."

त्याच्या आवाजानें तरुण सैनिक आपल्या तंद्रींतून जागा झाला व त्यानें त्याच्याकडे बघितलं. त्या जखमी सैनिकाचे पाय लटपटत होते. त्याच्या तोंडावर मृत्यूची निळसर छटा आलेली होती.

"बापरे!" तरुण ओरडला, "तूं सुद्धां......"

"मला फक्त बटाट्याचं सूप अन छानपैकीं गादी हवी." स्वप्नांत असल्यासारखं तो म्हणाला.

त्या प्रेताकडे पहात तरुण म्हणाला, "तो इकडे कुठून आला कुणास ठाऊक. मला तो इथें सांपडला. त्यानें एका दिशेनें बोट दाखवलं.

"हो, पण त्याला विचारून कांहीं उपयोग नाहीं." जखमी सैनिक म्हणाला. ते दोघेहि प्रेताकडे पाहूं लागले.

तरुण सैनिक कांहींतरी पुटपुटला.

"त्याला खूप ताकद होती." जखमी सैनिक पुटपुटला.

त्या प्रेताकडे कांहीं वेळ पाहून त्या दोघांनीं चालायला सुरुवात केली.

"मला फार त्रास होतोयं" जखमी सैनिक म्हणाला, "मला फार त्रास होतोय्."

पुन्हा आपल्याला मृत्यु बघावा लागतो कीं काय अशी तरुणाला भीति वाटूं लागली.

"ओऽऽ मी आत्तांच मरायचा नाहीं. माझ्यावर खूप माणसं अवलंबून आहेत. माझीं पोरं पहायला पाहिजेत तूं. मी कांहीं आत्तांच मरणार नाहीं."

त्याच्या तोंडावरचं मंद स्मित पाहून तो थट्टा करीत असावा असं तरुण सैनिकाला वाटलं.

ते निघाले. जखमी सैनिक बोलत होता, "मी जरी मेलों तरी त्याच्यासारखा नाहीं मरायचा. मी पटकन् खालीं पडून मरेन. त्याच्यासारखा कुणी मेलेला मीं अजून पाहिला नव्हता."

"तुला टॉम जॅमिसन माहीत आहे? माझा शेजारी तो. तो माझ्याबरोबर होता लढतांना. एकदम मोठ्यानें ओरडला, 'तुला गोळी लागलीय्.' त्याच्या ओरडण्यानें नि शिव्या देण्यानें मीं डोक्याला हात लावून पाह्यलं अन् खरंच मला गोळी लागलेली होती. मी मोठ्यानें ओरडलों अन् पळत सुटलों तों दुसरी गोळी माझ्या हाताला लागली. मी धूम पळालों. पण मला अजून वाटतं कीं टॉम जॅमिसन ओरडला नसता तर अजून मी लढत असतों."

एवढं बोलून झाल्यावर शांतपणें त्यानें जाहीर केलं, "दोन गोळ्या मला लागल्यात. दोन छोट्या गोळ्या. पण त्या आतां मला त्रास द्यायला लागल्यात. मला वाटतं मला आतां पुढें चालवणार नाहीं."

ते चालूं लागले. तो पुन्हा म्हणाला, "तुला सुद्धां कांहीं तरी झालेलं दिसतंय् जखमांच्याकडे असं दुर्लक्ष करून चालत नाहीं. तुला वाटतं त्यापेक्षां तुझी जखम वाईट असली पाहिजे. मला पाहूं दे." त्याला उत्तर मिळालं नाहीं तरी त्याची बडबड चालू होती.

"एकदां एका माणसाला गोळी लागली." तो बोलूं लागला, "आम्ही

प्रत्येकानें त्याला विचारलं, जॉन तुला कुठें गोळी लागली ?' पण तो म्हणाला, 'छे, कांहीं झालं नाहीं.' अन् थोड्याच वेळांत तो मेला. तुझी जखमसुद्धां अशीच चमत्कारिक असायची तुला कुठें लागलं ?"

हा विषय निघाल्याबरोबर तरुण सैनिक अस्वस्थ झाला होता. तो ओरडला "मला त्रास देऊं नकोस." त्याचा त्याला अतिशय राग आला होता. त्याचा त्यानें गळासुद्धां दाबला असता. तो त्याच्याकडे पाहून पुन्हा ओरडला, "मला छळू नकोस."

"देवाशपथ मी कुणाला त्रास देत नाहीं." जखमी सैनिक उतरला.

तरुण सैनिक त्याच्याकडे पाहून म्हणाला, "गुडबाय" अन् तिथून चालायला लागला. जखमी सैनिक त्याच्याकडे पहातच राहिला.

"तूं कुठें चाललास ?" तो अखेरीस म्हणाला, "असं चालायचं नाहीं. तूं कुठें चाललास ?" त्याचे हावभाव उंच सैनिकासारखे व्हायला लागले होते हें तरुण सैनिकाच्या लक्षांत आलं.

"तिकडे." तो म्हणाला.

"हें बघ टॉम." जखमी सैनिक म्हणाला, "असं चालायचं नाहीं. तुला फार वाईट जखम झालीय्. असं चालायचं नाहीं, हेंऽऽऽ बरोबरऽऽ नाहीं."

एक कुंपण ओलांडून तरुण सैनिक चालायला लागला. जखमी सैनिकाचा आवाज त्याला ऐकायला येत होता. कांहीं अंतरावरून त्यानें वळून पाहिलं, तेव्हां शेतांत तो झुकांड्या खात चालत होता. आपण मेलो असतों तर बरं झालं असतं असं त्याला वाटलं.

जखमी सैनिकाचा प्रश्न त्याच्या नजरेसमोर सारखा उभा राहिला. आपल्या गुन्ह्यापासून आपण सुटूं शकत नाहीं असं त्याला वाटलं.

# ११

आपण रणांगणाच्या अगदीं जवळ आल्याचं आवाजावरून तरुण सैनिकाच्या लक्षांत आलं. झाडींत तुरळक माणसं दिसत होतीं व कांहीं शेतावर होतीं.

एका टेकडीच्या माथ्यावर वळसा घेऊन तो आला तेव्हां खालून चाललेलीं गाड्यांची, घोड्यांची व माणसांची गर्दी त्याच्या नजरेस पडली. तो बसून बघूं लागला. भीतीनें त्या गाड्या पळत सुटल्या होत्या. गाडीवान् घोड्यांना चाबकाचे फटकारे मारीत होते. हें सर्व पाहून त्याला वाटलं, कीं जो आरोप आपल्यावर लावला गेला असता तें कृत्य अगदीं साहजिक घडणारं होतं.

आघाडीवर जाणारी पायदळाची एक रांग त्याच्या नजरेस पडली. ते सैनिक भराभर चालत होते. रस्त्यांतले अडथळे टाळून चालत असल्यानें त्यांची चाल सापासारखी नागमोडी दिसे. घोड्यांना चाबकाचे फटकारे मिळत होते. माणसं इतरांना ढकलून पुढें जात होतीं.

ते आघाडीवर चालले होते. शत्रूचा हल्ला ते सहन करणार होते. त्यांच्या चेहेऱ्यांवर आपण महत्त्वाचं कृत्य करीत आहोंत अशी भावना होती. कांहीं झालं तरी त्यांना आघाडीवर वेळेवर पोचायचे होतं.

त्यांच्याकडे पाहतांच तरुण सैनिकाचं दुखः परत आलं. त्याला वाटलं, आपण त्यांच्यासारखे कधींच होणार नाहीं. त्याला रडावंसं वाटलं.

आपलं त्यांच्यासारखं झालं तर काय होईल, ह्याचीं कल्पनाचित्रं तो डोळ्यांसमोर उभा करूं लागला. आपण सर्वांच्या पुढें आहोंत, आपली तलवार रक्तानें माखली आहे, शत्रूचा हल्ला आपण एकटे मोडून काढीत आहोंत आणि सर्वांच्या डोळ्यांदेखत, शूर योध्यासारखे मारले गेलों आहोंत असं दृश्य तो पाहूं लागला.

त्याला त्या विचारांनीं उत्साह आला. त्याच्या कानांत विजयाचे जयघोष ऐकू येऊं लागले. शत्रूवर हल्ला करण्यांतील आवेश त्याला ठाऊक होता. धांवणाऱ्या पावलांचे आवाज, ओरडणं, शस्त्रांचा खणखणाट ह्यांच्या कल्पनांत तो रंगून गेला.

आपण उठून लढणार आहोंत असं त्याला वाटूं लागलं.

पण त्यांतल्या अडचणी त्याच्या नजरेसमोर आल्या.

त्याच्याजवळ बंदूक नव्हती. नुसत्या हातांनीं कांहीं त्याला लढतां आलं नसतं. खरं म्हणजे बंदुकी सगळीकडे पसरल्या होत्या.

शिवाय, त्याला आपली पलटण सांपडणार कशी हा प्रश्न होता. खरं म्हणजे कुठल्याहि पलटणींत तो लढला असता तरी चालण्यासारखं होतं.

तो उठून चालूं लागला. एकाद्या स्फोटक पदार्थावर पाय पडेल अशा भीतीनें जणूं तो चालत होता. आपल्या मनांतील शंकांशीं त्याचं भांडण चाललं होतं. पळून आला असलेला कुणीं त्याला पाहिला असता तर एखाद्या क्षुद्र किड्यासारखं त्याला वाटलं असतं. लढाईच्या धुमश्चक्रींत कुणी मागें वळून पहात नाहींत असा खुलासा त्यानें स्वतःला केला. पण मग कुणीतरी प्रश्न विचारील तेव्हां काय थापा मारायच्या ह्याचा विचार करीत असतां सर्वांचे डोळे आपल्याकडे लागले आहेत, असं त्याला वाटूं लागलं.

मनांतील ह्या उलट सुलट विचारांनीं त्याचा उत्साह नाहींसा झाला.

आपली योजना कोसळून पडल्यानें तो फारसा निराश झाला नाहीं, कारण त्या योजनेविरुद्ध भरपूर महत्त्वाचे मुद्दे आहेत हें त्याला पटत होतं.

शिवाय त्याची प्रकृति चांगली नव्हती. त्याला अनेक विकार झालेले होते. इतके विकार असतांना तो लढणार कसा हा प्रश्नच होता.

आपल्याला खूप तहान लागली आहे हें त्याच्या लक्षांत आलं. त्याचा घसा कोरडा पडला होता. त्याला घाम येऊन तो सुकल्यानें त्याची कातडी इतकी शुष्क झाली होती कीं तिचा कडकड आवाज आपल्याला ऐकूं येत आहे असं

त्याला वाटलं. त्याच्या शरीरांतलं प्रत्येक हाड दुखत होतं; प्रत्येक हालचाली बरोबर तें मोडायची भीति होती. त्याचे पाय म्हणजे दोन फोड होते. शिवाय त्याला भयंकर भूक लागली होती. नेहमींच्या भुकेपेक्षां ह्या भुकेची जाणीव विलक्षण होती. त्याच्या पोटांत खूप मोठं वजन असल्यासारखं त्याला वाटत होतं नि तो चालायला लागला कीं त्याला भोंवळ येई. त्याला डोळ्यांनीं स्पष्ट दिसत नव्हतं. त्याच्या डोळ्यांपुढें हिरवीं वर्तुळं दिसत होतीं.

त्याला अनेक भावनांचा अनुभव होता पण असं दुखणं कधीं झालं नव्हतं. आतां त्याला त्या सर्व विकारांच्याकडे लक्ष देणं भाग होतं नि म्हणून त्याला स्वतःबद्दल अधिक तिरस्कार वाटूं लागला. निराश होऊन नाइलाजानें आपण इतरांच्यासारखें नाहीं हें त्यानें कबूल केलं. आपण कधींच शूर वीर होणार नाहीं असं त्यानें कबूल केलं.

पण लढाई पहायच्या इच्छेनें तो रणांगणाच्या भोंवतीं घुटमळत होता. त्याला बातम्या हव्या होता. कोण जिंकतं तें बघायचं होतं.

आपल्याला कितीहि वेदना झाल्या तरी आपल्याला जय मिळवायचाय असं त्यानें स्वतःला बजावून सांगितलें. तरी त्याला मनांतून असं वाटलं कीं, आपल्या सैन्याचा पराभव झाला तर बरं होईल. शत्रूनें तडाखा मारला, कीं पलटणीचे तुकडे तुकडे होतील. त्यामुळें पुष्कळ धैर्यवान् वीरांनाहि पळून जावं लागेल. मग त्यालाहि त्यांच्यांत मिसळतां येईल. मग आपण त्यांच्यापेक्ष किती जोरानें नि किती दूर पळालों ह्याचा खुलासा त्याला करावा लागणार नाहीं. अन् स्वतःच्या गुणाबद्दल एकदां त्याची स्वतःची खात्री पटली कीं, इतरांची खात्री पटवायला त्याला वेळ लागणार नव्हता.

तसा पराभव झाला असता तर आपण मोठे दूरदर्शी आहोंत असं सिद्ध झालं असतं. पूर येणार असं ज्याला कळतं त्यानें प्रथम झाडावर चढावं हें योग्यच होतं. आपण चांगले भविष्यवादी आहोंत हें त्यामुळें सिध्द होणार होतं.

त्याला नैतिक पाठिंबा मिळणं म्हणूनच फार आवश्यक होतं. आपण

नालायक आहोंत असं स्वतःच्या मनांतून त्याला वाटत असतांना इतरांच्या-पासून त्याला तें लपवतां आलं नसतं.

जर त्याच्या सैन्याचा विजय झाला असता तर मात्र त्याची धडगत नव्हती. ह्या सर्व आवाजाचा अर्थ त्याचं सैन्य विजयी होत आहे असा असला तर त्याचे दिवस भरलेच होते. त्याला समाजांतून पळून जाऊन एकट्यानेंच कुठें तरी दिवस काढावे लागणार. त्याचीं माणसं जर आगेकूच करीत असतील तर तीं आपल्या पावलांखालीं त्याचं उज्ज्वल भवितव्य तुडवीत होतीं.

हे विचार त्याच्या मनांत येतांच तो त्या माणसांना दूर ढकलून द्यायचा प्रयत्न करूं लागला. स्वतःची खलपुरुष म्हणून त्यानें निर्भर्त्सना करून घेतली. आपण जगांत सर्वांत स्वार्थी आहोंत असं त्याला वाटलं. ते चढाई करणारे सैनिक भराभर शत्रूच्या भाल्यावर लटकले जात आहेत असं दृश्य त्यानें मना-समोर उभं केलं नि मन त्याला आपणच त्यांचे खुनी आहोंत असं वाटूं लागलं.

आपण मेलों असतों तर बरं झालं असतं असं त्याला पुन्हा वाटूं लागलं. प्रेतांचा त्याला पुन्हा हेवा वाटूं लागला. निर्जीव झालेल्यांचा त्याला पुन्हा राग येऊं लागला. केवळ संधी मिळावी म्हणूनच ते मेले असतील. नाहींतर ते सुद्धां पळून गेले असते. पण परंपरेप्रमाणें त्यांची स्तुती होणार. ते सारे भंपक आहेत असं ओरडून सांगावंसं त्याला वाटलं, पण आपण मेलों नाहीं ह्याचंहि वाईट वाटलं.

आपली सुटका करून घेण्यासाठीं त्याला सैन्याचा पराभव व्हायला हवा होता. पण असं होईल अशी अपेक्षा ठेवणं फोल होतं. त्या निळ्या लढाऊ यंत्राला निश्चित यश मिळणार अशी त्याची खात्री होती. म्हणून त्यानें इतर विचार सोडून दिले.

सैन्य नक्की विजयी होणार असं वाटायला लागलं म्हणून आपली होणारी निर्भर्त्सना टाळण्यासाठीं काय सांगावं ह्याचा तो विचार करूं लागला. त्यानें अनेक योजना मनांत तयार केल्या; पण त्या पुरेशा विश्वासार्ह ठरणार नाहींत असं समजून रद्द केल्या.

त्याच्या मनापुढें साऱ्या पलटणीचं चित्र उभं राहिलं. सर्वजण त्याला म्हणत होते, "हेन्री फ्लेमिंग कुठं आहे? तो पळून गेला नाहीं का?" आपली कोण

टिंगल करतील त्यांचीं नांवं त्याच्या नजरेसमोर उभीं राहिलीं. पुढच्या चकमकींत तो पळून जातो कीं काय ह्यासाठीं त्यांनीं त्याच्यावर नजर ठेवली असती. तो छावणींत गेल्याबरोबर त्याच्याकडे बोट दाखवून ते ओरडले असते, "तोच तो."

सगळे चेहेरे त्या कल्पनेंत त्याच्याकडे पाहून हसूं लागले. तें निर्भर्त्सनेचें हास्य होतें.

# १२

आघाडीवर चाललेल्या सैनिकांची रांग तरुण सैनिकांच्या दृष्टीच्या टप्प्याबाहेर गेली न गेली तोंच झाडींतून हजारों सैनिक आपल्यावर तुटून पडत आहेत असं त्याला वाटलं. तोफांचे आवाज ऐकूं येत होते. त्याला भयंकर भीति वाटली. पळून जाणाऱ्यांच्या समर्थनार्थ तो तयार करीत असलेलं तत्त्वज्ञान साफ विसरून गेला. काळेकुट्ट राक्षस आपल्यावर चाल करून येत आहेत असं त्याला वाटलं.

त्याला ओरडायचं होतं, पण त्याच्या तोंडांतून शब्द बाहेर फुटेना. "का–का–काय झालं–?" तो कसाबसा ओरडला.

थोड्याच वेळांत त्याच्याभोंवतीं माणसंच माणसं झालीं. त्यांचे चेहेरे काळे रंगवलेले होते व ते सर्व धिप्पाड होते. ते भराभर उड्या मारीत जाऊं लागले. त्यानें त्यांना अनेक प्रश्न विचारले पण त्याच्याशीं कोणी कांहींच बोललं नाहीं.

सगळीकडे माणसं निरनिराळ्या दिशांनीं पळूं लागलीं. सर्व बाजूंना तोफांचे गोळे पडूं लागल्यानें कोणत्या दिशेनें पळावं तें त्यांना कळेना. आपण एका प्रचंड भांडणांत अडकलों आहोंत नि आपल्याला रस्ता सांपडत नाहीं, असं तरुण सैनिकाला वाटलं. पळणारीं माणसं हजारों प्रश्न विचारीत पळत होतीं.

तरुण सैनिक पळणाऱ्या सैनिकांशीं बोलायचा प्रयत्न करीत होता. पण कुणाचंच लक्ष त्याच्याकडे नव्हतं. अखेरीला त्यानें एका सैनिकाचा हात धरला. तो सैनिक झटकन् वळला नि ते दोघे एकमेकांकडे पाहूं लागले.

" काय झालं ? का ? " तरुण अडखळत विचारूं लागला.

" मला सोड, मला सोड. " सैनिक ओरडला. त्याचा श्वास जोरानें चालला होता. त्याच्या बंदुकीवर अजूनही त्याच्या हाताची पकड गच्च बसली होती. आपली सुटका करून घ्यायची त्यानें खूप धडपड केली अन् ह्या धडपडीमुळें तरुण सैनिकाला त्याच्याबरोबर कांहीं पावलं फरफटत जावं लागलं.

" मला सोड, मला सोड " तो पुन्हा ओरडला.

" पण कां ? कां ?" तरूण सैनिक पुन्हा पुन्हा विचारूं लागला.

" नाहीं सोडीत तर हें घे " असं म्हणून सैनिकानें आपली बंदुक उचलली व तरुण सैनिकाच्या डोक्यावर तिचा तडाखा मारून तो पळून गेला.

तरुण सैनिकाच्या डोळ्यांपुढें काजवे चमकले. ढगांचा प्रचंड गडगडाट झाल्यासारखा आवाज ऐकूं आल्यासारखं त्याला वाटलं. त्याचे पाय लटपटूं लागले. तो जमिनीवर कोसळला. त्यानें उठायचा प्रयत्न केला.

पण त्याला उठतां आलं नाहीं. तो उठायची धडपड करूं लागला. पुन्हा तो खाली पडे व जमिनीवरचं गवत धरून उठायचा प्रयत्न करी. तो कण्हूं लागला.

अखेरीस त्यानें निकराचा प्रयत्न केला. हातांचा आधार घेऊन तो कसा-बसा उठला आणि झुकांड्या खात चालूं लागला. त्यानें आपलं कपाळ हातांनीं दाबून धरलं होतं. मरणापूर्वीं तो उंच सैनिक कसा चालत होता तें आठवून तो तसा चालूं लागला. त्याला चक्कर येत होती पण रणांगणावर बेशुद्ध पडलों तर आपली काय अवस्था होईल त्याची पुरी कल्पना असल्यानें तो मनावर येणाऱ्या बेशुद्धीचं पांघरूण काढून टाकायचा प्रयत्न करीत होता. आपल्याला सुरक्षितपणें कुठें पडतां येईल ह्याचा तो शोध घेऊं लागला. होणाऱ्या वेदनांचा म्हणूनच तो प्रतिकार करूं लागला.

त्यानें आपल्या डोक्यावर हळूच हात फिरवला. त्याच्या हाताला जखमेचा स्पर्श होतांच त्याला तीव्र वेदना झाल्या. त्यानें आपला हात पटकन् काढून घेतला. त्याचीं बोटं रक्तानें माखलीं होतीं.

घोडे ओढून नेत असलेल्या तोफांच्या गाड्यांचा गडगडाट त्याच्या कानीं आला. एकदा अधिकाऱ्याच्या घोड्याखालीं तो तुडवलाच जायचा एका पण थोडक्यांत वांचला. त्या माणसांच्या तोफांच्या व घोड्यांच्या घोळक्याकडे तो पाहूं लागला. त्याला वाटलं, तोफासुद्धां मोठ्या नाखुशीनें जात आहेत.

पळणाऱ्या पलटणीचे अधिकारी मोठमोठ्यानें शिव्या देत होते. एका बाजूनें विटलेले कपडे घातलेलं घोडदळ जात होतं. संध्याकाळ झाली होती व तांबूस झालेलं आकाश ढगांनीं कांहींसं झांकाळलं होतं.

तो तिथून निघाला तेव्हां तोफांचा गडगडाट त्याच्या कानीं आला. त्या तोफा संतापल्या आहेत असं त्याला वाटलं. संतापून त्या मोठमोठ्यानें भुंकत होत्या त्याच्या भोंवतीं आतां निरनिराळे आवाज ऐकूं येत होते. शत्रूचे सैनिक मध्यें घुसल्यावर झालेले भयंकर आवाज त्याला ऐकूं आले. त्यानें मागें वळून पाहिलें. सर्वत्र पसरलेल्या धुरांतील स्फोटांमुळें होणाऱ्या ज्वाला त्याला दिसल्या.

तो भराभर चालूं लागला. दिवस मावळला होता. पावलांखालची जमीनहि त्याला स्पष्ट दिसत नव्हती. एकामेकांशीं गप्पा मारीत असलेले सैनिक सर्वत्र होते.

तो चालत असलेला छोटा रस्ता निर्मनुष्य झाला होता. रस्त्याच्या कडेला उलथून पडलेल्या गाड्या दिसत होत्या. एका घळींत मेलेल्या घोड्यांचीं प्रेतं आणि मोडलेल्या वस्तूंचे तुकडे पडले होते नि त्यांनीं ती घळ भरून गेली होती.

त्याच्या जखमेच्या वेदना आतां कमी झाल्या होत्या. पण भराभर चाललं तर जखम पुन्हा दुखूं लागेल म्हणून तो हळुहळू चालत होता. आपलं डोकं हलणार नाहीं अशा बेतानें तो चालत होता. आपले पाय चालतां चालतां आपल्याला दगा देतील आणि ठेंच लागल्यामुळें आपली जखम पुन्हा दुखूं लागेल ह्या भीतीनें त्याला फार काळजी वाटत होती.

त्याला सारखी आपल्या जखमेची जाणीव होत होती. तिच्यांतून सारखं रक्त वाहत आहे असं त्याला वाटलं. त्याला वाटलं कीं आपलं डोकं सुजून एवढं मोठं झालं आहे कीं त्याचा भार मानेला सहन होणं शक्य नाहीं.

पण आपली जखम दुखत नाहीं ह्याचीहि त्याला काळजी वाटूं लागली. त्याला वाटलं आपला मेंदूच काम करीनासा झाला आहे; कुणाचीं तरी अदृश्य बोटं आपला मेंदू गच्च धरून ठेवीत आहेत.

तो अनेक आठवणी मनाशीं घोळूं लागला. त्याला आवडणारे पदार्थ त्याच्या आईनें तयार करून टेबलावर मांडून ठेवलेलं घरचं जेवण त्याला आठवलं. आपण आपल्या मित्रांच्या बरोबर तळ्यावर पोहायला गेलों आहोंत, अंगांतले कपडे काढून तळ्याच्या किनाऱ्यावर आपण फेकून दिले आहेत नि तळ्याच्या थंडगार सुवासिक पाण्यांत आपण डुंबत आहोंत असं दृश्य तो बघूं लागला.

पुन्हा तो फार थकला .त्याचे खांदे ढिले झाले. मान पुढें झुकली. खांद्याला बांधलेलं एखादं मोठं वजन ओढीत असल्यासारखा तो चालला होता. आपण एखाद्या जागीं पडावें अन् झोपीं जावें, कीं एखाद्या निवाऱ्याच्या जागीं जाऊन झोपावं ह्याबद्दल त्याच्या मनांत तीव्र द्वंद्व चालू होतं.

इतक्यांत एक अवाज त्याच्या कानीं आला, "तुला खूप लागलेलं दिसतं." तो आवाज म्हणत होता.

तरुण सैनिकानें मान वर करून पाहतांच 'हं' असा आवाज काढला.

तो मनुष्य पुढें आला व त्याचा दंड धरून म्हणाला, "मी तुझ्याच बाजूनें जात आहें. आम्ही सर्वच तुझ्या बाजूला जात आहोंत. चल तुला सोडतों."

तरुण सैनिक दारू पिऊन झिंगल्यासारखा चालत होता व तो दुसरा सैनिक त्याला आधार देत होता.

चालतां चालतां तो मनुष्य तरुण सैनिकाला अनेक प्रश्न विचारीत होता नि त्याच्याशीं सारखा बोलत होता. "तूं कुठला ? तुझी पलटण कोणती ? ३०४ ? मग ह्या बाजूला तूं कसा आलास ? बाकी कोण कुठल्या बाजूला जाईल

त्याचा ह्या धुमश्चक्रींत काय नेम म्हणा!—आज अगदीं घनघोर लढाई झाली"...तो सतत बोलत होता.

अनेक अडचणींतून आणि अनेक संत्र्यांच्या प्रश्नांना उत्तरं देऊन तो सैनिक तरुण सैनिकाला घेऊन गेला. नंतर दूरवर जळणाऱ्या एका शेकोटीकडे बोट दाखवून तो त्याला म्हणाला, "ती शेकोटी पाहिलीस?" तरुण सैनिकानें मानेनंच 'हो' म्हटलं.

"तुझी पलटण तिथें आहे. गुडबाय्. तूं लवकर बरा होशील."

त्यानें तरुण सैनिकाचा हात दाबला. त्याचा स्पर्श प्रेमळ होता. तो निघून गेला. तो निघून गेल्यावर मग तरुण सैनिकाच्या लक्षांत आलं इतक्या स्नेहानें इथपर्यंत आपल्याला आणून सोडणाऱ्या त्या माणसाचा आपण चेहेराहि पाहिला नाहीं.

## १३

तरुण सैनिक त्या शेकोटीच्या दिशेनें हळूहळू चालूं लागला. चालत असतांना आपले सहकारी आपलं स्वागत कसं करतील ह्याचा तो विचार करूं लागला. आपली निर्भर्त्सना होणार असं त्याला मनांतून वाटत होतं. एखादा चांगला प्रसंग कल्पनेनें तयार करून त्यांना सांगावा असं त्याला वाटलं. पण तेवढीहि शक्ति त्याच्यांत नव्हती.

काळोखांत लपून बसावं असं त्याला वाटूं लागलं. पण त्याला होणाऱ्या वेदनांमुळें तो बेत रहित करावा लागला. त्याला अन्न आणि निवारा हवा होता. मग त्यासाठीं त्याला कांहींहि करावं लागलं असतं तरी चाललं असतं.

झोकांड्या खात तो शेकोटीच्या दिशेनें चालूं लागला. शेकोटीच्या लाल-भडक प्रकाशांत माणसांच्या काळ्या छाया त्याला दिसूं लागल्या आणि मग सगळीकडे जमिनीवर माणसं झोपलीं असल्याचं त्याच्या लक्षांत आलं.

अचानक त्याच्यासमोर एक काळीकुट्ट भयंकर आकृति उभी राहिली. क्षणभर बंदुकीची नळी प्रकाशांत चमकली आणि 'हॉल्ट', 'हॉल्ट' असे शब्द ऐकू आले. क्षणभर तो आश्चर्यचकित झाला. पण नंतर तो आवाज आपल्या ओळखीचा आहे असं त्याला वाटलं. बंदुकीच्या नळीसमोर उभा राहून तो म्हणाला, "हॅलो विल्सन, तूंच का?"

बंदुकीची नळी खालीं झाली व ओरडणारा सैनिक हळूच पुढें आला. त्यानें तरुण सैनिकाला निरखून पाहिलं अन् तो म्हणाला "तूं का हेन्री?"

"हो. मीच."

"मला वाटलं तूं कायमचाच नाहींसा झालास. तूं मेलास अशी माझी खात्री झाली. ईश्वराच्या कृपेनें तूं जिवंत आहेस." भावनेनें त्याचा आवाज भरून आला होता.

उभं राहणंहि आपल्याला कठीण होत असल्याचं तरुण सैनिकाच्या लक्षांत आलं. त्याची सर्व शक्ति एकदम नाहींशी झाली. आपल्या सहकाऱ्यांच्या ओठांवर आपली निंदा करणारे शब्द आलेले आहेत असं वाटून आपल्या वागण्याच्या समर्थनासाठीं एखादा चांगला प्रसंग कल्पनेनें ताबडतोब शोधून काढला पाहिजे असं त्याला वाटलं. तेव्हां धडपडत झोकांड्या खात तो ओरडणाऱ्या सैनिकाच्या समोर येऊन म्हणाला, "मला फार सहन करावं लागलं. माझ्यावर भयंकर प्रसंग आला. साऱ्या रणांगणावर मी फिरत होतों. मी उजव्या बाजूला गेलों. तिथें भयंकर लढाई झाली. मी पलटणीपासून दुरावला गेलों. मला डोक्यावर गोळी लागली. इतकी भयंकर लढाई मीं पूर्वीं कधीं पाहिली नव्हती."

त्याचा मित्र चटकन् पुढें झाला, "काय, गोळी लागली? मग आधींच कां नाहीं बोललास? थांब, मीं सिम्पसनला बोलावतों."

काळोखांतून आणखी एक व्यक्ति पुढें आली. तो कार्पोरल होता. "तूं कुणाशीं बोलतोयस विल्सन्?" त्यानें विचारलं. त्याचा आवाज रागीट होता. "तूं कुणाशीं बोलत होतास? चांगला पहारेकरी आहेस की! हेन्री तूं? मला वाटलं चार तासांपूर्वींच तूं मेलास. देवा देवा, दर दहा मिनिटाला कुणीतरी येत

उत्तम दर्जाचा स्वच्छ माल घरपोंच देऊन
आपली सेवा करणारें किराणा मालाचें
व सुक्या मेव्याचें एकमेव दुकान

# न्यू सेंट्रल स्टोअर्स.

## आमचें वैशिष्टय

दिवाळींत आणि इतर प्रसंगीं आपल्या मित्रांना आणि आप्तेष्टांना भेट देण्यासाठीं सुक्या मेव्याच्या उत्कृष्ट शोभिवंत पेट्या लहान-मोठ्या आकारांत मिळतात.

*या, स्वतः पहा व खात्री करून घ्या.*

**आपलें समाधान हेंच आमचें समाधान**

**न्यू सेंट्रल स्टोअर्स,**

गिरगांव नाका, मुंबई ४.

राहतं. आम्हीं माणसं मोजलीं तेव्हां बेचाळीस माणसं कमी होतीं. पण तीं जर अशीं परत येत राहिलीं तर सकाळपर्यंत सगळीं माणसं परत येतील. तूं कुठें होतास ?"

"उजव्या बाजूला माझी पलटणीशीं ताटातूट झाली." तरुण सैनिक सांगूं लागला.

पण त्याचा मित्र घाईघाईनें मध्येंच म्हणाला, "त्याच्या डोक्याला गोळी लागली आहे. आपण कांहीं तरी केलं पाहिजे." त्यानें डाव्या हाताच्या कवळींत बंदुक धरली व उजवा हात तरुण सैनिकाच्या खांद्यावर टाकला. "खूप दुखत असलं पाहिजे." तो म्हणाला.

तरुण सैनिक आपल्या मित्राचा आधार घेऊन उभा राहिला. "खूप दुखतं." तो म्हणाला. त्याचा आवाज बिचकत बाहेर आला.

"ओऽऽऽ हो" कार्पोरल म्हणाला. त्यानें तरुण सैनिकाच्या हातांत हात अडकवला अन् तो म्हणाला, "चल हेन्री. मी तुझी काळजी घेईन."

ते दोघे जात असतां ओरडणारा सैनिक मोठ्यानें म्हणाला, "त्याला झोपायला माझं ब्लँकेट दे सिम्पसन. थांब. माझी पाणी प्यायची बाटली घेऊन जा. मीं कॉफी भरून ठेवली आहे तींत. शेकोटीच्या उजेडांत त्याचं डोकं पहा. कदाचित् जखम फार वाईट असायची. एक दोन मिनिटांत मी सुटलों कीं येतोंच."

तरुण सैनिकाचीं गात्रं बधीर झालीं होतीं. आपल्या मित्राचा आवाज दूर अंतरावरून ऐकायला येतो आहे असं त्याला वाटलं. कार्पोरलच्या हाताची पकडहि त्याला भासली नाहीं. कार्पोरल नेईल तसा तो चालत होता. त्याचं डोकं त्याच्या छातीवर पुढें झुकलं होत. त्याचे गुडघे लटपटत होते.

कार्पोरलनें त्याला शेकोटीच्या प्रकाशांत नेलं अन् तो म्हणाला, "तुझं डोकं पाहूं हेन्री."

तरुण सैनिक आज्ञाधारकपणें खालीं बसला. त्याच्या केसांतून बोटें फिरवून कार्पोरल त्याला कुठें लागलं तें बघूं लागला. शेकोटीचा प्रकाश तरुण

सैनिकाच्या डोक्यावर पडेल अशा बेतानें त्यानें त्याचं डोकं धरलं. जेव्हां त्याचीं बोटं जखमेला लागलीं तेव्हां त्यानें दातांच्या फटींतून विचित्र आवाज काढला.

"मला वाटलंच." तो म्हणाला. त्यानें जखम पुन्हा चांचपडून पाहिली. "तोफेचा गोळा घासून गेला तुझ्या डोक्याला. एकाद्यानें काठी मारावी तसं टेंगूळ आलंय्. रक्त यायचं थांबलं. सकाळीं तुझं डोकं सुजून इतकं मोठं होईल कीं त्याच्यावर टोपी बसायची नाहीं.तुला इतर कांहीं आजार होण्याची शक्यता आहे पण होईलसं वाटत नाहीं. तुझ्या डोक्यावर पट्टी बांधायला हवी. मी वैद्यकीय लोकांना पाठवतों. जरा वेळानें विल्सन येईल तुझी काळजी घ्यायला."

कार्पोरल निघून गेला. एकादं गांठोडं जमिनीवर पडल्यासारखा तरुण सैनिक जमिनीवर पडला होता. त्याची भकास नजर शेकोटीच्या ज्वाळांकडे लागली होती.

थोडया वेळानें तो आपल्या विचारतंद्रींतून जागा झाला. कांहीं गोष्टी त्याला स्पष्ट दिसूं लागल्या होत्या. समोर झाडांच्या छायेंत माणसं झोपलेलीं त्याला दिसलीं. छायेंत त्यांच्या शरीराचे आकार वाकडे–तिकडे दिसत होते. पलीकडे कांहीं माणसांच्या चेहऱ्यांवर पडलेल्या प्रकाशांत त्यांचे चेहरे थकलेले दिसत होते.

शेकोटीच्या दुसऱ्या बाजूला झाडाला टेकून एक अधिकारी ताठ बसला होता अन् तशाच स्थितींत झोंपी गेला होता. स्वप्नांनीं भिऊन कीं काय तो अधून मधून दचकून जागा होई. त्याच्या तोंडावर धुरळा उडाला होता. त्याचा खालचा जबडा ढिला पडून लोंबत होता. जणुं तो मिटून घ्यावयाची शक्ति त्याच्यांत नव्हती. खूप मोठी लढाई लढून थकलेल्या सैनिकासारखा तो दिसत होता. झोपतांना त्यानें आपली तलवार कवटाळून छातीशीं धरली होती. पण झोपेंत ती त्याच्या हातांतून निसटली अन् तिचं एक टोंक शेकोटीला स्पर्श करीत होतं.

जळणाऱ्या शेकोट्यांच्या लाल प्रकाशांत जमिनीवर पसरलेले दुसरे सैनिक दिसत होते. कांहीं मेलेल्या मुडद्यासारखे पडले होते. त्यांनीं पांघरलेल्या त्यांच्या ब्लँकेटांतून त्यांचे पाय बाहेर आले होते. त्या पायांवर असलेले बूट चिखलानें माखले होते.

त्याचा मित्र–तो ओरडणारा सैनिक–येईपर्यंत तरुण सैनिक बसून राहिला. "हेन्री," ओरडणारा सैनिक मोठ्या आवाजांत म्हणाला, "आतां एक मिनिटांत तुझी सोय होईल."

एखाद्या नव्या परिचारिकेसारखा तो वागत होता. त्यानें शेकोटींतल्या काटक्या उगीचच खालींवर केल्या अन् आपल्या बाटलींतली कॉफी आपल्या मित्राला प्यायला दिली. तरुण सैनिकानें मान मागें झुकवून ती कॉफीची बाटली तोंडाला लावली. त्याला ती थंड कॉफी इतकी आवडली कीं बराच वेळ त्यानें तोंडाला लावलेली कॉफीची बाटली काढली नाहीं. ओरडणाऱ्या सैनिकाला आपल्या मित्राकडे पाहून बरं वाटलं. त्यानें आपल्या खिशांतून एक उंची हातरुमाल काढला. बँडेजसारखी त्यानें त्याची घडी घातली आणि त्या घडीच्या मध्यावर बाटलींतलं पाणी शिंपडलं. ही चमत्कारिक घडी मग त्यानें तरुण सैनिकाच्या डोक्याला बांधली.

"आतां तुला नक्की बरं वाटत असणार" तरुण सैनिकाकडे पहात तो म्हणाला.

कृतज्ञतेनें तरुण सैनिकानें आपल्या मित्राकडे पाहिलं. एखाद्या स्त्रीच्या हाताच्या कोमल स्पर्शासारखी त्याच्या दुखऱ्या डोक्यावरील पट्टी त्याला वाटत होती.

"तूं मुळींच ओरडला नाहींस." ओरडणारा सैनिक म्हणाला, "डोक्याला गोळी लागणं म्हणजे कांहीं थट्टा नाहीं. दुसरा कोणी असता तर केव्हांच हॉस्पिटलमध्यें गेला असता."

तरुण सैनिक कांहींच बोलला नाहीं. तो आपल्या जाकिटाच्या बटणांशीं चाळा करूं लागला.

"चल." ओरडणारा सैनिक म्हणाला, "तुला झोंपवतों. रात्रभर तुला चांगली झोप मिळाली पाहिजे."

तरुण सैनिक उभा राहिला. त्याच्या मित्रानें त्या झोपलेल्या सैनिकांच्यामधून रस्ता काढीत त्याला नेला. खालीं वाकून त्याच्या मित्रानें आपलीं ब्लँकेटं उचललीं. रबराचं ब्लँकेट त्यानें जमिनीवर आंथरलं अन् लोकरीच्या ब्लँकेटांत सैनिकाला लपेटलं. "हं, झोप आतां." तो तरुण सैनिकाला म्हणाला.

तरुण सैनिकानें समाधानानें पाय पसरले नि तो झोपूं लागला. ती जमीन त्याला एखाद्या नरम बिछान्यासारखी वाटत होती.

पण झोपतां झोपतां तो ओरडला, "थांब, तूं कुठें झोंपणार आहेस?"

त्यांच्या मित्रानें त्याला चूप बसवीत सांगितलें, " तूं झोप बघूं आतां."

" पण तुझीं ब्लँकेटं तर मीं अडकवलीं आहेत. तुला अंथरायला–पांघरायला काय आहे?" तरुण सैनिकानें विचारलं.

" चूप बस अन् झोप आतां." ओरडणारा सैनिक म्हणाला, "उगीच मूर्खासारखा वागूं नकोस."

आपल्या मित्राचे ते शब्द ऐकल्यावर तरुण सैनिक कांहीं न बोलतां झोपीं गेला. झोपेनें जड झालेलं त्याचं डोकं त्यानें घडी घातलेल्या त्याच्या हातावर विसावलं अन् जड झालेल्या त्याच्या पापण्यांनीं त्याचे डोळे झांकून टाकले. दूरवर बंदुकांच्या गोळीबाराचा आवाज होत होता. तीं माणसं कधीं झोंपतात कीं नाहीं ह्याचं त्याला आश्चर्य वाटलं. त्यानें एक लांबलचक सुस्कारा सोडला. ब्लँकेटांत त्यानें स्वतःला चांगलं लपेटून घेतलं नि त्या उबेंत एका क्षणांत तो झोंपीं गेला.

# १४

तो जागा झाला तेव्हां आपण जणुं काय हजार वर्षं झोंपलों होतों असं त्याला वाटूं लागलं. आपण डोळे उघडून ज्या जगाकडे बघतों आहोंत तें जग निराळं आहे असं त्याला वाटूं लागलं. सूर्याचीं कोवळीं किरणं जमिनीवर येऊं लागलीं होतीं नि त्यांच्यापुढें माघार घेऊन धुकं निघून जाऊं लागलं होतं. बर्फासारखं थंड दंव त्याच्या तोंडावर पडलं होतं आणि तें त्याला जाणवतांच ब्लँकेटाच्या उबेंत त्यानें आपलं तोंड खुपसलं.

खूप अंतरावर चाललेल्या लढाईचे आवाज ऐकूं येत होते. त्याला वाटलं ह्या आवाजांना आदि आणि अंत नाहींत. ते सुरू झालेले नाहींत :आणि बंद होणार नाहींत. जगाच्या अंतापर्यंत ते तसेच चालत रहाणार.

रात्रीं त्यानें पाहिलेलीं माणसं आजूबाजूला जाग येण्यापूर्वीची साखरझोंप घेत होतीं. सकाळच्या धूसर प्रकाशांत त्यांचीं धुळीनें माखलेलीं शरीरं स्पष्ट दिसत असलीं तरी त्यांच्या शरीरांना प्रेतासारखा रंग आहे. आला असं वाटत होतं नि त्यांचे अवयव निर्जीव भासत होते. त्यांच्याकडे पाहून तरुण सैनिक दचकलाच त्याला क्षणभर आपण एखाद्या मयतखान्यांत आलोंत असं वाटलं. त्याला हाल-चाल करायची भीति वाटूं लागली. त्याला वाटलं, आपल्या हालचालीमुळें हीं प्रेतं जागीं होतील आणि ओरडूं लागतील. एक क्षणभर त्याला त्या भीतीनें ग्रासलं आणि मग त्याचं मन ताळ्यांवर आलं. आपल्या मनांत उभं राहिलेलं चित्र सत्य नाहीं हें त्याच्या लक्षांत आलं. त्यानें स्वतःलाच एक शिवी दिली.

एका शेकोटींत जळणाऱ्या काटक्यांचा आवाज त्याच्या कानीं आला. त्यानें त्या शेकोटीकडे पाहिलं तेव्हां त्याचा मित्र शेकोटींत काठी घालून आग डींवचीत असलेला त्याला दिसला. पलीकडे धुक्यांत माणसांच्या अस्पष्ट आकृति हलतांना दिसत होत्या. कांहीं अंतरावर कुणींतरी लाकडं फोडीत होतं व कुऱ्हाडीच्या घावांचा आवाज ऐकूं येत होता.

एकदम दूर अंतरावरून ड्रमचा आवाज नि बिगुलाचें युद्धसंगीत ऐकूं येऊं लागलीं. प्रथम दूरवर ऐकू येणारे ते आवाज जवळ जवळ येऊं लागले व मग त्याच्या पलटणीचे ड्रम्स आणि बिगुलें वाजूं लागलीं.

झाडींतलीं माणसं हलूं लागलीं. त्यांचीं डोकीं वर उंचललीं गेलीं. दबल्या आवाजांत ते बोलूं लागले. त्या मिश्र आवाजांत शिव्याशाप भरलेले होते. इतक्या सकाळीं लढाई सुरू केल्याबद्दल अनेक देवतांचे उद्धार झाले. एका अधिकाऱ्यानें ओरडून दिलेल्या आज्ञा ऐकूं आल्या आणि माणसांच्या हाल-चालींची गति वाढली. प्रेतासारखीं वाटणारीं शरीरं उठून बसलीं. निर्जीव वाटणाऱ्या हातांच्या मुठी वळून डोळे चोळूं लागल्या.

तरुण सैनिक उठून बसला नि त्यानें एक प्रचंड जांभई दिली, डोळे चोळले व हळूच आपल्या डोक्याला बांधलेली पट्टी चांचपडून पाहिली. तो उठलेला पाहून त्याच्या मित्रानें विचारलं, " कसं वाटतंय् तुला आतां हेन्री ? "

तरुण सैनिकानें आणखी एक जांभई दिली. तोंडाचा चंबू केला. आपलं डोकं एखाद्या टरबुजासारखं झालंय् असं त्याला वाटत होतं आणि त्याच्या पोटांत त्याला चमत्कारिक वाटूं लागलं होतं. " खूप दुखतंय्. " तो म्हणाला.

" सकाळीं तुला बरं वाटेल असं मला वाटलं होतं" त्याचा मित्र म्हणाला. " बघूं तुझी पट्टी ! निसटली वाटतं ? " जवळ येऊन तो त्याची जखम चांचपडून पाहूं लागला.

" बापरे ! " तरुण सैनिक ओरडला, " तूं माझी जखम दुखवतोस. तुला हळू बघायला काय होतं ? खिळे ठोकल्या सारखीं बोटें दाबतोस तूं. "

त्यानें रागानें आपल्या मित्राकडे पाहिलं पण त्याचा मित्र शांतपणें म्हणाला, " ऊठ. थोडं खाऊन घे. मग बरं वाटेल तुला. "

ओरडणाऱ्या सैनिकानें शेकोटीच्या उबेंत आपल्या मित्राला खाऊं घातलं. इकडे तिकडे पडलेले टिनचे प्याले त्यानें गोळा केले व काजळीनें माखलेल्या एका टिनच्या भांड्यांतली काळीकुट्ट कॉफी त्या कपांत ओतली. त्यानें थोडं ताजं मांस मिळवलं होतं. तें त्यानें शेकोटीवर भाजलं. मग न्याहारी खाणाऱ्या आपल्या मित्राकडे कौतुकानें तो पहात बसला.

नदीकिनाऱ्यावरील छावणींत असतांना होता त्यापेक्षां आपला मित्र खूप बदलला आहे असं तरुण सैनिकाच्या लक्षांत आलं. आपल्या शौर्याचं तो आतां सतत मोजमापन करीत नसे. आपल्याला बोंचणाऱ्या एकेका शब्दासाठीं तो आतां भांडत नसे. तो आतां ओरडून बोलणारा तरुण सैनिक राहिलेला नव्हता. त्याच्यांत आतां भरपूर आत्मविश्वास तयार झाला होता. आपले हेतु व ते पार पाडण्याची आपली लायकी ह्यावरील त्याचा विश्वास आतां वाढला होता. आणि मनांत एकदा विश्वास निर्माण झाल्यामुळें एखाद्याच्या शब्दावर तो हल्लीं चिडत नसे.

तरुण सैनिक विचार करूं लागला. तो आपल्या मित्राला आतापर्यंत एक अवखळ, बेछूट, मत्सरी पोर समजत होता. आतां त्याच्यांत शहाणपणा आला होता आणि त्याच्या सहवासांत रहाणं त्याला अधिक सुकर वाटत होतं.

आपल्या गुडघ्यावर कॉफीचा प्याला ठेवून त्याच्या मित्रानें तरुग सैनिकाला विचारलं, " आपग त्यांना चोपून काढू असं तुश वाटतं हेन्री ?"

तरुण सैनिकानें एक क्षणभर विचार करून उत्तर दिलं, " आपण एकटे त्यांना मारूं अशी पैज तूं परवां मारली असतीस. "

त्याच्या मित्राला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला, " हो. कदाचित्. "
आपल्या मित्राच्या कबुलीमुळें तरुण सैनिकाला आश्चर्य वाटलं. आपले शब्द परत घेण्याच्या उद्देशानें तो म्हणाला, " नाहीं. तूं असं म्हणाला नसतास. "

पण त्याचा मित्र त्याला म्हणाला, " तूं वाईट वाटून घेऊं नकोस हेन्री. मला वाटतं मी त्यावेळीं खूप मूर्ख होतों."

कांहीं वेळ दोघेहि स्तब्ध होते.

" सगळ्या अधिकाऱ्यांना वाटतं, आपण बंडखोरांना चांगले चोपून काढूं म्हणून." त्याचा मित्र म्हणाला.

" मला त्याबद्दल कांहीं माहीत नाहीं." तरुण सैनिक म्हणाला, " पण उजव्या बाजूला मला जो अनुभव आला तो मात्र ह्याच्या अगदीं विरुद्ध होता. मी होतों तिथून मला जें दिसलं त्यावरून आपल्यालाच चांगला मार बसत आहे असं मला वाटलं. "

" तुला असं वाटलं ? " त्याच्या मित्रानें विचारलं, " मला वाटतं काल आपण त्यांना चांगला मार दिला. "

" मुळींच नाहीं. " तरुण सैनिक म्हणाला, " देवा, देवा. तूं कालची लढाई बघायला हवी होतीस. " नंतर त्याच्या मनांत एकदम विचार आला नि तो म्हणाला, " जिम् कॉंकलिन मेला. "

" काय ? खरं ? जिम् कॉंकलिन ? " त्याच्या मित्रानें विचारलं.

तरुण सैनिक हळू म्हणाला " हो. तो मेला. त्याला गोळी लागली. "

" जिम् कॅाकलिन् म्हणातोस तूं ? गरीब बिचारा ! "

त्यांच्या भोंवतीं सर्वत्र अनेक शेकोट्या होत्या व त्यांच्यावर धुरकटलेलीं भांडीं होतीं. त्यांपैकीं एका शेकोटीकडून भांडणाचे आवाज ऐकूं आले. दोन सडपा ळ सैनिक एका धिप्पाड सैनिकाला चिडवीत होते. तो दाढीवाला धिप्पाड सैनिक चिडला अन् त्याची कॉफी त्याच्या पाटलोणीवर सांडली. तो खूप संतापला व त्यानें भरपूर शिव्या दिल्या. त्या शिव्यांचा राग येऊन त्याला चिडवणाऱ्यांनीं त्याला परत शिव्या दिल्या. बहुधा मारामारीच होणार होती.

तरुण सैनिकाचा मित्र त्यांच्यांत समझोता घडवून आणण्यासाठीं उठून त्यांच्याकडे गेला. " एक तासांत आपण बंडखोरांशीं लढणार आहोंत. मग आपसांत कशाला मारामारी करायची ? " तो म्हणाला.

" आम्हाला तूं शिकवूं नकोस. " त्या दोघांपैकीं एक म्हणाला, " तुला चार्ली मॉर्गननें ठोकून काढल्यापासुन मारामारी तुला आवडत नाहीं हें मला माहीत आहे. पण तुझा इथें काय संबंध ?"

" संबंध नाहीं. " मित्र म्हणाला, " पण मला ऽ ऽ " मग कांहीं वेळ चर्चा झाली.

त्या दोन सैनिकांनीं धिप्पाड सैनिकाकडे बोटं दाखविलीं , " तो ऽ ऽ " ते बोलूं लागले. तो धिप्पाड सैनिक रागानें लाल पडला. आपला जबरदस्त पंजा त्या दोघांच्याकडे दाखवीत तो म्हणाला, " दोघे ऽ ऽ ऽ "

ह्या शाब्दिक लढाईंत त्यांची मारामारीची इच्छा नाहींशी झाली. तरुण सैनिकाचा मित्र आपल्या जागेवर जाऊन बसला. थोड्याच वेळानें भांडणारे ते तिघे एकमेकांशीं गप्पा मारूं लागले.

" लढाई संपल्यावर आपल्याशीं मारामारी करावी लागेल असं जिमी रॉजर्स म्हणाला." तरुण सैनिकाला मित्र सांगूं लागला, " पण मला मारामारीचा कंटाळा आला. "

" तूं खूप बदलला आहेस " हसून तरुण सैनिक म्हणाला, " तूं पूर्वी-सारखा राहिलेला नाहींस. त्या आयरिश ऽ " तो बोलायचा थांबला.

" मी तेव्हां असा नव्हतों हें खरं आहे " मित्र म्हणाला.

"मला तसं म्हणायचं नव्हतं," तरुण सैनिक अडखळत म्हणाला.

" तूं वाईट वाटून घेऊं नकोस हेन्री. " मित्रानें उत्तर दिलं. पुन्हा दोघे स्वस्थ बसले.

" काल पलटणींतलीं अर्धीं माणसं नाहींशीं झालीं." मित्र म्हणाला, "मला वाटलं ते सारे मेले असावेत. पण रात्रीं सारखीं माणसं परत येत होतीं अन् आत्तां फारच थोडीं माणसं बेपत्ता आहेत. तुझ्यासारखीं तीं कुठेंतरी असतील, नाहींतर दुसऱ्या पलटणीबरोबर लढत असतील. "

"खरंच !" तरुण सैनिक म्हणाला.

## १५

'ऑर्डर आर्म' करून आगे कूच करायच्या तयारींत पलटण उभी असतांना ओरडणाऱ्या सैनिकानें पिवळ्या कागदांत बांधून दिलेल्या पुडक्याची तरुण सैनिकाला आठवण झाली.

" विल्सन." तो म्हणाला.

" काय ?"

आपल्या मित्राची दृष्टि समोरच्या रस्त्यावर लागलेली पाहून सैनिकानें आपला बेत बदलला. " कांहीं नाहीं." तो म्हणाला.

त्याच्या मित्रानें आश्चर्यानें त्याच्याकडे पहात विचारलं, " पण तूं कांहीं म्हणत होतास."


# वीरकर आहार भवन

( पूर्वीचें वीरकर यांचें वेलणकर हॉटेल )

गिरगांव नाका, मुंबई ४.

**उत्तम शाकाहारी जेवण आणि अल्पोपाहार ह्यांसाठीं प्रसिद्ध.**

' जॉय् आइस्क्रीम ' हें आमचें वैशिष्ट्य.



**स्त्रिया आणि कुटुंबें ह्यांच्यासाठीं स्वतंत्र जागा**

( दर रविवारीं बंद असतें. )

" कांहीं नाहीं. " तरुण सैनिक पुन्हा म्हणाला.

त्या पुडक्याची आठवण देऊन आपल्या मित्राला दुखवायचं नाहीं असं तरुण सैनिकानें ठरवलं.

त्याला आपल्या मित्राची भीति वाटूं लागली होती. कोणीं प्रश्न विचारले कीं त्याची भावना दुखावली जाई. आपला मित्र स्वभावानें बदलला असल्यानें आपल्याला फार प्रश्न विचारणार नाहीं ह्याची त्याला खात्री होती पण थोडा वेळ मिळतांच आपण काल केलेल्या साहसाचं वर्णन करून सांगायचा आग्रह आपला मित्र करील ह्याबद्दल त्याला खात्री होती.

आपल्या मित्रानें अशी उलट तपासणी सुरू केलीच तर त्याच्या विरुद्ध वापरायला आपल्या जवळ त्या पुडक्याचं हत्यार आहे ह्याचं तरुण सैनिकाला बरं वाटलं. आतां परिस्थितीवर त्याचा ताबा होता.

त्याच्या मित्रानें एकदां भावनेच्या भरांत हुंदके देत देत आपल्याला मरणाची भीति वाटत असल्याचं सांगितलं होतं. त्या पुडक्यांत त्यानें आपलं मृत्युपत्र करून ठेवलं होतं. पण तो मेला नव्हता. उलट तरुण सैनिकाच्या ताब्यांत सांपडला होता.

तरुण सैनिकाला आपण आपल्या मित्रापेक्षां श्रेष्ठ आहोंत असं वाटत होतं; पण त्याच्याशीं तो प्रेमळपणें वागत होता.

त्याचा स्वाभिमान पुन्हा जागा झाला होता. आतां आपण सांपडणार नाहीं अशी त्याची खात्री झाली होती. आपल्या सर्व चुका जणूं त्यानें काळोखांत केल्या होत्या.

त्याच्या कालच्या वागणुकीकडे त्यानें तिऱ्हाइताच्या नजरेनें पाहिलं. नशिबानें आपल्याला हात दिल्यामुळें त्याला खूप बरं वाटलं. मोठ्या दिमाखानें जुना सैनिक म्हणून मिजास मारायचा तो परवाना होता. तो आपलीं जुनीं दुःखं विसरला.

फक्त दुर्दैवी माणसंच परिस्थितीच्या नांवानें प्रामाणिकपणानें ओरडत असतात असं त्याला वाटलं. ज्यांच्या पोटांत अन्न आहे आणि मनांत आपल्या

सहकाऱ्याबद्दल प्रेम आहे अशीं माणसं कधींच आरडाओरड करीत नाहींत. दुर्दैवी माणसांना खुशाल शिव्या देऊं दे. सुदैवी माणसें चैन करतात.

होऊं घातलेल्या लढाईबद्दल त्याला काळजी वाटेनाशी झाली. आयुष्यांतल्या पुष्कळ जबाबदाऱ्या टाळतां येतात हें तो शिकत होता. काल शिकलेल्या धड्यामुळें पुढच्या चोवीस तासांची त्याला काळजी वाटेनाशी झाली होती. पुष्कळसं नशिबावर अवलंबून होतं. शिवाय त्याचा आत्मविश्वास चांगलाच वाढला होता. आतां तो अनुभवी पुरुष झाला होता.

शिवाय देवाचा वरदहस्त असलेल्या त्याच्यासारख्या नशीबवान् पुरुषाला ते कसे ठार मारूं शकणार ?

लढाईतून पळून गेलेल्या कांहीं माणसांचे भीतिग्रस्त चेहेरे त्याला आठवले. त्यांच्याबद्दल त्याला तिरस्कार वाटूं लागला. जरुरीपेक्षां ते अधिक भ्यायले होते. ते सारे भेकड होते ! आणि तो ? तो स्वतः मोठ्या दिमाखानें आणि कौशल्यानें पळाला होता !

त्याचं लक्ष ह्या विचारावरून त्याच्या मित्रानें वळवलं. किंचित् खांकरून त्याचा मित्र म्हणाला,

"फ्लेमिंग !"

"काय ?"

त्याचा मित्र थोडा खोकला अन् म्हणाला, "मला वाटतं तूं माझीं पत्रं परत दिलींस तर बरं होईल." हें बोलतां बोलतां त्याचा चेहेरा लाल झाला होता.

"ठीक आहे विल्सन." तरुण सैनिक म्हणाला. त्यानें आपल्या जाकिटाचीं दोन बटणं सोडलीं अन् खिशांत हात घालून पुडकं काढलं नि आपल्या मित्राला दिलं. तें पाकीट देतांना कांहींतरी बोलावं असं त्याला वाटत होतं. पण नेमकं काय म्हणायचं तें ऐनवेळीं न सुचल्यानें तो कांहींच बोलला नाहीं. आपण करतों हें फार मोठं औदार्य आहे असं त्याला वाटलं.

त्याच्या मित्राला खूपच लाज वाटत होती. आपल्या मित्राकडे पाहून तरुण सैनिकाला स्वतःचा अभिमान वाटूं लागला. त्याला स्वतःच्या कृत्याबद्दल असं

कधीं लाजावं लागलं नव्हतं. तो एक सद्‌गुणी तरुण होता. त्याला आपल्या मित्राची कींव वाटूं लागली.

ह्या प्रसंगानंतर आणि त्यानें पाहिलेल्या लढायांचे देखावे आठवून आपण घरीं जाऊन लोकांना लढाईबद्दल सुरस गोष्टी ऐकवण्यास समर्थ आहोंत असं तरुण सैनिकाला वाटूं लागलं. एका उबदार खोलींत आपण बसलों आहोंत नि कानांत प्राण आणून आपल्या कथा ऐकणाऱ्या लोकांना आपले युद्धाचे अनुभव आपण ऐकवीत आहोंत असं दृश्य त्याच्या नजरेसमोर दिसूं लागलं. त्याच्या गांवासारख्या लहान खेड्यांत असल्या गोष्टींना कितीतरी महत्त्व होतं.

लढाईच्या हाणामारींत आपण शूर योद्धे आहोत असं कथा ऐकणाऱ्यांच्या डोळ्यापुढें दृश्य उभं असलेलं त्याला आपल्या मनःश्चक्षूंपुढें दिसूं लागलं. आपला प्रेमाचा पुरुष एवढीं शौर्याचीं कृत्यें करतो आहे ह्याचं कौतुक आपल्या आईच्या नि त्या शाळेंतल्या तरुणीच्या चेहेऱ्यावर असलेलं त्याला दिसूं लागलं.

# १६

प्रथम बंदुकांचे आवाज ऐकूं येत होते. त्यांत तोफांचे आवाज मिसळले गेले.

खंदकांत अडकून पडलेल्या एका पलटणीला सोडविण्यासाठीं तरुण सैनिकाच्या पलटणीला पाठविण्यांत आलं. बंदुका ठेवून लढतां येईल अशा खोदलेल्या धनुष्याकृति खंदकांत माणसं मोर्चे बांधून उभीं होतीं. त्यांच्या मागें झाडी होती. समोर कांहीं मोकळी जागा होती. त्या पलीकडील झाडींतून गोळीबाराचा आवाज ऐकूं येत होता. उजव्या बाजूनें प्रचंड हाणामारीचे आवाज ऐकूं येत होते.

आपली पाळी केव्हां येते ह्याची वाट पहात माणसं छोट्या तटबंदीमागें वाट पहात होतीं. पुष्कळांनीं लढाईच्या दिशेनें पाठी वळवल्या होत्या. तरुण सैनि-

काऱ्या मित्रानें आपल्या हातांनीं आपलं तोंड झाकून टाकलं. तो झोपीं गेल्यासारखा दिसत होता.

तरुण सैनिकानें समोरच्या झाडींत निरखून पाहिलं. झाडाच्या पडद्यानें त्याची दृष्टि अडकवली होती. कांहीं खंदक त्याला दिसत होते. कांहीं झेंडे त्या मातींत फडफडत होते. त्याच्या पलीकडे सैनिकांच्या काळ्या आकृति दिसत होत्या.

समोरच्या आणि डावीकडच्या झाडींतून गोळीबाराचे आवाज ऐकूं येत होते. उजव्या बाजूनें येणारा आवाज आतां खूपच वाढला होता. श्वास घ्यायलाहि न थांबतां तोफा आग ओकीत होत्या. त्यांच्या भयंकर गडगडाटांत एक शब्दहि ऐकूं येणं अशक्य झालं होतं.

तरुण सैनिकाला विनोद करायची इच्छा झाली होती. पण आपल्या आवाजावर केलेला विनोद ऐकायलाहि तोफा तयार नव्हत्या. त्यांनीं त्याचं वाक्य पुरं होऊं दिलं नाहीं. शेवटीं तोफांचा गडगडाट थांबला. त्याबरोबर खंदकांतल्या सैनिकांत निरनिराळ्या बातम्या पसरायला सुरुवात झाली. पण आतां बातम्यासुद्धां फार आशेनें पसरत नव्हत्या. सैनिकांना सर्वत्र अपशकुन दिसत होते. वरच्या अधिकाऱ्यांनीं केलेल्या घोडचुकांची यादी त्यांच्या कानावर येऊं लागली. येऊं घातलेल्या आपत्तीच्या अनेक खुणा त्यांना दिसूं लागल्या. उजव्या बाजूला वाढलेले लढाईचे आवाज तें सैन्य ज्या आपत्तींत सांपडलं होतं तिची साक्ष देत होते.

निराश होऊन सैनिक आपसांत बोलूं लागले, "आम्ही आणखी काय करणार ?" ते जणुं सर्वांना विचारीत होते. येणाऱ्या पराभवाच्या बातम्यांनीं तें गोंधळून गेले होते.

चांगलं ऊन्ह पडलं तेव्हां तरुण सैनिकाच्या पलटणीनें माघार घेतली होती. झाडींतून चालत असतांना मोठमोठ्यानें ओरडत धांवणारे शत्रूचे सैनिक त्यांना अधून मधून दिसत होते.

ह्या दृश्यानें तरुण सैनिक चिडला. "आपले अधिकारी मूर्ख आहेत." तो मोठ्यानें म्हणाला.

"असें म्हणणारा तूं कांहीं पहिलाच नाहींस." एक माणूस म्हणाला.

तरुण सैनिकाचा मित्र जागा झाल्यासारखा पाहूं लागला. काय होतंय तें त्याच्या लक्षांत आल्यावर तो म्हणाला, "मला वाटतं आपल्याला चांगलाच मार खावा लागला."

अधिकाऱ्यांना शिव्या द्यायची तरुण सैनिकाला अनिवार इच्छा झाली. त्यानें मग अधिकाऱ्यांची निंदा करणारं एक लांबलचक भाषण केलं.

"त्यांनीं खूप प्रयत्न केले असतील, पण आपलं नशीबच वाईट असणार." त्याचा मित्र म्हणाला एखाद्या मार खाल्लेल्या माणसासारखा तो चालत होता.

"आम्ही काय शूरासारखे लढत नाहीं?" तरुण सैनिकानें विचारलं.

ह्या त्याच्या प्रश्नानें त्याचा त्यालाच धक्का बसला. कांहीं क्षण त्याचं सारं शौर्य नाहींसं झालं अन् त्यानें गुन्हेगारासारखं स्वतःकडे पाहिलं. पण अशा शब्दांत तूं कां बोलतोस असं त्याला कोणीं विचारलं नाहीं. अन् त्यामुळें त्याला धीर आला. सकाळपासून तो ऐकत असलेले शब्द मग तो बोलूं लागला. "कुठलीहि नवी पलटण आपल्याइतकी चांगली लढली नाहीं असं ब्रिगेडियर म्हणाला, आणि इतरांच्या पेक्षां आपण जास्त कांहीं केलं नाहीं. मग पलटणीचा त्यांत काय दोष?"

"आपण चांगले लढत नाहीं असं कोणीच म्हणूं शकणार नाहीं." त्याचा मित्र म्हणाला, "पण आपलं नशीबच वाईट."

"आपण चांगले लढूनहि जर आपल्याला मार खावा लागत असेल तर तो आपल्या सेनापतीचा दोष आहे." तरुण सैनिक म्हणाला, "आपण सारखं लढावं अन् तरीहि एखाद्या म्हाताऱ्याच्या मूर्खपणामुळें मार खावा ह्यांत मला कांहीं अर्थ दिसत नाहीं."

"कालची सगळी लढाई तूं एकटाच लढलास असं तुला वाटतं, नाहीं?" तरुण सैनिकाच्या शेजारीं चालणारा एक सैनिक थंडपणें पण उपरोधी आवाजांत म्हणाला.

त्याचे शब्द तरुण सैनिकाचं हृदय चिरीत गेले. त्याचे पाय लटपटूं लागले. त्यानें भीतीनें त्या उपरोधी बोलणाऱ्या माणसाकडे पाहिलं. "छे, छे, मला तसं वाटत नाहीं." नरमाईनें तो म्हणाला.

त्या माणसाच्या मनांत कांहींच हेतु नव्हता. तो फक्त 'हं' म्हणाला. उपरोधिक बोलायची त्याला संवयच होती. पण त्याच्या शब्दांनीं मोठमोठ्या शूरवीरासारखं बोलायची तरुण सैनिकाची इच्छा नाहींशी झाली. तो एकदम नम्र झाला.

सैनिक आपसांत कुजबुजत होते. येणाऱ्या आपत्तीच्या कल्पनेनें अधिकारी अस्वस्थ झाले होते. माणसं गंभीर झालीं होतीं. तरुण सैनिकाच्या पलटणींतलं कुणीतरी एकदा जोरानें हंसलं नि सारे त्याच्याकडे नाखूष होऊन पाहूं लागले.

गोळीबाराच्या आवाजानें त्यांची चाल मंदावली होती. कांहीं वेळां तो आवाज दूरवर जाई पण नंतर एकदम उद्धटासारखा जवळ येई. त्या आवाजाच्या दिशेनें बरत माणसं शिव्या देत होतीं.

एका खुल्या जागेंत सर्व सैन्य जमवलं गेलं. आवाजाच्या दिशेनें शत्रूकडे तोंड करून ते उभे राहिले. सूर्य जसजसा डोक्यावर येऊं लागला तसतसे ते आवाज वाढत गेले आणि एकदम झाडींतून प्रचंड आवाज येऊं लागले. जणुं सारी झाडी पेटली होती.

"उन्हं आलीं कीं ते हल्ला चढवतील अशी मीं पैजच मारली होती." तरुण सैनिकाच्या पलटणींतला लेफ्टनंट म्हणाला, अन् निर्दयपणें त्यानें आपल्या मिशीला पीळ भरला. मोर्चे बांधून राहिलेल्या आपल्या शिपायांच्या मागें मागें तो दिमाखानें हिंडूं लागला. एक तोफखाना दूर अंतरावर गोळे सोडीत होता. आतांपर्यंत मार न खाल्लेली ती पलटण लढण्यासाठीं तयार झाली. सैनिक आपसांत कुजबुजत होते नि शिव्या देत होते.

"देवा देवा!" तरुण सैनिक म्हणाला, "शत्रु आमचा पाठलाग करतो आहे सारखा. मला तर आतां शिसारी आलीय्. आम्ही कुठें जातों, कशाला जातों, कुणाला कांहींहि माहीत नसतं. आमच्यावर सगळीकडून गोळीबार होतो अन आम्ही सगळीकडे मार खातों. हें सारं कशासाठीं होतंय् हें कुणालाहि

माहीत नसतं. पोत्यांत अडकवलेल्या मांजरासारखी आमची अवस्था आहे. आतां आम्हांला इथें कां आणलं तें मला कळत नाहीं. शत्रूनें आमच्यावर गोळ्या झाडल्या हाच उद्देश असला तर गोष्ट निराळी. हा कांहीं आमच्या नशिबाचा खेळ नाहीं. कुणीतरी मूर्ख म्हातारा ऽऽऽऽ”

“शेवटीं सगळं व्यवस्थित होईल.” त्याचा मित्र त्याला मध्येंच थांबवीत म्हणाला.

“ तूं नेहमीं एखाद्या पाद्र्यासारखा बोलतोस. ” तरुण सैनिक आपल्या मित्राला म्हणाला.

त्याच वेळेला तो चिडलेला लेफ्टनंट मध्यें पडला. मनांत सांठविलेला राग त्याला कुणावर तरी काढायचा होताच. “ तुम्ही चुप बसा.” तो सैनिकांच्या अंगावर ओरडला, “ एवढी लांबलचक चर्चा करायचं कांहीं कारण नाहीं. म्हाताऱ्या कोंबड्यांच्यासारखं कुरकुर करीत राहूं नका. तुमचं काम लढायचं आहे अन् तुम्हांला दहा मिनिटांत खूप लढायला मिळेल. कमी बोला अन् खूप लढा.”

आपल्याला कुणी उलट उत्तर देईल व मग आपण त्याच्यावर तुटून पडूं अशा बेतानें त्यानें सर्वांच्याकडे पाहिलं पण कोणीच बोललं नाहीं. “ नाहीं तर ह्या लढाईत लढण्यापेक्षां बडबडच फार होतीय्.” तो शेवटीं म्हणाला.

झाडींत सर्वत्र उन्हं पसरलीं तशी तरुण सैनिकाच्या पलटणीवर शत्रूनें हल्ला केला. त्याला तोंड देण्यासाठीं आघाडीचे सैनिक तयार झाले. प्रथम एक बंदूक उडाल्याचा आवाज आला नि मग बंदुकींचे नि तोफांचे संमिश्र प्रचंड आवाज उठले. पिछाडीच्या तोफखान्यानें त्या आवाजांत भर टाकली व मग सर्व आवाज एकत्र होऊन ढगांच्या गडगडाटासारखा एकच आवाज उठला.

पलटणींतले लोक थबकले. ते थकून गेले होते. त्यांना पुरेशी झोंपहि मिळालेली नव्हती. शत्रूच्या हल्ल्याची वाट पहात ते खांबाला बांधल्यासारखे स्थिर उभे राहिले.

# १७

शत्रु निर्दयपणें आपली शिकार करीत आहे असं तरुण सैनिकाला वाटलं. त्याला शत्रूचा भयंकर राग आला. आपल्याला विश्रांति घेण्याची संधी न देणाऱ्या शत्रूबद्दल त्याला भयंकर तिरस्कार वाटूं लागला शत्रु त्याला स्वस्थ बसून विचार करूं द्यायला तयार नव्हता. काल तो लढून चटकन पळून गेला होता. आज विचार करण्याइतकी विश्रांति आपल्याला मिळाली पाहिजे असं त्याला वाटत होतं. त्याचं शरीर आंबलं होतं. त्याच्या शरीरालाहि विश्रांति हवी होती.

पण शत्रु मात्र दम न खातां सतत लढत होता. म्हणून शत्रूचा त्याला भयंकर तिरस्कार वाटूं लागला. त्याला बरं वाटत नसतांना ते आपलं शौर्य दाखवीत होते.

" ते जर आपला असाच पाठलाग करतील तर याद राखा म्हणावं. आम्ही फार वेळ हें सहन करणार नाहीं." तो आपल्या मित्राला म्हणाला.

" त्यांनीं आपला असाच पाठलाग केला तर ते आपल्याला नदींत ढकलून देतील." शांतपणें त्याचा मित्र म्हणाला.

आपल्या मित्राच्या ह्या विधानावर तरुण सैनिक संतापून खूप ओरडला. तो एका लहान झाडामागें उभा राहिला. त्याच्या डोळ्यांत तिरस्कार सांठलेला होता नि रागानें त्यानें दातांवर दांत दाबून ठेवले होते. काल ओबडधोबड बांधलेली पट्टी अजून त्याच्या डोक्यावर होती. पट्टीवर पडलेला रक्ताचा डाग वाळला होता. त्या पट्टीवरून त्या केसांचे झुबके कपाळाकडे सरकले होते त्याच्या सद्र्याच्या व जाकिटाच्या गुंड्या उघड्या होत्या व त्यांतून विटकरी रंगाचा त्याचा गळा स्पष्ट दिसत होता. तो अधून मधून आवंढे गिळीत असल्यासारखा त्याचा गळा हलत होता.

त्याचीं बोटं बंदुकीभोंवतीं गुंडाळलीं गेलीं होतीं. ती बंदुक सर्वनाशाचं हत्यार असती तर बरं झालं असतं असं त्याला वाटलं. त्याला वाटलं त्याला अन् त्याच्या साथीदारांना शत्रु चिडवीत आहे अन् त्याबद्दल शत्रूवर सूड उगविण्यास आपण असमर्थ आहोंत असं लक्षांत आल्यावर त्याला शत्रूचा फारच राग आला. जखमेवर बसलेल्या माश्यांसारखें ते आपलं रक्त शोषून घेत आहेत असं त्याला वाटलं. त्यांचे भेदरलेले चेहेरे पहायला मिळाले तर बरं होईल अशी कल्पना त्याच्या मनांत आली.

मग एक बंदुक उडाली आणि सर्वत्र लढाई सुरू झाली. लढणारे लोक जनावरांसारखे एका खोल खड्डयांत फेंकले जात आहेत अशी कल्पना त्याच्या मनांत आली. त्या खड्डयांत जायचं शत्रूचे सैनिक चुकवीत आहेत असं त्याला वाटलं. मग त्याचं लक्ष आपल्या हातांतल्या बंदुकीकडे गेलं. त्या गर्तेत शत्रूला ढकलण्याची ती काठी आहे असं त्याला वाटलं.

आपण ताठ उभे राहिलों आहोंत हें तरुण सैनिकाच्या लक्षांत आलं नाहीं. कुठून आवाज येतात तेंहि त्याच्या लक्षांत आलं नाहीं. एकदा तर तो अडखळून पडला. आपणाला गोळी लागली आहे असं त्याला प्रथम वाटलं पण तसं कांहीं झालेलं नाहीं अशी खात्री पटल्यावर त्याला बरं वाटलं.

सार्‍या जगानें हल्ला केला तरी तो थोपवायच्या निश्चयानें तो झाडाच्या आडोशाला उभा राहिला. आपली पलटण आजची लढाई जिंकील असं त्याला वाटलं नाहीं आणि म्हणून त्याला खूप लढणं आवश्यक वाटूं लागलं.

बंदुकीच्या आगीनें त्याची कातडी भाजूं लागली. त्याच्या बंदुकीची नळी इतकी गरम झाली होती कीं एरव्हीं त्यानें ती फेंकून दिली असती. पण आतां तो गोळ्यांमागें गोळ्या ठासून भरीत होता. समोर हलणारी कुठलीहि आकृति दिसली कीं तिच्यावर तो गोळी झाडीत होता.

शत्रु माघार घेत आहे असं पाहून तो आणखी पुढें सरकला. त्याला मागें फिरावं लागलं तेव्हां तो धैर्यानें एकेक पाऊल उचलीत मागें आला.

तो लढण्यांत इतका मग्न होऊन गेला कीं आजूबाजूला कोणी लढत नाहीं हें त्याच्या लक्षांतहि आलं नाहीं. " गोळी झाडायला समोर कुणी नसलं म्हणजे

गोळी झाडायची नाहीं एवढं तुला माहीत नाहीं?" कुणीतरी त्याला चिडवण्यासाठीं म्हटलं.

त्यानें मागें वळून पाहिलं. त्याचे सर्व साथीदार आश्चर्यानें त्याच्याकडे पहात होते.

तो आपल्या साथीदारांकडे आला व जमिनीवर पडला. आपलं सारं शरीर आगीनें भाजून निघत आहे असं त्याला वाटलं. आपली पाण्याची बाटली तो शोधूं लागला.

त्याचा लेफ्टनंट आला. लढाईचा खून चढल्यासारखा तो दिसत होता. "तुझ्यासारखे हजार बेछूट लोक असते तर एक आठवड्यांत मी सारी लढाई संपवली असती." तो तरुण सैनिकाला म्हणाला.


मुंबईत रहाण्याचें सुंदर स्थान

नॅशनल होस्टेल

झावबाची वाडी, ठाकुरद्वार मुंबई--२.

एका खोलींत फक्त दोघांची सोय.

स्वस्त दर. स्नानासाठीं नेहमीं गरम पाणी.

विद्यार्थ्यांना खास सवलतीचे दर

भेटा अथवा लिहा

व्यवस्थापक,
नॅशनल होस्टेल

टेलिफोन ३८५८५
तारेचा पत्ता Store Agent.

त्याचे साथीदार त्याच्याकडे एक बेछूट योद्धा म्हणून पाहूं लागले होते.

त्याचा मित्र त्याच्याजवळ आला. "तुला कांहीं झालं नाहीं ना हेन्री?" त्यानें विचारलं.

"नाहीं." मोठ्या कष्टानें तरुण सैनिकानें उत्तर दिलं.

ह्या अनुभवामुळें तरुण सैनिक विचार करूं लागला. आपण पशु आहोंत हें त्याच्या लक्षांत आलें होतं. त्याचबरोबर आपलं कृत्य शौर्याचं, बेछूट आणि सोपंहि होतं असं त्याला वाटूं लागलं. आपण खूप महत्त्वाचे झालों आहोंत ह्याबद्दल त्याला शंका नव्हती. ह्या प्रयत्नांत त्याला डोंगरासारख्या वाटणाऱ्या अडचणी कागदासारख्या उडून गेल्या व तो शूर वीर झाला. हें सर्व घडत असतांना त्याची त्याला जाणीव नव्हती. तो झोंपेंतून उठला व आपण एक शूर सरदार झाल्याचं त्याला आढळून आलं.

त्याचे सर्व सहकारी त्याच्याकडे पहात होते. बंदुकीच्या पावडरीनें त्यांचीं तोंडं काळीं पडलीं होतीं आणि ते त्याच्याकडे पहात होते.

"छान" "छान" म्हणत लेफ्टनंट इकडून तिकडे जात होता. कांहीं सैनिकांना खूप आनंद झाला होता. "आमच्या सारखी पलटण पुन्हा ह्या सैन्याला मिळायची नाहीं." एकजण म्हणाला.

दुसऱ्यानें सांगितलं, "आपलं त्या कविते सारखं आहे."

"'A dog, a woman, an' a walnut tree,
Th' more yeh beat 'em, th' better they be!'

★ (श्वान, स्त्री, अक्रोडहि यांना जितुकेंच जास्त झोडावें,
मोडावे अघ त्यांचें, बरवेंपण तें तदंगिं जोरावे ॥)

---

★ हें शीघ्रकवित्व पंडित द. पां. खांबेटे ह्यांचें आहे.

अनुक्रम 28635
विभाग वा.वा
क्रमांक 9508
नों. दि. 3-7-61
वाचनालय

# १८

सैनिकांना कांहीं वेळ विश्रांति मिळाली पण त्या काळांतहि समोरच्या झाडींत चालू असलेल्या लढाईचे आवाज ऐकूं येत होते. सैनिकांच्या हालचालीमुळें आणि तोफा–बंदुकांच्या आवाजामुळें सारं रान हलत असल्यासारखं दिसत होतं.

एका सैनिकाला गोळी लागली होती. त्याचं कण्हणं आतांपर्यंत कुणाला ऐकूं गेलं नव्हतं पण आतां तें सर्वांना ऐकूं गेलं अन् सर्वांच्या माना त्याच्याकडे वळल्या.

" कोण ? "

" जिमी रॉजर्स. जिमी रॉजर्स "

त्यांच्या नजरेला तो पडला अन् ते बोलायचे थांबले. त्याच्याजवळ जायची त्यांना भीति वाटूं लागली. तो गवतावर आपले हात आपटीत होता व ओरडत ओरडत तडफडत होता आणि त्या भरांत आपल्याकडे लक्ष न दिल्याबद्दल त्यांना शिव्या देत होता.

जवळच कुठें तरी ओढा असावा असं तरुण सैनिकाच्या मित्राला वाटलं. पाणी आणायला जायची परवानगी त्यानें मिळवली. त्याबरोबर त्याच्याकडे पाण्याच्या बाटल्या भराभर आल्या. "आमच्या पण भरून आण."

आपल्या मित्राबरोबर तरुण सैनिक गेला. त्याला गार पाण्यानें तोंड धुवायचं होतं. दोघांनींहि ओढा शोधला पण तो न सांपडल्यानें ते परत फिरले.

परत येतांना ते जिथें होते तिथून त्यांना लढाई अधिक स्पष्ट दिसत होती. सैनिकांच्या रांगांचीं वेटोळीं त्यांना दिसत होती. आग ओकणारा एक तोफखाना त्यांच्या नजरेस पडला. दूरवर एका घराचं छप्पर नजरेत पडत होतं.

त्यांचे सैनिक एकत्र जमूं लागले होते. उन्हांत संगिनी चमकत होत्या. मागच्या बाजूला असलेल्या रस्त्यावरून कांहीं सैनिक पिछाडीला चालले होते. जंगलांतून लढाईचे आवाज ऐकूं येत होते.

त्यांच्या भोंवतीं तोफांचे गोळे पडत होते. मधूनच बंदुकांच्या गोळ्या हवें-तून शीळ वाजवीत येत आणि झाडांत शिरत.

खालच्या बाजूनें एक जनरल आणि त्याचे दुय्यम अधिकारी घोड्यावरून जात होते. एका जखमी माणसाच्या अगदीं जवळून जनरलचा घोडा गेला तेव्हां तो हातापायांनीं सरपटणारा जखमी मनुष्य तुडवला जाईल असं वाटलं; पण जनरलनें मोठ्या कौशल्यानें आपला घोडा बाजूनें नेला. तो जखमी सैनिक बाजूला एका सुरक्षित जागीं पोंचला पण त्याची शक्ति क्षीण झाली व तो जमिनीवर पडला.

जनरल आणि त्याचे अधिकारी त्या दोन सैनिकांच्या समोर येऊन थांबले. आणखी एक अधिकारी जनरलसमोर येऊन उभा राहिला. जनरल आपल्या सैन्याचा सेनापति असल्याचं दोघांनीं ओळखलं नि भराभर चालायचं सोंग करीत जनरल काय म्हणतो तें ऐकण्यासाठीं ते दोघे त्याच्या जवळच कान टवकारून राहिले.

त्या समोरच्या अधिकाऱ्याकडे पहात जनरल म्हणाला, " पुन्हां हल्ला करण्यासाठीं शत्रु तिकडे गोळा होत आहे. ते व्हाइटरसाईडच्या बाजूला हल्ला चढव-तील अन् आपण त्यांचा प्रतिकार केला नाहीं तर ते आपली प्रतिकार मोडून आंत शिरतील."

" त्यांना थांबवणं फार कठीण आहे." अधिकारी प्रथम आपल्या घोड्याला शिवी देऊन म्हणाला.

"मलाहि वाटतं तसं." जनरल म्हणाला. मग हलक्या अवाजात तो त्या अधिकाऱ्यांशीं बोलूं लागला. " तुझ्याजवळ किती माणसं आहेत ?" जनरलनें विचारलं.

" ७६व्या पलटीणीच्या मदतीला मला १२वी पलटण पाठवावी लागली त्यामुळें माझ्याजवळ आतां पलटणच शिल्लक नाहीं. पण ३०४ वी पलटण आहे ती मी पाठवूं शकेन. खेचरं हाकणाऱ्याच्या सारखं ते लढतात. पण मी त्यांना पाठवूं शकेन."

तरुण सैनिक आणि त्याचा मित्र एकमेकांकडे आश्चर्यानें पाहूं लागले.

६३८५ वा. पा.

"त्यांना तयार कर. मी इथून लढाई पाहीन. पांच मिनिटांत हल्ला सुरू होईल."

तो अधिकारी जायला निघाला तेव्हां जनरल मोठ्यानें ओरडून त्याला म्हणाला, "तुझे पुष्कळसे खेचरहाके परत येणार नाहींत."

तो अधिकारी कांहीं बोलला. जनरलच्या तोंडावर हसं दिसलं.

भ्यायलेल्या चेहेऱ्यानें ते दोघे आपल्या पलटणीकडे परत फिरले.

अगदीं थोड्या वेळांत हें सारं घडलं होतं पण तेवढ्या अत्यल्प काळांतहि आपण खूप वयोवृद्ध झालों असं तरुण सैनिकाला वाटूं लागलं. त्याला नवी दृष्टि आली होती. आपण अगदीं क्षुद्र आहोंत हें पाहून त्याला आश्चर्य वाटलं. एखाद्या केरसुणीबद्दल बोलावं तसं तो अधिकारी त्यांच्या पलटणीबद्दल बोलला होता. जणुं काय त्या झाडींतला कांहीं भाग झाडून स्वच्छ करायचा होता अन् तो त्यासाठीं केरसुणीची माहिती देत होता. ही लढाई चमत्कारिक होती.

त्या दोघांना पाहून लेफ्टनंटनें रागावून त्यांना इतका वेळ कां लागला तें विचारलं. पण त्यांचे विस्फारलेले डोळे पाहून तो बोलायचा थांबला. "आपण हल्ला करणार आहोंत." "आपण हल्ला करणार आहोंत," मित्र ओरडूं लागला.

"हल्ला?" लेफ्टनंट म्हणाला, "हल्ला? ही खरी लढाई!"

सैनिकांच्या एका टोळक्यानें त्या दोघांना घेरलं. "खरं? नक्की? कशाला हल्ला करायचा? विल्सन, तूं खोटं बोलतोस."

"मी मरणार आहे." तरुण सैनिक जोरानें ओरडून म्हणाला, "मी नक्की सांगतों तुम्हांला."

"तो मुळींच खोटं बोलत नाहीं." त्याचा मित्र म्हणाला, "आम्ही त्यांना बोलतांना ऐकलं."

घोड्यावरून येणाऱ्या दोन अधिकाऱ्यांकडे त्यांचं लक्ष गेलं. एक त्यांच्या पलटणीचा कर्नल होता अन् दुसरा जनरलशीं बोलत असलेला अधिकारी होता. ते एकमेकांशीं बोलतांना हातवारे करीत होते.

" तुम्हीं ऐकलं कसं ? " एका सैनिकानें त्या दोघांच्याबद्दल शंका घेतली पण इतरांनीं त्याला गप्प बसवलं.

एक मिनिटांतच त्यांचे अधिकारी आपल्या सैनिकांना ढकलून एकत्र जमवूं लागले. जे सैनिक तिथेंच रहायच्या बेतानें रेंगाळत होते त्यांना अधिकाऱ्यांनीं हाकलून काढलं. मेंढरं हाकावींत तसे ते सैनिकांच्या मागें लागले होते.

थोड्या वेळानें सर्व पलटण एकत्र आली. कुणाच्याहि चेहेऱ्यावर कांहीं गंभीर विचार दिसत नव्हते. पळण्याची शर्यत सुरू होण्यापूर्वी खेळाडू जसे शरीर वाकवून उभे रहातात तसे ते तयार झाले होते.

त्यांच्या भोंवतीं अनेक आवाज उठत होते. सारं जग आपआपल्या उद्योगांत अडकलं होतं. तेहि आपलं छोटंसं काम करायला सिद्ध झाले होते.

तरुण सैनिकानें मान वळवून आपल्या मित्राकडे पाहिलं. तशाच दृष्टीनें मित्रानें त्याच्याकडे पाहिलं. तें रहस्य फक्त त्या दोघांनाच माहीत होतं—" खेचरं हाकणारे फारसे परत येणार नाहींत. "

त्यांच्या शेजारचा एक सैनिक जेव्हां "आपण खलास होऊं" असं म्हणाला तेव्हां त्यांनीं संमतिदर्शक माना डोलावल्या.

# १९

तरुण सैनिक समोर पाहूं लागला. हल्ला सुरू करायची आज्ञा कुणीं दिली तें त्याला माहीत नव्हतं पण त्यानें एक पोरगेलासा अधिकारी आपली टोपी हातांत फडकावीत घोड्यावर येतांना पाहिला होता. एकाएकीं माणसं पुढें चालूं लागलीं. पडणाऱ्या भिंतीसारखी माणसांची रांग पुढें झुकली. माणसं चालूं लागल्याचं त्याच्या लक्षांत येईतों तो पुढें ढकलला गेला पण ती हालचाल लक्षांत येतांच तो पुढें धांवूं लागला.

कांहीं झाडांवर त्याचं लक्ष होतं. शत्रु तिथें आहे असं त्याला वाटलं. त्यांना गांठण्यासाठीं तो पुढें पळाला. एखादं अप्रिय काम लवकर उरकून टाकायचं अशा घाईनें तो त्या झाडांकडे पळत होता. त्याच्या त्या श्रमानें आपलं तोंड त्यानें घट्ट मिटून घेतलं होतं. त्याचे डोळे समोर रोखले गेले होते. त्याचे कपडे चुरगाळलेले होते, त्याचा चेहेरा लालभडक झाला होता. त्याच्या डोक्याला बांधलेल्या पट्टीवर वाळलेल्या रक्ताचा डाग होता. त्याची बंदूक जोरानें हलत होती. तो एखाद्या वेड्या सैनिकासारखा दिसत होता.

पलटण मोकळ्या जागेंत येतांच झाडींतून गोळीबार सुरू झाला.

प्रथम समोरचे लोक पुढें चालत होते. मग उजव्या बाजूचे पुढें झाले आणि त्यांच्या मागोमाग डाव्या बाजूचे पुढें झाले. पण थोड्याच वेळांत झाडं नि खड्डे मध्यें आल्यानें सैनिकांच्या रांगा मोडल्या आणि त्यांच्या लहान लहान टोळ्या झाल्या.

तरुण सैनिक सर्वांच्या आघाडीवर होता. त्याला त्याची जाणीवहि नव्हती. त्याची नजर अजूनहि त्या झाडांवर होती. शत्रूच्या आरोळ्या सर्वत्र ऐकूं येत होत्या. बंदुकींतून निघणाऱ्या ज्वाळा दिसत होत्या. बंदुकीच्या गोळ्या हवेंतून गात गात जात होत्या. तोफांचे गोळे झाडांच्या शेंड्यांना स्पर्श करीत येत होते. एक गोळा एका गटाच्या मध्यें येऊन फुटला. त्या स्फोटांत सांपडलेला मनुष्य आपल्या हातांनीं डोळे झाकायचा प्रयत्न करीत असलेला दिसला. गोळ्या लागून माणसं पडत होतीं. ती पलटण रस्त्यांत जखमी सैनिक सोडून पुढें सरकत होती.

ते खुल्या जागेंत आले तेव्हां त्यांना सारं स्पष्ट दिसूं लागलं.

आपण सगळं स्पष्ट पाहिलं असं तरुण सैनिकाला वाटलं. गवताचं प्रत्येक पातं आपल्याला स्पष्ट दिसत आहे असं त्याला वाटलं. समोरच्या धुरांत होणारा प्रत्येक बदल आपल्याला स्पष्ट दिसतो आहे असं त्याला वाटूं लागलं. त्यानें तें सर्व पाहून घेतलं नि त्यामुळें तिथें काय आहे तें त्याला आतां माहीत होतं. फक्त तो तिथें कसा आला तेंच त्याला कळत नव्हतं.

पण पुढें येणारे सैनिक मोठ्यानें ओरडत होते. त्यांचं तें संगीत प्रेताच्याहि अंगांत उत्साह आणणारं होतं. मृत्यु समोर दिसला कीं कसलीहि अड-

चण न जमानणारें तें संगीत होतं. ही भावना अल्पकाळ रहात असली तरी तींत स्वार्थाचा पूर्ण अभाव असतो. आणि ती भावना अशी असते म्हणूनच बहुतेक तरुण सैनिक तिथें आला होता.

तीव्र वेगानें आल्यामुळें माणसांचा वेग कमी झाला आणि आघाडीचीं माणसं रेंगाळू लागलीं. आपल्यावर होणाऱ्या गोळीबाराचाहि त्यांच्यावर परिणाम झाला होता. झाडांच्या आडोशांत माणसं रेंगाळूं, अडथळूं लागलीं. समोरचा धूर नाहींसा होऊन त्यांत लपलेलं सारं स्पष्ट दिसावं म्हणून कांहीं माणसं थांबलीं. त्यांचा उत्साह कमी झाल्यानें ते जपून वागत होते. ते माणसासारखे वागूं लागले.

आपण कित्येक मैल पळत आलों आहोंत असं तरुण सैनिकाला वाटलं. आपण एका निराळ्याच जगांत आहोंत असं त्याला वाटूं लागलं.

पलटणीची आगेकूच थांबली तसा गोळीबारहि नेम धरून संथपणें होऊं लागला. समोरच्या एका टेकडीवरून सुटलेले तोफांचे गोळे हवेंतून अमानुष संगीत गात जात होते.

थबकलेल्या माणसांना आपले कांहीं साथीदार खालीं पडलेले दिसले. कांहीं कण्हत होते, कांहीं शांत झाले होते. आपली पलटण पांगत असलेली पाहून त्यांना आश्चर्य वाटलं. ते स्वस्थ उभे राहून एकमेकांकडे पाहूं लागले. ती एक चमत्कारिक शांतता होती.

नंतर अकस्मात त्या सर्व आवाजांवर मात करणारा लेफ्टनंटचा आवाज ऐकूं आला. त्याचा पोरसवदा चेहेरा रागानें लाल पडला होता. "पुढें व्हा मूर्खांनो," तो ओरडला, "तुम्हांला पुढें आलंच पाहिजे." पुढें तो कितीतरी शब्द बोलला पण ते कुणालाच समजले नाहींत.

तो एकदम पुढें चालूं लागला व सैनिकांचेकडे वळून म्हणाला, "चला, पुढें या." पण तीं माणसं त्याच्याकडे भावनाहीन डोळ्यांनीं पाहूं लागलीं. कुणीच पुढें झालं नाहीं. त्याला थांबून परत यावं लागलं. मग तो शत्रूकडे पाठ करून उभा राहिला व आपल्या सैनिकांना त्यानें भरपूर शिव्या दिल्या. रागानें त्याचं शरीर थरथरत होतं.

तरुण सैनिकाच्या मित्राला रहावेना. तो पुढें झाला. गुडघे टेकून त्यानें समोरच्या झाडींत बंदुकीची एक गोळी झाडली. त्याच्या कृत्यानें बाकीचीं माणसं शुद्धीवर आलीं. ते मेंढरासारखा कळप करून स्वस्थ राहायचं सोडून पुढें झाले व गोळ्या झाडूं लागले. त्यांच्या अधिकाऱ्यांचे शिव्याशाप ऐकून ते आगेकूच करूं लागले. चिखलांत चाकं रुतलेल्या गाडीसारखे हेलकावे खात ते सैनिक पुढें चालूं लागले. ते कांहीं पावलं पुढें चालत, बंदुकींत गोळी ठांशीत आणि गोळी झाडून पुन्हा पुढें होत.

ते जसे पुढें झाले तसा त्यांना होणारा विरोध वाढला. बंदुकींतून निघणाऱ्या ज्वाळांची एक भींतच त्यांच्यापुढें उभी राहिली व तिनें सारे रस्ते बंद केले. धुरानें समोरचं सर्व दृश्य झांकून टाकलं. त्या धुरांतून जातांना पुढच्या पावलाला काय दिसेल त्याचा विचार तरुण सैनिक करूं लागला.

शत्रूच्या व स्वतःच्या मध्यें खुली जागा येईपर्यंत पलटण आगेकूच करीत गेली. तिथें ते झाडांच्या आडोशाला उभे राहिले.

ते थांबतांच लेफ्टनंट पुन्हा मोठयानें ओरडूं लागला. गोळी लागण्याची धास्ती असूनहि तो ओरडत शिव्या देत पुढें गेला. सगळ्या देवतांचीं नांवं घेऊन तो शिव्या देऊं लागला.

त्यानें तरुण सैनिकाचा दंड धरून त्याला सांगितलं, "चल, इथें थांबलों तर आपण सारेच मारले जाऊं. आपण तिथें पोंचलों कीं ऽऽ" पुढें त्यानें इतक्या शिव्या दिल्या कीं तो काय म्हणत होता तें तसंच राहिलं.

"तिथें?" तरुण सैनिकानें समोर हात दाखवून विचारलं.

"निश्चित तिथेंच. आपण इथें थांबूं शकत नाहीं." लेफ्टनंट ओरडला. तरुण सैनिकाच्या तोंडाजवळ तोंड नेऊन तो ओरडला, "चल" त्यानें त्याला हात धरून ओढलं.

तरुण सैनिकाला आपल्या अधिकाऱ्याचा खूप राग आला. आपला हात मोकळा करून तो ओरडला, "मग तूं स्वतः चल तर."

ते दोघे धांवत पुढें निघाले. त्यांच्या मागोमाग तरुण सैनिकांचा मित्रहि गेला. झेंड्यासमोर येऊन ते तिघेहि 'चला' 'चला' म्हणून ओरडूं लागले.

झेंडा पुढच्या बाजूला झुकला आणि त्यांच्याबरोबर निघाला. पलटणींतले सैनिक नक्की काय करावं ह्या विचारांत कांहीं वेळ थांबले आणि मग सगळे पुढें सरकले.

त्या मोकळ्या जागेंतून ते पुढें निघाले. त्यांच्या दिशेनें शत्रूच्या बंदुकांच्या ज्वाळा उड्या घेऊं लागल्या. त्यांचा रस्ता धुरानें झांकून टाकला. प्रचंड आवाजानें त्यांच्या कानठळ्या बसल्या.

आपल्याला गोळी लागण्यापूर्वी आपण समोरच्या झाडींत पोंचावं म्हणून तरुण सैनिक वेड्यासारखा धांवत सुटला. त्यानें आपलं डोकं खाकीं वांकवलं होतं. त्यानें आपले डोळे मिटून घेतले होते. त्याच्या तोंडाच्या दोन्ही कोपऱ्यांत फेंस दिसत होता.

तो पुढें निघाला तेव्हां जवळच असलेल्या झेंड्याबद्दल त्याला नितांत प्रेम वाटूं लागलं. तो झेंडा त्याला सुंदर आणि अजिंक्य वाटला. त्याला वाटलं, आपल्या बाजूनें कृपेची सांवली झुकविणारी तो झेंडा ही एक देवताच आहे. एखाद्या स्त्रीसारखा तो आपल्याला बोलावीत आहे असं त्याला वाटलं. तो त्या झेंड्याच्या अगदीं जवळ राहूं लागला.

त्या धांवपळींत झेंडा धरणारा मानकरी सार्जंट अडखळलेला त्याला दिसला. तो अडखळला व मग त्याची गति थांबली.

त्यानें झेंडा धरायचा प्रयत्न केला व त्याच वेळेला दुसऱ्या बाजूनें त्याच्या मित्रानें झेंडा धरला. त्यांनीं तो झेंडा एकमेकांपासून हिसकावून घ्यायचा प्रयत्न केला पण मरत असलेला सार्जंट झेंडा गच्च आवळून धरून पडला होता.

पण एका क्षणांत त्याची पकड ढिली पडली. त्यांनीं झेंडा हिसकावून घेतला व ते पुढें निघाले. खालीं पडत असलेल्या सार्जंटाच्या निर्जीव शरीराचा हात त्याच्या मित्राच्या खांद्यावर पडला.

# चहाची पूर्वपीठिका



चिनी लोकांना पूर्वी पिण्याचें स्वच्छ पाणी मिळणें अशक्य होई म्हणून मिळेल तें पाणी ते उकळून पीत व त्या पाण्याला चव यावी म्हणून निरनिराळ्या वनस्पतींचीं पानें त्यांत टाकीत. चहा पिण्याचें चीनमध्यें जें अमाप प्रमाण आहे तें ह्याचमुळें.

‘ किटली ’ हें खरें मद्यपात्र. परंतु चहाच्या प्रसाराबरोबर तें चहापात्र झालें.

अशा सत्य पण चमत्कृतिपूर्ण कथा-चित्रांचा प्रथम संग्रह लवकरच स्टुडिओ डी. जी. जी. तर्फे प्रदर्शित होत आहे. उत्कृष्ट छपाई, वैशिष्ट्यपूर्ण मांडणी व सजावट ह्यांनीं नटलेला हा संग्रह आपल्या घरीं अवश्य हवा. हिंदी, मराठी, गुजराती व इंग्रजी अशा चार भाषांत प्रसिद्ध होत आहे.

पत्ता--सनी साइड, जिमखाना रोड, मुंबई १९.

# २०

झेंडा घेऊन ते दोघे जेव्हां वळले तेव्हां पलटण बरीच विरळ झाली असल्याचं त्यांच्या नजरेस पडलं. उरलेलीं माणसं सावकाश परत येत होतीं. शत्रूवर तोफेच्या गोळ्यांसारखीं तुटून पडलेलीं माणसं आतां थकून मागें फिरलीं होतीं. अधून मधून तीं माणसं गोळ्या झाडीत होतीं. अधिकारी मोठमोठ्यानें ओरडून त्यांना आज्ञा देत होते.

"तुम्हीं कुठें निघालां?" लेफ्टनंटचा आवाज येत होता. "त्यांना गोळ्या घाला." लाल दाढीवाला एक अधिकारी मोठ्यानें आज्ञा ओरडत होता आणि शत्रूला शिव्या देत होता. त्या गोंधळांत अशक्य कृत्यें करण्याच्या आज्ञा अधिकारी कारी देत होते.

तरुण सैनिकाची व त्याच्या मित्राची झेंड्यासाठीं झोंबा झोंबी झाली. "मला दे." "नाहीं माझ्या जवळ राहूं दे." खरं म्हटलं तर झेंडा दुसऱ्याजवळ असल्याचंच एकमेकाला बरं वाटत होतं. पण झेंडा घेऊन जाण्यांतला प्रचंड धोका आपण पत्करीत आहोंत असं दोघांनाहि दाखवायचं होतं. शेवटीं तरुण सैनिकानें आपल्या मित्राला बाजुला ढकललं.

पलटण झाडींत शिरली तेव्हां शत्रु आपल्या मागावर असल्याचं त्यांच्या लक्षांत आलं. थोडा वेळ थांबून पलटण पुन्हा चालूं लागली. ते जेव्हां पहिल्या खुल्या जागेंत पोंचले तेव्हां शत्रु त्यांच्यावर निर्दयपणें आग ओकीत होता. त्यांना शत्रूनें सर्व बाजूंनीं घेरलं असं त्यांना वाटूं लागलं.

बहुतेक माणसं थकलीं होतीं, निरुत्साही झालीं होतीं. आपल्यावर होणारा गोळ्यांचा वर्षाव तीं मुकाट्यानें सहन करीत होतीं. त्या भींतीवर धडक मारण्यांत कांहीं अर्थ नाहीं असं जणुं त्यांना वाटत होतं. ती पक्की भिंत फोडण्याचा प्रयत्न करण्यांत अर्थ नव्हता. ह्या असहाय्यतेच्या भावनेचा त्यांनीं तो निकराचा प्रयत्न केला होता आणि मग त्यांना आपली कुणीतरी फसवणूक केली असं वाटूं

लागलं होतं. ते कांहीं अधिकाऱ्यांकडे त्या दृष्टीनें पाहूं लागले होते. त्या लाल दाढीवाल्या अधिकाऱ्यावर त्यांचं विशेष लक्ष होतं.

पण पलटणीच्या मागच्या बाजूला असलेले सैनिक शत्रूवर अजूनहि गोळ्या झाडीत होते. तो तरुण लेफ्टनंट सर्वांत शेवटीं होता. त्याची पाठ अजूनहि शत्रूकडे होती. त्याला दंडावर गोळी लागली होती. त्याचा हात ताठच्या ताठ लोंबकळत होता. कांहीं वेळेला आपल्या हाताची अवस्था विसरून तो आपलं बोलणं अधिक स्पष्ट व्हावं म्हणून तो हात हलवी अन् मग वेदना झाल्या, कीं मोठमोठ्यानें शिव्या देई.

तरुण सैनिक लटपटणाऱ्या पायांनीं पुढें चालत होता. तो लक्ष देऊन मागें वळून पहात होता. आपल्याला खेचरहांके म्हणणाऱ्या अधिकाऱ्यावर आपण खूप शौर्य गाजवून चांगला सूड घ्यावा असं त्यानें ठरवलं होतं. पण तें सारं निष्फळ ठरलं होतं आणि खेचर हाकणारांप्रमाणें ते मागें हटले होते. त्यांची ही माघार नामुष्कीची होती.

त्याची दृष्टि समोरच्या शत्रूला छेदून जाऊं बघत होती. पण त्या दृष्टीमागें असलेला संताप शत्रूपेक्षां त्यांना खेचरहांके म्हणणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध अधिक होता.

त्यांना असं अपमानास्पद विशेषण लावणाऱ्या अधिकाऱ्याला लाज वाटेल असं शौर्य गाजवणं त्याला नि त्याच्या सहकाऱ्यांना शक्य झालं नाहीं हें तरुण सैनिकाच्या लक्षांत येतांच त्याचं मन संतापानें भरून गेलं. त्यांना असलीं विशेषणं लावणारा अधिकारी मेला तर बरा असं वाटूं लागलं. त्या अधिकाऱ्याला आतां, "आम्ही खेचरं हांकणारे आहोंत काय ?" असं तीव्र उपरोधिक शब्दांत विचारायचं त्यानें ठरवलं होतं. पण आतां तें त्याला शक्य नव्हतं. ते जळजळीत शब्द त्याला बाजूला ठेवून द्यावे लागले होते.

त्याचं हृदय अखेरीस स्वाभिमानानें भरून आलं. त्यानें आपल्या हातां-तला झेंडा उंच धरला होता. तो आपल्या सहकाऱ्यांना पुढें येण्याचा आग्रह करूं लागला. ज्यांची ज्यांची ओळख होती त्यांना तो त्यांच्या नांवानें बोलावूं लागला. त्या ओरडण्यांत, त्याच्यांत आणि त्या लेफ्टनंटमध्यें एक प्रकारची आत्मीयता निर्माण झाली. ते एकमेकाला पाठिंबा देऊं लागले.

पण ती पलटण म्हणजे एक मोडलेलं यंत्र झालं होतं. ते दोघे त्या निर्जीव यंत्रासमोर ओरडत होते. ज्यांना पुढें जायचं होतं ते सैनिकहि इतर सैनिक मागें रेंगाळूं लागलेले पाहून घोटाळूं लागले होते. जेव्हां इतर लोक जीव वांचविण्याचा विचार करीत होते तेव्हां अग्रूचा विचार करीत बसणं चुकीचं होतं. जखमी सैनिकांना तसंच ओरडत सोडून देण्यांत आलं होतं.

धूर आणि ज्वाळा सर्वच पसरल्या होत्या. त्यांत अकस्मात तयार झालेल्या एका फटींतून जेव्हां तरुण सैनिकानें पाहिलं तेव्हां शत्रूचे सैनिक पुढें येत असलेले त्याला दिसले. त्याला ते हजारों असल्यासारखे वाटले. एक झेंडा त्याच्या नजरेसमोरून ज्वाळेसारखा हलला.

जणुं काय आधीं ठरल्यप्रमाणें धुराचा पडदा दूर झाला आणि त्यांतून स्पष्ट दिसणाऱ्या शत्रूच्या सैनिकांनीं मोठ्यानें ओरडत माघार घेणाऱ्या पलटणीवर हल्ला चढविला. त्यांच्या बंदुकांतून उड्या मारीत निघणाऱ्या ज्वाला पलटणीवर हल्ला करूं लागल्या. त्या हल्ल्याला पलटणीनें उत्तर दिलं तेव्हां पुन्हा धुराचा एक पडदा त्याच्या नजरेसमोर पसरला गेला., तरुण सैनिकाला कांहीं दिसत नव्हतं.

धुराच्या पडद्याखालीं झांकून गेलेल्या त्या हाणामारींत आपण चुकीच्या रस्त्यानें जात आहोंत असं समजून कांहीं सैनिक घाबरले. माघार घेत असलेले कांहीं सैनिक पळत परत आले व आपल्या मागें हटण्याच्या रस्त्यांत शत्रूनें आपल्यावर हल्ला केला अशी तक्रार करूं लागले. ह्या बातमीनें सर्वत्र घबराट पसरली. एक सैनिक खालीं बसला अन् आपलं तोंड त्यानें आपल्या हातांत झांकून घेतलं. दुसरा मोटमोठ्यानें ओरडून जनरलला शिव्या देऊं लागला. कुठल्या रस्त्यानें पळून जातां येईल तें पाहण्यासाठीं माणसें रस्ते शोधूं लागलीं. सतत गोळीबार होत होता. नियमितपणें गोळ्या माणसांच्यामध्यें येऊन पडत होत्या.

तरुण सैनिक आपला झेंडा घेऊन पुढें झाला व आपले पाय रोवून उभा राहिला. जणुं त्याला कोणी ढकलून देणार होतं. कालच्या लढाईत झेंडा नेणारा सार्जंट जसा उभा होता तसा तो उभा राहिला. त्यानें आपल्या कपाळावरून आपला थरथरणारा हात फिरविला.

त्याचा मित्र त्याच्या जवळ येऊन म्हणाला, "हेन्री, मला वाटतं हा शेवटच आहे."

"चूप बस. मूर्ख." त्याच्याकडे न पाहतांच तरुण सैनिक म्हणाला.

सर्व सैनिकांना एकत्र आणण्यासाठीं अधिकारी धडपड करूं लागले. जमिनींत सर्वत्र खड्डे होते, आणि बंदुकीच्या गोळ्यांपासून बचाव करण्यासाटीं मिळेल तो आसरा घेऊन सैनिक त्यामागें उभे होते.

आपले पाय फांकून आणि आपली तलवार छडीसारखी उचलून लेफ्टनंट उभा असलेला, तरुण सैनिकाच्या नजरेसं पडला. तो ओरडत कां नाहीं ह्याचं त्याला आश्चर्य वाटलं. रडतां रडतां खेळण्याकडे लक्ष गेल्यानें थांबलेल्या एखाद्या लहान मुलासारखं त्याचं वागणं तरुण सैनिकाला वाटलं. तो लेफ्टनंट स्वतःशीं कांहीं बडबडत असावा. त्याचा खालचा ओठ हलत होता.

धूर नाहींसा होऊन आपण कोणत्या आपत्तींत पडलों आहोंत तें बघायला माणसं उत्सुक झालीं होतीं. तेवढ्यांत लेफ्टनंट ओरडला, "ते आले", "ते आले." रायफलींच्या आवाजांत त्याचं पुढचं बोलणं नाहींसं झालं.

लेफ्टनंटची नजर होती त्या दिशेनें तरुण सैनिकानें पाहिलं आणि हल्ला करणारे शत्रूचे सैनिक त्याला दिसले. ते इतके जवळ होते कीं त्यांचे चेहेरे त्याला स्पष्ट दिसले. त्यांचे गणवेश त्याला नवे वाटले.

हे सैनिक आपल्या बंदुका घेउन खबरदारीनें पुढें जात असतांना लेफ्टनंटच्या नजरेला पडले. पलटणीनें केलेल्या गोळीबारामुळें त्यांची हालचाल थांबली. त्यांच्या चेहेऱ्यांवरून आपण शत्रूच्या किती जवळ आलों तें त्यांना कळलं नसावं अथवा त्यांची चालण्याची दिशा चुकली असावी. तरुण सैनिकाच्या मित्रांनीं केलेल्या गोळीबाराच्या धुरांत त्यांचे चेहरे नंतर दिसेनासे झाले.

एकमेकाला ठोसे मारावेत तसे ते एकमेकांवर गोळ्या झाडूं लागले. आपल्याला माघार घ्यावी लागली म्हणून पलटणींतले सैनिक चिडले होते आणि आतां मिळालेली सूड घ्यायची संधी फुकट घालवायला ते तयार नव्हते. त्यांच्या गोळीबाराचा प्रचंड आवाज होत होता. लपत छपत तरुण सैनिकानें शत्रूकडे

पाहण्याचा प्रयत्न केला पण त्याला जेवढं पहायला मिळालं तेवढ्यानें त्याचं समाधान झालं नाहीं. ते संख्येनें बरेच दिसले व पलटणीवर गोळीबार करीत होते. एकएक पाऊल उचलीत ते पलटणीच्या बाजूनें सरकत होते. आपल्या दोन गुडघ्यांत झेंडा धरून तरुण सैनिक खालीं बसला.

आपले लांडग्यासारखे रागावलेले सहकारी पाहून त्याला वाटलं जर शत्रूनें आपल्याला केरसुणीसारखं गिळून टाकलं तर निदान केरसुणीचीं टोकं तरी त्यांच्या घशांत नक्की बोंचतील.

पण शत्रूकडून होत असलेला गोळीबार कमी झाला. काय झालं तें पाहण्यासाठीं माणसं गोळ्या झाडायचीं थांबलीं तेव्हां त्यांना धूर दिसला. थांबून ते बघूं लागले. समोरची मोकळी जागा रिकामी होती. कांहीं प्रेतं पडलीं होतीं.

हें दिसतांच कांहीं माणसं उड्या मारून पुढें आलीं आणि नाचूं लागलीं. त्यांच्या सुकलेल्या गळ्यांतून जयघोष निघूं लागले.

आपण लढूं शकत नाहीं असं त्यांना पहिल्यानं वाटलं होतं. पण ह्या विजयानें आपण लढणं अशक्य नाहीं अशी त्यांची खात्री पटली.

ते नव्या विश्वासानें, नव्या अभिमानानें बघूं लागले. अभिमानानें त्यांनीं आपल्या शस्त्रावर हात फिरविले. आतां ते वीर होते.

# २१

आतां आपल्याला गोळीबाराची भीति वाटत नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलं. आतां सर्व रस्ते त्यांना मोकळे होते. कांहीं अंतरावर त्यांचे सहकारी लढत होते. तिकडे भयंकर आवाज निघत होते. पण इकडे सर्वत्र शांत होतं.

आपण मोकळे झालों अशा समजुतीनें त्यांनीं समाधानाचा सुस्कारा टाकला.

त्यांच्या चेहेऱ्यावर निरनिराळ्या भावना दिसूं लागल्या. संकटाचे वेळींहि ज्यांनीं धैर्य दाखविलें होतं त्यांच्या चेहेऱ्यांवर काळजीच्या छटा दिसूं लागल्या. वीरासारखं मरण येऊं शकणाऱ्या लढाईतून वांचल्यावर आतां विनाकारण मरण येणं त्यांना नामुष्कीचं वाटत होतं किंवा सुरक्षिततेच्या इतक्या जवळ पोचल्यावर त्यांना मरायचं नव्हतं. ते भराभर चालूं लागले.

ते आपल्या तळावर पोंचले तेव्हां तिथले लोक त्यांना टोमणं मारूं लागले. "तुम्ही कुठें होतां ?" "कशाला परत आलां !" "तिथेंच कां राहिलां नाहींत ?" "चांगली ऊब होती तिथें, नाहीं ?"

त्या थकलेल्या सैनिकांनीं कांहींच उत्तर दिलं नाहीं. एकानें मात्र आपल्या मुठी वळवून मोठ मोठ्यानें दुसऱ्यांना द्वंद्वयुद्धाचं आव्हान दिलं आणि तो लाल दाढीवाला अधिकारी दुसऱ्या एका कॅप्टनच्या डोळ्यांत रागारागानें पाहूं लागला. मुष्टियोध्याला शेवटीं लेफ्टनंटनें शांत केलं आणि लाल दाढीवाल्याची नजर चुकविण्यासाठीं तो कॅप्टन झाडीकडे पाहूं लागला.

ते टोमणे तरुण सैनिकाच्या मनाला फार लागले. त्यांचा बदला कसा घ्यावा ह्याचे अनेक विचार त्याच्या मनांत येऊन गेले. तो तिरस्कारानें त्यांच्याकडे पाहूं लागला. त्याचे कांहीं सहकारी मात्र माना खालीं घालून चालत होते. जणुं ते आपल्या अभिमानाचें प्रेत उचलून नेत होते.

आपण ज्या खुल्या जागेवरून हल्ला केला होता त्याकडे त्यांचं लक्ष गेलं. ती जागा खूप मोठी असेल असं तरुण सैनिकानें आपल्या मनाशीं ठरवलं होतं. पण आतां तें अंतर फारच लहान असल्याचं त्याला दिसलं. एवढ्या लहान जागेंत इतक्या घटना घडल्या कशा आणि इतक्या भावना तयार झाल्या कशा ह्याचं तो आश्चर्य करूं लागला.

मग त्या जुन्या सैनिकांनीं केलेल्या टिंगलींत कांहीं स्वारस्य आहे 'असं त्याला वाटूं लागलं. त्यानें आपल्या सहकाऱ्यांकडे वळून पाहिलं. ते आपल्या पाण्याच्या बाटल्या तोंडाला लावून त्यांतून पाण्याचा शेवटचा थेंब मिळेपर्यंत पाणी पीत होते. कांहीं आपल्या मळकटलेल्या आणि घामाळलेल्या शरीरावरून हात फिरवीत होते.

स्वतःच्या कृत्याची दखल घ्यायला तरुण सैनिकाला आतांपर्यंत वेळ मिळाला नव्हता. आपल्या सर्व कृत्यांची आठवण येऊन त्याला आतां समाधान वाटूं लागलं.

पलटण विश्रांति घेत असतांना त्यांना खेचरं हांकणारे म्हणणारा अधिकारी घोड्यावरून आला. त्याची टोपी नाहींशी झाली होती. त्याचे केस हवेंत उडत होते. घोड्याचा लगाम त्यानें ज्या पद्धतीनें धरला होता त्यावरून तो खूप संतापला आहे हें स्पष्ट होत होतं. पलटणीच्या कर्नलजवळ घोडा पोंचतांच त्यानें जोरानें लगाम खेंचून घोडा उभा केला. तो प्रथम कांहीं शब्द रागारागानें बोलला व नंतर ओरडला, " मॅक्चेस्ने, काय गाढवपणा केलास तूं. तुझीं माणसं आणखी शंभर पावलं पुढें गेलीं असतीं तर तुला चांगलं यश मिळालं असतं."

सगळीं माणसं कर्नलकडे पाहूं लागलीं. कर्नलनें उत्तर देण्यासाठीं प्रथम एखाद्या धर्मोपदेशकासारखा आपला हात वर उचलला, पण कांहीं बोलायच्या आंत खालीं आणून फ्रेंच माणसासारखे खांदे उडवीत जनरलला सांगितलं, " जनरल, आम्हांला जातां येईल तितकं पुढें आम्हीं गेलों."

"जातां येईल तितकें पुढें गेलों काय ?" जनरल म्हणाला, "म्हणजे कांहीं फार नाहीं." कर्नलकडे तिरस्कारानें पहात तो पुढें म्हणाला, " व्हाइटरसाइडच्या बाजूला शत्रूचं लक्ष वेधण्याचं काम तुला करायचं होतं तें तूं कसं करशील तुझं तुलाच माहीत."

त्यानें घोड्याचं तोंड वळवलं नि तो निघून गेला.

डावीकडच्या झाडींत सुरू झालेल्या लढाईच्या आवाजांत कर्नलनें दिलेल्या शिव्या फारशा कुणाला ऐकायला गेल्या नाहींत.

हें सर्व ऐकत असलेला लेफ्टनंट आतांपर्यंत स्वस्थ बसला होता. तो एकदम म्हणाला, "कुणी जनरल असो कीं आणखी कोणी असो. आम्हीं चांगले लढलों नाहीं असं म्हणणारा महामूर्ख असला पाहिजे."

"लेफ्टनंट, तें माझं मी पाहून घेईन." कर्नल ओरडला, म्हणून "यस कर्नल" असं म्हणून लेफ्टनंट चुप बसला.

पलटणीला जाब विचारल्याचं ताबडतोब सगळ्यांना कळलं आणि निघून जाणाऱ्या जनरलकडे वळून सर्वजण पाहूं लागले.

पण त्या आरोपांतलं सत्य थोड्याच वेळांत त्यांना स्पष्ट दिसूं लागलं. तें सर्वांच्या लक्षांत आल्याचं तरुण सैनिकाला कळलं. त्याचा मित्र त्याच्याजवळ येऊन म्हणाला, "त्याला काय वाटतं, आम्ही तिथें जाऊन खेळलों म्हणून! असा माणूस मीं कधीं पाहिला नव्हता."

अशा प्रसंगी सांगण्यासाठीं तरुण सैनिकानें आपलं एक तत्त्वज्ञान तयार करून ठेवलं होतं. "त्यानें कांहींच पाहिलं नसेल अन् त्याला हवं तें आपण केलं नाहीं म्हणून रागावून आम्ही शेळ्या मेंढ्या आहोंत असं त्यानें ठरविलं असेल."

"मला तसंच वाटतं." त्याचा मित्र म्हणाला, "आपलं नशिब जोरावर होतं हें मलाहि कबूल आहे पण आपण जें करतों तें ज्यांना पटत नाहीं त्यांच्याकरतां लढण्यांत कांहीं गंमत नाहीं. पुढच्या वेळीं त्यांचा हल्ला त्यांचा त्यांना करूं द्यावा, आपण मागें रहावं असं मला वाटूं लागलं."

"आपण दोघेहि चांगले लढलों." तरुण सैनिक आपल्या मित्राला म्हणाला, "कुठला गाढव हें नाकबूल करील?"

"अर्थात् आपण लढलों." त्याचा मित्र म्हणाला, "आमच्यावर आरोप करणारा देवळाएवढा उंच असला तरी मी त्याची मान मुरगळीन. आपण शूरासारखे लढलों असं नुकताच एक सैनिक म्हणाला. पण दुसरा म्हणाला कीं, सुर-

वातीपासून तों शेवटपर्यंत त्यानें आपल्याला पाहिलंच नाहीं. पण इतर पुष्कळांनीं आपल्याला पाहिलं. पण टॉमणे मला सहन होत नाहींत अन् तो जनरल सुद्धां...तो वेडा असला पाहिजे."

"तो गाढव पुन्हा इथें येऊं दे." तरुण सैनिक ओरडून म्हणाला, "म्हणजे मग..." पण बरेच सैनिक त्याच्या बाजूला आलेले पाहून त्यानें आपले शब्द तसेच सोडून दिले.

"फ्लेम्, तूं ऐकायलाच हवं होतंस !" एकजण म्हणाला.

"काय ?"

"तूं ऐकायलाच हवं होतंस." दुसरा पुन्हा म्हणाला अन मग त्यानें कर्नलचं अन लेफ्टनंटचं झालेलं भाषण त्याला ऐकवलं, "झेंडा घेऊन सर्वांच्या पुढें कोण होता, असं कर्नलनें विचारलं होतं नि लेफ्टनंटनें 'फ्लेमिंग' म्हणून सांगितलं. मग 'त्याच्या बरोबर कोण होतं' असं कर्नलनें पुन्हा विचारलं अन् 'विल्सन' म्हणून लेफ्टनंटनें सांगितलं. तेव्हां कर्नल म्हणाला, "ते दोघे शूर आहेत; त्यांना मेजर जनरल केलं पाहिजे."

"तूं खोटं बोलतोस थॉंपसन," "ओऽऽह" वगैरे विरोधी शब्द जरी तरुण सैनिकाच्या तोंडून बाहेर पडले तरी त्या दोन्ही मित्रांना खूप आनंद झाला, व ते एकमेकांकडे पाहूं लागले.

ह्या पूर्वी अधिकाऱ्यांच्याबद्दल वाटलेला सर्व राग: ते विसरले. लेफ्टनंट व कर्नल ह्या दोघांच्याबद्दल त्यांना कृतज्ञता वाटूं लागली.

# २२

अनुक्रम 22633
विभाग बा/बा
क्रमांक 9508
नों. ता. 3-6-61

लढाई पुन्हा सुरू झाली तेव्हां तरुण सैनिकाला आत्मविश्वास वाटूं लागला. अंगावर येणारे तोफांचे गोळे चुकविण्यासाठीं माणसें वांकूं लागलीं. तेव्हां गंमत वाटून त्याच्या चेहेऱ्यावर हसूं फुटलं. शेजारच्या टेकडीच्या उतरणीवर असलेल्या लोकांवर चढलेला हल्ला तो ताठ उभा राहून पाहूं लागला.

कांहीं अंतरावर दोन तुकड्या एकमेकांशीं एक छोटें युद्धच लढत होत्या. ती जागा मोकळी होती. ते एकमेकांवर आग ओकीत होते. इतर सर्वत्र चालू असलेल्या युद्धाशीं जणुं त्यांचा कांहीं संबंध नव्हता. ते आपसांत लढत होते.

दुसऱ्या एका बाजुला एक ब्रिगेड शत्रूला झाडीतून हांकून देण्यासाठीं मोठ्या रुबाबांत चालली होती. झाडींत ब्रिगेड शिरली तेव्हां प्रचंड आवाज उठले. थोड्या वेळांतच ब्रिगेड परत आली तेव्हां ब्रिगेडच्या रांगा जशाच्या तशा होत्या.

डाव्या बाजूच्या उतरणीवर तोफांच्या रांगा होत्या. पुन्हा हल्ला चढविण्या-साठीं तयार झालेल्या शत्रूवर त्या रागावून आग ओकीत होत्या. त्यांच्या तोंडां-तून लाल ज्वाला व त्या मागोमाग धूर बाहेर पडत होता व त्या उडवणारे सैनिक अधून मधून दिसत होते. तोफांच्या मागें एक पांढरं घर शांत उभं होतं. बरेच घोडे एका कुंपणाला बांधलेले होते. माणसं इकडून तिकडे धांवत होतीं.

त्या दोन पलटणींतली लढाई कांहीं वेळ चालू राहिली अन् मग आपो-आप बंद पडली. त्यांचे दोन झेंडे एकमेकांकडे पाहून हंसत आहेत असं तरुण सैनिकाला वाटलं.

कांहीं काळ सर्व शांत झालं. त्या शांततेच्या पोटांत वादळ होतं. निळ्या गणवेशांतले सैनिक झाडीकडे निरखून पहात होते. दूरवर ऐकूं येणाऱ्या तोफ-खान्याच्या आवाजाखेरीज इतरत्र शांत होतं.

टेकडीच्या उतरणीवरच्या तोफखान्यानें अकस्मात् सूचनेचा गोळा फेंकला. झाडींत आवाज सुरू झाले नि वाढत वाढत त्यांनीं जणुं सारं जग ग्रासून टाकलं. आकाशांतले ग्रह एकमेकावर आदळल्यासारखे प्रचंड आवाज उठले. तरुण सैनिकाचे कान त्या आवाजांनीं भरून गेले, दुसरं कांहीं त्याला ऐकूं येईना.

टेकडीच्या माथ्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर सैनिक एकमेकावर हल्ले करीत होते. त्यांच्या रांगा पुढेंमागें हलतांना दिसत. एकदा एक बाजू मोठमोठ्यानें ओरडत दुसऱ्या बाजूवर तुटून पडे व कांहीं वेळानें दुसरी बाजू पहिल्या बाजूवर ओरडत हल्ला चढवी. एकीकडून दुसरीकडे जातांना माणसं मोठमोठ्यानें ओरडत.

दोन बाजूंच्या मधें असलेल्या कुंपणावर दोन्ही बाजू धडकत. त्यांच्या दणक्यांनीं कुंपण चेमटून नाहींसं झालं. दोन्ही झेंडे आगीच्या ज्वालेसारखे हलत होते व त्यामुळें कुणाची सरशी होते तें तरुण सैनिकाला कळलंच नाहीं.

जेव्हां त्याच्या पलटणीची पाळी आली तेव्हां प्रचंड वेगानें ते निघाले. त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव झाला तेव्हां ते जंगली माणसांसारखे ओरडूं लागले. आपल्या बंदुकांच्या मागें त्यांनीं आपलीं तोंडें लपविलीं अन् आपल्या बंदुका ते ठासून भरूं लागले. पलटणीचीं पुढचीं माणसं धुरांत झांकून गेलीं होतीं. पिवळ्या तांबड्या ज्वालांनीं धुरांत खंड पडे तेवढाच.

त्या हाणामारींत जुन्या सैनिकांइतकेच ते मळके झाले, घामाळले. त्यांच्या काळ्या झालेल्या चेहेऱ्यांतून त्यांचे डोळे चमकत.

हाताला पट्टी बांधून लेफ्टनंट परत आला आणि असल्या आणीबाणी-साठीं खास राखून ठेवलेल्या शेलकींतल्या शिव्या देण्यास त्यानें सुरुवात केली. त्यानें आपल्या माणसांनाहि शिव्या द्यावयास सुरुवात केली. त्या आधींच्या त्यानें दिलेल्या शिव्यांमुळें त्याचा शिव्यांचा सांठा अजिबात कमी झालेला नव्हता.

तरुण सैनिकाच्या हातांत अजूनहि झेंडा होता. तो स्वस्थ बसला होता आणि विचारांत गढून गेला होता. तो विचारांत इतका गढून गेला होता कीं आपल्या हातांत झेंडा आहे अन् आपण स्वस्थ बसलों आहोंत हें त्याच्या लक्षांतहि आलं नाहीं.

शत्रु मोठ्या संख्येनें जवळ आला. शत्रूचे उंच सैनिक लांब लांब टांगा टाकीत पळत होते. त्यांना पाहतांच आपसांत बडबड करणारे सैनिक बोलायचे थांबले. त्यांनीं आपल्या बंदुका उचलल्या व शत्रूवर गोळ्या झाडल्या. त्यांना कुणी गोळ्या झाडण्याची आज्ञा दिली नव्हती. त्यांनीं स्वयंस्फूर्तीनेंच गोळ्या झाडल्या होत्या.

पण शत्रुसैनिक तेवढ्यांत आडोशाला पळाले. ते त्या आडोशामागें लपून पलटणींतल्या सैनिकांवर गोळ्या झाडूं लागले.

पलटणींतले सैनिक घनघोर युद्धासाठीं सज्ज झाले. त्यांच्यासमोरचे शत्रु त्यांना टोमणे मारून चिडवीत होते पण पलटणींतले लोक शांत होते. त्यांना पूर्वीं चिडविल्यामुळें आतां ते अधिक निश्चियानें आपल्या मोर्च्यांना चिकटून राहिले. होते व त्यांच्यावर चालून येणाऱ्या शत्रूला मागें उलथून पाडण्याचा त्यांचा निर्धार होता.

कांहीं झालं तरी आपल्या जागेवरून हलायचं नाहीं असं तरुण सैनिकानें ठरवलं. आपल्या अपमानाचं शल्य त्याच्या हृदयांत बोचत होतं आणि त्याच्या हृदयांत तीव्र तिरस्कार निर्माण झाला होता. आपलं शरीर चिंध्या होऊन ह्या रणांगणावर पडलं तरच आपण ह्या अपमानाचा सूड घेतल्यासारखं होईल हें त्याला स्पष्ट दिसत होतं. खेचरं हाकणारे आणि 'जमीन खोदणारे' असलीं विशेषणं त्यांना लावणाऱ्या अधिकाऱ्यावर ह्याच पद्धतीनें सूड उगवला गेला असता.

पलटणींतले सैनिक पटापट पडूं लागले. तरुण सैनिकाच्या पलटणींतल्या सार्जंटाच्या गालांतून आरपार गोळी गेली व रक्ताळलेलं त्याचं तोंड उघडं पडलं. त्यांतून त्यानें मोठ्यानें ओरडायचा प्रयत्न केला व पळत पळत तो मागें गेला.

सर्वत्र माणसें पडत होतीं. तरुण सैनिकानें आपल्या मित्राकडे पाहिलं. बंदुकीच्या दारूनें त्याचं तोंड काळंकुट्ट झालं होतं. तो लेफ्टनंटहि शिव्या देत होता. पण आता शिव्यांचा शेवटचा सांठा वापरायला काढल्यासारखा त्याचा भाव होता

पलटणींतल्या माणसांचा गोळीबार थंडावत चालला होता.

# २३

कर्नल त्याच्या इतर अधिकाऱ्यांबरोबर धांवत आला. "आपण त्यांच्यावर हल्ला चढवला पाहिजे. आपण हल्ला केला पाहिजे." ते ओरडत होते.

त्यांचा आवाज ऐकून तरुण सैनिकानें आपल्यांतलं अन् शत्रूतलं अंतर मोजलं. बसल्या जागीं रहाणं म्हणजे मरण ओढवून घेणं आहे हें त्याच्या लक्षांत आलं. पुढें जाणं आणि शत्रूला त्याच्या सुरक्षित जागेपासून ढकलून देणं आवश्यक होतं.

आपल्या थकलेल्या सहकाऱ्यांना हांकलूनच न्यावं लागेल असं तरुण सैनिकाला वाटलं म्हणून त्यानें मागें वळून पाहिलं तेव्हां त्याचे सहकारी त्याला सम्मति देत असल्याचं पाहून त्याला आश्चर्य वाटलं. त्यांनीं आपल्या संगिनी चढवल्या तेव्हां त्यांचा बंदुकांच्या नळ्यांवर आवाज झाला. नंतर आज्ञा ऐकूं येतांच उड्या टाकून ते पुढें चाल करून निघाले. त्यांच्यांत नवं धैर्य आलं होतं. विझण्यापूर्वीं ज्योत जशी भडकते तशी त्यांच्यांतून शक्ति निघून जाण्याआधीं जणुं ते सर्व शक्ति एकवटून हल्ला करीत होते.

तरुण सैनिकानें झेंडा सर्वांच्या पुढें आघाडीवर धरला होता व मोडक्या हातानें तो इतरांना आपल्या मागें येण्याचं आवाहन देत होता. त्यांना खरं म्हटलं तर अशा आवाहनाची मुळींच गरज नव्हती. ते स्वतःला किसरून समोरच्या बंदुकांवर तुटून पडत होते. गोळीबार इतका प्रचंड होत होता कीं स्वतःच्या मोर्च्यापासून तों शत्रूच्या मोर्च्यापर्यंतच्या मधल्या भागांत त्यांच्या प्रेतांचा एक छोटासा ढिगारा पडेल असं वाटूं लागलं, पण ते बेछूट झाले होते. त्यांच्या उत्साहाचे पंख फडफडवीत ते अभेद्य भिंतीवरहि आदळायला तयार होते.

तो स्वतः आत्मत्याग करायला तयार होता. भलते विचार करायला तयार नव्हता. बंदुकीच्या गोळ्या म्हणजे आपल्याला इच्छित स्थळीं पोंचण्याच्या रस्त्यांत

अडकवूं शकणारे पदार्थ एवढंच त्याला त्यांच्याबद्दल वाटत होतं. आपल्या मनाच्या ह्या अवस्थेबद्दल त्याला फार समाधान वाटत होतं.

त्यानें सर्व शक्ति एकवटली. त्याची दृष्टि विचारानें कमी झाली होती पण समोरच्या धुरांत लपलेलं कुंपणच फक्त शत्रूचा बचाव करीत आहे हें त्याला माहीत होतं.

तो धांवूं लागला तेव्हां दोन्ही बाजूचे सैनिक एकमेकांवर आदळल्यावर केवढा धक्का बसेल असा विचार त्याच्या मनांत आला. युद्धाचा कैफ त्याला चढला होता नि त्या कैफाच्या भरांत त्याच्या मनांत ही कल्पना येत होती. पुढें सरकणाऱ्या पलटणीचा दणका बसल्यावर शत्रु भुईसपाट होईल अन् मैलचे मैल तो धक्का जाणवेल असं त्याला वाटलं. ह्या कल्पनेनें तो आपल्या सहकाऱ्यांपेक्षां अधिक वेगानें धांवूं लागला. त्याचे सहकारी जोरजोरानें ओरडत होते.

पण समोरच्या बऱ्याच सैनिकांना हा दणका सहन करायचा नव्हता. ते पळूं लागले.

कांहींजण निश्चयानें लढत होते. कुंपणामागें ते बसून ठामपणें बंदुका झाडीत होते. त्यांचा झेंडा फडफडत होता.

पलटणींतले सैनिक शत्रुसैनिकांच्या जवळ जाऊन पोंचले. समोरचे सैनिक पाहून त्यांच्या आवाजांत तीव्र तिरस्कार उमटला. दोन्ही बाजू एकमेकांचा अप-मान करूं लागल्या. आपल्याला प्रतिकार करणाऱ्या शत्रूच्या नरडीकडे पलटणींतल्या सैनिकांनीं झेंप घेतली.

तरुण सैनिकाचं सारं लक्ष शत्रूच्या झेंड्यावर होतं. तो झेंडा काबीज करणं हें सर्वोच्च पारितोषिक ठरलं असतं. तो त्या झेंड्याच्या दिशेनें धांवला. त्याच्या हातांतला झेंडा समोरच्या झेंड्याच्या दिशेनें धांवला. दोन गरुडांचं आतां युद्ध होणार असं दिसूं लागलं.

पलटणींतले सैनिक थोडे थांबले व आपल्या बंदुका त्यांनीं शत्रूवर झाडल्या. शत्रूची फळी मोडली पण उरलेले शत्रु अजून लढत होते. पलटणींतले सैनिक पुन्हां शत्रूवर चालून गेले.

शेवटच्या गोळीबारानें जखमी झालेला शत्रूचा ध्वजसैनिक जमिनीवर पडला होता. यमानें पाय धरून ठेवलेला, मृत्यूच्या मार्गावरील मनुष्य जसे हातपाय झाडतो तसा तो सैनिक तडफडत होता. त्याच्या चेहेऱ्यावर मृत्यूची दाट छाया पसरली होती. पण निश्चयानें तो मृत्यूशीं लढत होता. त्या भरांत तो आपला झेंडा हृदयाशीं कवटाळून सुरक्षिततेच्या जागीं जायची धडपड करीत होता.

पण त्याच्या जखमांमुळें त्याचे पाय धरून ठेवल्यासारखे वाटत होते. पलटणीच्या आघाडीवर असलेले सैनिक कुंपणापर्यंत जाऊन पोंचले होते. त्यांनीं कुंपणावर हल्ला चढवला तेव्हां तो त्यांच्याकडे हताश नजरेनें पहात होता.

तरुण सैनिकाच्या मित्रानें त्या झेंडयावर चित्त्यासारखी झडप मारली. त्यानें त्या जखमी सैनिकाच्या हातून तो झेंडा हिसकावून घेतला. तो परत मिळविण्यासाठीं तो सैनिक उठूं लागला व त्या प्रयत्नांत जमिनीवर पालथा पडला. त्याच्या मृत शरीरांतून बरंच रक्त गवतावर सांडलं होतं.

विजयाच्या त्या जागीं जयघोषांचे प्रचंड आवाज उठले. आपले सहकारी कित्येक मैल दूर आहेत, अशा बेतानें ते प्रचंड आवाजांत बोलत होते. ज्यांच्या डोक्यावर टोप्या शिल्लक होत्या त्या त्यांनीं हवेंत फेंकल्या.

दुसऱ्या टोकाला चार शत्रू-सैनिकांना पकडून कैद केलं होतं. त्यांच्या भोंवतीं पलटणींतले लोक जमले होते. कैद झालेला एक सैनिक आपल्या काल्पनिक जखमेची काळजी घेत होता. पायाची जखम चोळतां चोळतां आपल्याला पकडणाऱ्यांच्या तोंडावर तो बेधडक शिव्या देत होता. युद्ध-कैद्यानें कसं वागावं याचे सर्व शिष्टाचार तो विसरला होता. एक लहान कैदी मात्र शांत होता. आपल्या पाणीदार डोळ्यांनीं तो आपल्या विजेत्यांचे चेहेरे न्याहाळीत होता.

तिसरा कैदी दुःखी चेहेरा करून बसला होता. थंड प्रवृत्तीनें तो वागत होता. त्याला कुणीं कांहीं विचारलं कीं तो " गो टु हेल " एवढंच उत्तर देई.

चौथा अगदीं शांत बसला होता. तरुण सैनिकाला वाटलं, त्याला फार दुःख होत असावं.

विजयाचा आनंद पुरेसा साजरा करून पलटतणींले सैनिक आपल्या शत्रूला हांकून दिलेल्या कुंपणाआड बसले. दूरच्या लक्ष्यावर कांहींनीं गोळ्या झाडल्या.

तरुण सैनिकानें कुंपणाला टेकवून झेंडा ठेवला आणि तो व त्याचा मित्र समाधानानें खालीं गवतावर बसले.

# २४

झाडींतून येणारा लढण्याचा आवाज आतां कमी कमी होत होता. तोफांचे आवाज अजून ऐकायला येत असले तरी बंदुकांचे आवाज बंद झाले होते. आवाज बंद झाल्यानें तरुण सैनिकानें व त्याच्या मित्रानें दुःखद नजरेनें एकमेकांकडे पाहिलं. त्यांना त्या आवाजांची इतकी संवय झाली होती कीं, त्यांना चुकल्यासारखं वाटूं लागलं.

सैन्यांत होत असलेले बदल त्यांना दिसूं लागले होते. सैनिक इकडून तिकडे जात होते.

तरुण सैनिकानें उठून विचारलं, "पुढें काय ?" डोळ्यावर हाताची झडप टाकून तो वर टेकडीकडे पाहूं लागला.

त्याचा मित्रहि उठला. "आपण इथून बाहेर पडणार आणि नदी किनाऱ्यावर पुन्हा जाणार." तो म्हणाला.

ते वाट पाहूं लागले. थोड्याच वेळांत त्यांना परत फिरण्याची आज्ञा मिळाली. आपले थकलेले पाय झटकीत ते 'देवा !' म्हणाले. नव्या लढाईवर

जाण्याइतकंच परत फिरणं त्यांना नको होतं. ते ज्या उघड्या शेतावरून धांवत आले होते त्यावरून हळुहळू परत निघाले.

ते तुकडींत पोंचले. ही जमलेली तुकडी झाडींतून रस्त्याकडे निघाली. धुळीनें माखलेल्या त्या जमावांत ते दोघे मिसळले. दोन तोफखाने एकमेकांवर गोळे फेंकीत होते व एकमेकांवर धूळ उडवीत होते. कांहीं घोडेस्वार इकडून तिकडे जात होते.

तुकडी वळून नदीकडे निघाली. ह्या हालचालीचा अर्थ तरुण सैनिकाच्या लक्षांत येतांच त्यानें मागें पडलेल्या रणांगणाकडे नजर टाकली. त्यानें समाधानाचा सुस्कारा टाकला आणि तो आपल्या मित्राला म्हणाला, "अखेर संपलं सारं."

त्याच्याकडे पहात त्याचा मित्र म्हणाला "खरंच."

तरुण सैनिक थोडा गोंधळला. युद्धाच्या कैफांतून बाहेर पडून विचार करायला त्याच्या मनाला कांहीं वेळ लागत होता. अखेरीस त्या धुक्यांतून त्याचं मन बाहेर आलं आणि तो विचार करूं लागला.

एकमेकांवर गोळ्या झाडणं गतकाळांत जमा झाल्याचं मग त्याच्या लक्षांत आलं. त्याच्या कांहीं विचारशक्ति सुप्त रहाणाऱ्या क्षेत्रांतून बाहेर पडून तो सर्व घटनांवर विचार करूं लागला होता.

आपल्या सर्व कृत्यांच्या आठवणीनें त्याला बरं वाटलं. त्याचं शौर्य सर्वांच्या नजरेला पडलं होतं. त्या आठवणींचं संगीत त्याला ऐकूं येऊं लागलं.

आपण चांगले आहोंत असं तो आपल्या नजरेनें पाहूं लागला. त्याच्या मित्रांनीं केलेली त्याची स्तुति त्याला आठवली.

तरीहि त्याच्या पहिल्या पलायनाचं भूत त्याच्या नजरेसमोर नाचूं लागलं. कांहीं क्षण त्याला स्वतःची लाज वाटूं लागली.

त्याच्या नजरेसमोर कांहीं दृश्यें उभीं राहिलीं. गोळ्या लागून रक्तस्राव झाला असतांहि त्याला झालेल्या काल्पनिक जखमेची चौकशी करणारा फाटक्या कपड्यांचा जखमी सैनिक त्याला दिसूं लागला. त्या जखमी सैनिकानें आपल्या शक्तीचा शेवटचा कण उंच सैनिकाला मदत करण्यासाठीं खर्च केला होता नि त्याला मात्र शेतांत सोडून तरुण सैनिक निघून आला होता.

आपलीं हीं कृत्यं उघडकीस येतील असं त्याला वाटलं आणि भीतीचा आवाज त्याच्या तोंडांतून बाहेर पडला. त्याला घाम फुटला.

त्याच्या मित्रानें त्याच्याकडे पाहून विचारलं, " काय झालं हेन्री ? "

उत्तराऐवजीं तरुण सैनिकानें शिव्या दिल्या.

आपल्या सहकाऱ्यांबरोबर झाडीनें आच्छादलेल्या त्या रस्त्यावरून चालत असतां त्याचीं हीं कृत्यें त्याला दिसूं लागलीं व त्यापुढें त्याचीं इतर कृत्यें झांकलीं गेलीं. तो कसलाहि विचार करूं लागला तरी त्याच्या पलायनाचें भूत त्याच्या नजरेसमोर उभं राही. आपलं हें दुःख आपल्या चेहेऱ्यावर दिसत असावं असं वाटून त्यानें त्यांच्याकडे पाहिलं पण ते युद्धांतील विजयाच्या गप्पा मारीत होते.

तो फाटक्या कपड्यांचा जखमी सैनिक सतत त्यांच्या डोळ्यांपुढें उभा राही. जन्मभर ही स्मृति आपल्याला झपाटणार असं त्याला वाटूं लागलं. आपल्या मित्रांच्या चर्चेंत त्यानें भाग घेतला नाहीं.

हळूहळू ती स्मृति दूर ढकलण्यइतकं त्यानें अववसान आणलं.

युद्धाबद्दलच्या आणि शौर्याबद्दलच्या आपल्या जुन्या कल्पना त्याला आठवल्या. त्या कल्पनांचा आपल्याला आतां तिटकारा वाटतो ह्याचं त्याला समाधान वाटलं.


ह्यामुळें त्याच्यांत नवा विश्वास निर्माण झाला. आपल्यांत जागं झालेलं नवं पौरुषत्व त्याला जाणवलं. त्याला मार्ग दाखविणारांच्या पुढें तो आतां माघार घेणार नव्हता. महान मृत्यूला स्पर्श करण्यासाठीं तो गेला होता आणि तो मृत्यु महान् होता. तो आतां पुरुष झाला होता.

रक्त आणि शत्रुत्व ह्यांच्या क्षेत्रांतून बाहेर पडतां पडतां त्याचं हृदय बदललं होतं.

पाऊस पडूं लागला. थकलेल्या सैनिकांची ती रांग तांबुस चिखलांतून चालत होती. तरीहि तरुण सैनिकाच्या मुखावर स्मित फुटलं. सारं जग आपल्यासाठीं आहे असं त्याला वाटूं लागलं. द्वेष, वार्धक्य ह्यांनीं जग भरलं आहे हें इतरांचं म्हणणं त्याला मान्य नव्हतं. द्वंद्वाच्या भावनेंतून ती आतां बाहेर आली

होता. तें भयंकर स्वप्न आतां मागें पडलं होतं. युद्धाच्या खाईंत भाजून निघणारा तो एक प्राणी होता. आतां तो शीतल निर्झर, टवटवीत फुलं, शांत स्वच्छ आकाश ह्यांच्या सुंदर जगांत प्रेमिकाच्या सौंदर्यतृषेनें वावरूं लागला. तें अस्तित्व शांत, सुंदर होतं.


पाण्याच्या काळ्या ढगांना बाजूला सारून एक सोनेरी किरण शांतपणें नदीवर पसरत होता.




ओगले
निरनिराळ्या आकारांच्या व साइजच्या टिकाऊ कांचेच्या चिमण्या
मुंबई, गुजराथ व सौराष्ट्राकरितां
एजंट्स
लहरचंद नानचंद गांधी
१८२ चकला स्ट्रीट, मुंबई ३

'कैलास'चीं पुस्तकें कायम आपल्या संग्रहीं रहावीं म्हणून उत्तम कागदावर छापून जाड कार्डाच्या मलपृष्ठांत बांधलेलीं असतात.

IRBK-0106305


टेलिफोन ७६१८०
शुभेच्छा
आमच्या सर्व
ग्राहकांस व हितचिंतकांस
ही दिवाळी व नवीन वर्ष
सुख, समृद्धि व
शांतीचे जावो
प्रेम प्रोसेस स्टुडिओ
व्हिक्टोरीया मिल्स कंपाऊंड,
गांवदेवी, मुंबई ७.